शनिवार । ११ जुलै १९८१ । एक रुपया

# माणूस



## आनंद ओवरीतला साहित्यिक

पृष्ठ....२३

# मोकाशी : एक आनंदयात्रिक

श्री. ग. मा.

दि. बा. मोकाशी गेले ! निदान मला व त्याच्या जवळपासच्या काही मित्रांना तरी हे अगदी अनपेक्षित नव्हते. थोडे अकस्मात हे घडले असले तरी.

या प्रसंगाला पाच / सहा महिने झाले असतील. दुपारची ११॥–१२ ची वेळ. मी ‘ माणूस ’ कार्यालयातून बाहेर पडत होतो. अचानक तेथील दुकानाच्या पायरीवर मोकाशी बसलेले मला दिसले. मोकाशी ? आणि ‘ माणूस ’ कार्यालय वर असताना खाली दुकानाच्या पायरीवर ? आणि एकटे ? आणि या वेळी ? हे सगळे क्षणार्धात मनात येऊन मी लांबूनच विचारले, “ अहो, खाली काय बसलात ? वर नाही का यायचे ? ”

“ औषध घेऊन परत चाललो होतो. थोडी विश्रांती घ्यावीशी वाटली म्हणून इथेच बसलो. वर चढवलेही नसते ! ” मोकाशी.

“ अहो, मग खाली छापखाना नव्हता का ? तिथे थांबायचे ! ” मी.

“ कटाळा केला. ” मोकाशी.

मग तिथेच आम्ही थोडा वेळ बोलत राहिलो.

नेहमी पाय वाजवीत, पाठीवर एखादी पिशवी टाकून, शुभ्र लेंग्या-झब्यात हसतमुखाने ‘ माणूस ’ कार्यालयात येणारे मोकाशी यापुढे आपल्याला दिसणार नाहीत असे त्या वेळी मला प्रथमच जाणवून गेले !

त्यानंतर फार तर एक-दोन वेळा मोकाशी ‘ माणूस ’मध्ये आले असतील. आले तेव्हाही खाली प्रेसमध्ये बसले. मी वरून खाली येऊन आमच्या गप्पा, निरोप देणे-घेणे काही तरी झाल्याचे आठवते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अमृतमहोत्सवानिमित्त ‘ माणूस ’ कार्यालयात एक छोटा समारंभ होता. साहित्य-क्षेत्रातली बरीच नामवंत मंडळी येणार होती म्हणून मोकाशीना मी येण्याचा आग्रह केला. जिना चढवणार नसेल तर खुर्चीची व्यवस्था करतो असे सांगितले. ‘ नक्की येतो, खाली कुठे तरी थांबतो ’ असे ते म्हणाले; पण आले नाहीत ! त्यांचे घर ते ‘ माणूस कार्यालय ’ हे जेमतेम पाव-अर्धा फर्लांगाइतके अंतरही त्यांना चालवले नाही.

याच काळात मी आणि आम्हा दोघाचे मित्र विनायकराव पाटील त्याच्या घरी तब्येतीच्या चौकशीसाठी म्हणून एकदा गेलो होतो. पाच-सहा वर्षापूर्वीचे कॅन्सरचे मोठे दुखणे बरे झाल्यानंतर प्रथमच त्याची तब्येत पुन्हा खूप बिघडली होती. त्या वेळी मोकाशी आम्हाला नेहमीच्या त्याच्या ऐसपैस लाकडी पलगावर दिसले नाहीत. त्यांनी आतल्या खोलीत अंथरूण धरले होते. बाहेरच्या खोलीतला गारठाही त्याना मानवेनासा झाला होता. तब्येतीचा धोका टळलेला होता; पण चेहरा नको तितका कोमेजलेला दिसला. बाहेर पडल्यावर मी विनायकरावांना म्हटले सुद्धा : ‘ दुखणे मुक्कामासाठी आल्यासारखे वाटते ! ’ विनायकरावांनाही तसेच काहीसे वाटले होते.

त्यानंतर दर आठ । पधरा दिवसानी मी मोकाशीकडे जात असे. गप्पा होत; पण एखादी तरी प्रकृतीची नवी तक्रार नाही असे कधी झाले नाही. कधी पायाची सूज तर कधी कंबरेचे दुखणे. औषधोपचारात कसलीच कमतरता नव्हती. पत्नी-मालुताई सगळं तादात्म्याने करीत होत्या; पण मोकाशीचा चेहरा उजळत नव्हता. डोळ्यातली ज्योत हळूहळू मंदावत चालली होती.

पाच । सहा वर्षापूर्वीच्या पहिल्या कॅन्सरच्या आजारा-


साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : सहावा

११ जुलै १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

तून मोकाशी पूर्णपणे सावरले होते. त्यानंतरच त्यांचे 'संध्याकाळचे पुणे' माणूसमधून सुरू झाले. हा आजार आता पुन्हा उद्भवणार नाही अशी त्यांची समजूत होती. तज्ज्ञ डॉक्टरांनी तसे त्यांना वेळोवेळी सांगितलेही होते. मध्यंतरी अशीच एकदा तब्येत जास्त झाली. त्याना जोशी हॉस्पिटलमध्ये हलवले. सगळ्यांना वाटले कॅन्सरच पुन्हा उद्‌भवला ! पण तब्येत अचानक ढासळण्याचे दुसरेच कारण निघाले आणि मोकाशी सुखरूप घरी आले !

पण तेव्हापासून तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचारही त्यांना समाधान देईनासे झाले. डॉक्टर बदलून झाले. वि. ग. कानिटकराचा मुलगा नंदू सगळं पाहात होता. पण मोकाशी काही घरापासून 'माणूस कार्यालया'पर्यंत किंवा एस्. पी. कॉलेजपर्यंत पुन्हा हिंडताफिरताना कुणाला दिसले नाहीत. कुणीही घरी येवो, मोकाशी अंगणापर्यंत, थेट बाहेरच्या दारापर्यंत त्याला न चुकता पोचवायला जात. पण शेवटी शेवटी हाही त्यांचा परिपाठ संपला होता.

या सगळ्याचा अर्थ मोकाशी कसा लावत होते ? मला तरी हे एक कोडेच आहे. आपण यातून बरे होणार, लिखाण करू शकणार, थोडेफार हिंडताफिरताही येईल, असे त्यांना शेवटपर्यंत वाटत असावे. पण दुसरे मन म्हणते, जे आजूबाजूच्या मित्रांना जाणवले ते मोकाशांनाही जाणवत नसेल कशावरून ?

गेल्या वर्षीच्या 'माणूस' दिवाळी अंकातील त्यांची कथा ते गेल्यावर मी पुन्हा वाचली. बहुधा ही त्यांनी लिहिलेली शेवटची कथा असावी. पंढरपूरची वारी सुरू करणाऱ्या हैबतीवरची ती गोष्ट आहे. हैबतीला वारी का सुचली असावी ? चोर-दरवडेखोर हैबतीला गुहेत कोंडतात. हैबतीवर प्राणसंकट कोसळतं. हैबती विठ्ठलाचा धावा करतो. दरोडेखोरांच्या नायकाला चार मुलींनंतर प्रथमच मुलगा होतो. त्या आनंदात, बायकोच्या सांगण्यावरून तो हैबतीला सोडून देतो. हैबतीवरचे प्राणसंकट टळते. विठ्ठलामुळे हे संकट टळले अशी हैबतीची भावना होते व तो पंढरपुराला वारी काढायचे ठरवतो.

या हैबतीत मोकाशींनी स्वतःला पाहिले होते का ? आपल्यावर आलेले प्राणसंकट टळल्याचे, निदान ते बरेच दूर गेल्याचे मोकाशींना वाटत होते कां ?

आम्हा काही मित्रांना मात्र प्रत्येक भेटीत मोकाशींचे खंगलेपण अधिकाधिक जाणवत होते.

शेवटच्या भेटीतले मोकाशी मात्र नेहमीप्रमाणे आशावादी वाटले नाहीत. ज्या दिवशी त्याना घोलेरोडच्या गोखले हॉस्पिटलमध्ये काही तपासण्या करून घेण्यासाठी जायचे होते त्याच दिवशी सकाळी मी नेहमीसारखा डोकावलो. मोकाशी पलंगावर निजून होते. विचारपूस झाली पण गप्पा काही सुरू होईनात. त्यांना कोणी तरी ॐकार जपाचा उपाय करून पाहण्यास सांगितले होते. पण मोकाशी तिकडे काही नीट लक्ष देत नव्हते. मालुताई हे सांगत होत्या आणि यावर नेहमीप्रमाणे काही संभाषण, थट्टाविनोद व्हायला हवे होते. पण मोकाशी सगळे पडल्यापडल्याच ऐकून घेत होते. पलंगावर त्यांनी हलल्यासारखेही केले नाही. मग नेहमीप्रमाणे उठून बसणे लांबच. मालुताई याही वेळी आशावादी असं खूप बोलल्या; पण मोकाशींची दृष्टी मला अगदीच हरवल्यासारखी त्या वेळी भासली. आम्ही बोलत होतो पण मोकाशी आमच्यात असल्याचे जाणवत नव्हते. असे पूर्वी कधीही जाणवले नव्हते !

नंतर मोकाशी दिसले ते एकदम हॉस्पिटलच्या खोलीतले; जेव्हा सगळाच खेळ संपत आलेला होता !

अजूनही उलगडा होत नाही की, शेवटी कुणी कुणाला चकवले ! मोकाशी आपला मृत्यू आमच्यापासून लपवीत ठेवून आम्हाला चकवीत होते की, मृत्यू त्यांनाच चकवीत होता ?

नाही तरी मोकाशींनी आपल्या साहित्यात मृत्यूला थोडे वगळल्यासारखेच केले आहे; याचा तर त्याला राग आला नसावा ?

¤

मोकाशींची आणि माझी ओळख केव्हा, कशी झाली ते आज काही नीट आठवत नाही; पण 'माणूस'च्या अगदी सुरुवातीच्या अंकांत त्यांचे 'यंत्रे येती घरा' हे सदर येत होते. म्हणजे 'माणूस' निघायच्या अगोदरपासून आमची ओळख असावी. त्या वेळी त्यांचे दुकान पेरूगेटाशेजारी मुख्य रस्त्यावर होते. नंतर ते त्याच इमारतीत थोडे मागच्या बाजूला गेले. या दोन्ही ठिकाणी आमच्या किती भेटी, गप्पा झाल्या त्याला काही गणतीच नाही ! दर शुक्रवारचे चणा-जोर गरम, काबली सहसा कधी चुकली नाही ! श्रीकैलास ते सिंधुसागर अन्नस्वतंत्रता-संचलनात तर दोन महिने आम्ही दिवसरात्र एकत्रच राहिलो, फिरलो ! जास्त जवळ आल्यावर माणसे लांब जातात असा सर्वसाधारण अनुभव; पण इथे तसे काही घडले नाही. एक प्रसंग, तोही अपवाद म्हणून आठवतो. औरंगाबादला पदयात्रेचा मुक्काम होता. तेथील भाषणात मी मुक्कामाच्या प्रत्येक गावी यापुढे पदयात्रिक मंडळी एक तासभर रोज सोनखत गोळा करण्याचा कार्यक्रम करणार आहेत असे जाहीर करून टाकले. रात्री मोकाशींनी याला हरकत घेतली. प्रत्येकावर म्हणजे मोकाशींवरही या कार्यक्रमात भाग घेण्याचे बंधन राहणार असेल तर यात्रा सोडून पुण्याला परत जाण्याचा त्यांचा पर्यायही त्यांनी माझ्यासमोर ठेवला ! असे बंधन

त्यांच्यावर वा कोणावरही नाही, मी स्वत: मात्र हा कार्यक्रम करणार आहे असे मी सांगितले व आमची वाटचाल पुढे सुरू झाली. विनोबांना थोर मानणाऱ्या मोकाशीनी हा सोनखत गोळा करण्याचा कार्यक्रम इतका का झटकून टाकावा याचा मला मात्र प्रश्न पडला. त्यांना हा कार्यक्रम म्हणजे एक स्टंट वाटला असावा का?

मोकाशी संचलनात एक लेखक म्हणून सहभागी झालेले होते. संचलनाच्या मूळ उद्दिष्टाशी, त्यातील राष्ट्रवादी आशयाशी त्याचे फारसे जिव्हाळ्याचे, आतरिक नाते नव्हते. पुढे या संचलनावर त्यांनी लिहिलेल्या 'अठरा लक्ष पावलं' या पुस्तकात हे स्पष्ट झाले. या पुस्तकावर मी 'माणूस'मधून दोन लेख लिहून मोकाशीवर टीका केली. पुस्तकातील काही घोटाळे, चुकीचे संदर्भ दाखवून दिले. मला वाटले मोकाशी रागावतील, संबंध दुरावतील; पण तसे झाले नाही. मोकाशी सगळंच विसरून गेले. विसराळुपणा हा कधीकधी गुण ठरून जातो, तो असा!

¤

कटुता, वैर, मत्सर, हेवेदावे यापासून मोकाशी अठरा लक्ष पावलं दूर होते. त्यांना कसलीच हाव नव्हती. पैसे, कीर्ती, नावलौकिक त्यांना मिळाला तर नको होता असे नाही; पण त्यासाठी त्यांनी कधी धडपड केली नाही. साहित्यिक त्याच्याकडे व्यक्ती या नात्याने अनेक येत; पण साहित्यिक वर्तुळात त्याची ऊठबस, चर्चा कमीच होई. या रहदारीपासून ते लांब असत. त्यांना साठावे वर्ष लागले तेव्हा एखादा छोटासा समारंभ–कार्यक्रम करवून घेण्यासही ते तयार झाले नाहीत; पण शेवटी शेवटी या सर्व ऐहिकाकडे आपण नको तितके दुर्लक्ष करतो की काय, असेही त्यांना वाटून गेले असावे. दुकानातून, रेडिओ–दुरुस्तीतून मोकळे झाल्यावर ते मग लांबलांबची व्याख्यानाची निमंत्रणे स्वीकारू लागले होते. मुलाखती, गप्पा या कार्यक्रमातही भाग घेत. टी. व्ही. वर त्यांना आणण्यात तेंडुलकरांनाही यश लाभले. साहित्यिक मित्रांवर त्यांनी लिहिले ते याच काळात. साहित्य परिषदेच्या अमृतमहोत्सवानिमित्त निघालेल्या विशेषांकात त्यांनी अरविंद गोखल्यांवर लिहिले. म. टाइम्समध्ये त्यांनी गो. नी. दांडेकरांवर लिहिले. पूर्वी असे त्यांनी लिहिले असते की नाही, शंका वाटते.

या दोन्ही लेखांत मराठीतील समीक्षक–टीकाकारांबद्दलची मोकाशीची सूक्ष्म नाराजी व्यक्त झालेली आहे.

¤

गाडगीळ–गोखल्याइतकी मोकाशीची कथा का गाजली नाही?

प्रत्येक काळाची एक नस असते, एकेक सूर असतो. ज्या काळात मोकाशीनी कथा लिहायला सुरवात केली तेव्हाचा सूर निराशेचा, विकृतीचा शोध घेऊ पाहणारा, वैफल्यवादाकडे झुकणारा होता. मोकाशींचा सूर अगदीच वेगळा. आशावादी, प्रसन्न, निर्मळ आणि हसून शेवटी सगळे गोड मानून घेण्याचा. निराशा, उद्वेग, पराभव, कोंडमारा, वैफल्य, तुटलेपणा, भकासपणा हे सगळे मोकाशीना जाणवत नसेल असे नाही; पण त्यांच्या साहित्यात मानवी जीवनाच्या या बाजूचे प्रतिबिंब क्वचितच उमटलेले दिसते. माणसाच्या मूलभूत चांगुलपणावर त्याची नितांत श्रद्धा होती. खरे म्हणजे मोकाशीना यंत्रतंत्रांची आवड. विज्ञानकथाही त्यांनी लिहिल्या; पण यंत्रयुगाने माणुसकीचा घडवलेला ऱ्हास त्यांनी दृष्टीआड केला व ते जगण्यातला आनंद शोधत राहिले, आपल्या कथा-कादंबऱ्यातून सांगत राहिले. 'पालखी' हा त्यांचा केवळ एक अनुभव नव्हता, ते त्याचे 'जीवनदर्शन' होते–आनंदाचा, शातरसाचा एक विशाल, वाहता प्रवाह. सुख-दु:खाच्या, विकृतींच्या लाटा आल्या तरी त्या सामावून घेऊन आनंदाच्या शोधात पुढे पुढे जाणाऱ्या या प्रवाहात मोकाशी उभे होते म्हणून विकृतीनी ते अस्वस्थ, बेचैन किंवा विचलित होत नसावेत. शेवटी वाइटावर चांगले मात करणार असा त्याचा ठाम विश्वास. हा तसा पारंपारिक, भागवतधर्मीय संताचा जीवनदृष्टिकोनच नाही का? यात नवीनपणा तो काय? नवीनपणा हा की मोकाशीनी तो आधुनिक, ललित पद्धतीने, कथा–कादंबऱ्यातून मांडला. 'देव चालले' सारखी त्यांची एखादी लघु कादंबरी किंवा 'आमोद सुनासी आले' या सारखी एखादी कथा विश्वसाहित्याच्या मालिकेत शोभावी इतकी मोठी आहे. पण फ्रॉइड-सार्त्र-कामूच्या किंवा मर्ढेकर-गाडगीळ यांच्या यंत्रयुगाच्या आरंभ-उत्तरार्धाच्या उध्वस्त सुराशी मोकाशीचा हा संताच्या आनंदधामातील सात्त्विक सूर कसा जुळणार? त्यामुळे यंत्रयुगीन कोलाहलात आणि खडखडाटात त्याचा सूर थोडा कमी दूरवर पोचला असावा, कमी ऐकला गेला असावा. पण तो अधिक ऐकला जावा, बाजारात त्याला मागणी वाढावी म्हणून त्यांनी तो कधीही बदलला नाही. हे त्यांचे मोठेपण!

¤

मोकाशीचे बरेच लेखनसंकल्प अपुरे राहिले. ते जर आणखी काही काळ आपल्यात राहते तर त्याचे कुठले सकल्प त्यांनी प्रथम हातावेगळे केले असते?

मला वाटते दोन कादंबऱ्या त्यांनी प्रथम पूर्ण केल्या असत्या.

त्याच्या वडिलांवरची आणि विनोबांवरची. कारण माणूस जसजसा परिपक्व होतो तसतसा तो आपल्या मूळ स्वरूपाकडे अधिकाधिक ओढला जातो

□

मुंबई वार्ता

# □ पुनर्वसन-अपंग शरीरांचं आणि अपंग मनांचंही

कुठल्याही एखाद्या मॅनेजरची नाही तर ऑफिसातल्या साहेबाची खोली नजरेसमोर आणा. काचेचं दिमाखदार टेबल. त्यामागं उंच पाठीची फिरती खुर्ची. उंच उंच खिडक्या. जमिनीपर्यंत रुळणारे पडदे. मधून मधून खणखणणारा फोन. सर, जरा हे एवढं बघा, असं म्हणून अदबीनं आत बाहेर करणारी माणसं. फायली आणि कागदपत्राची चळत.

–हे सारं तिथं होतंच. सुखद अभाव होता तो केवळ एका गोष्टीचा. इथं कार्यतत्परता होती; पण त्याचं प्रदर्शन नव्हतं. बेफिकीर आणि उद्दाम चटपटीतपणा नव्हता. टेबलामागच्या खुर्चीतला चेहेरा स्टार्च, इस्त्री करून घडी घालून ठेवलेला नव्हता, तो प्रसन्न आणि प्रौढ होता. आश्वासक होता. स्थळ–हाजी अली. अपंगांच्या पुनर्वसन केन्द्राचे सुपरिंटेंडेंट म्हणून काम करणाऱ्या वसंत भाव्यांची केबिन आहे ही. पुनर्वसन केन्द्रातल्या अपंगांना भाव्यांच्या खटपटीतून काश्मीरची सहल करायला मिळाली हे वाचनात आलं होतं. तेव्हाच ठरवलं की, भावे स्वतः काम करत असताना त्यांच्या रिहॅबिलिटेशन सेंटरमध्येच त्यांची भेट घ्यायची. स्वतः भावे अपंगपणाचा पुसटसा डाग लागलेलेच. मुळातले ते वैमानिक. एका अपघातात त्यांचा हात जखमी झाला. त्यावर ॲम्प्युटेशन करून घेण्याचं त्यांनी नाकारलं. एअर इंडियातून मिळणारा ग्राउंड जॉबही नाकारला; पण सुदैवानंच त्यांना ही रिहॅब सेंटरमधली नोकरी मिळाली. त्याआधी ही संस्था चालू होतीच; पण भाव्यांनी या सरकारी संस्थेची सहकारी संस्था केली. अपगांचं पुनर्वसन म्हणजे अनेकविध बाजू असलेला, सामाजिक निकडीचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न. पहिला आणि मूलभूत घटक अर्थातच अपंगाना आवश्यक त्या शारीरिक आणि वैद्यकीय उपचाराचा. त्यासाठी संस्थेचं अद्ययावत उपकरणानी सुसज्ज असं हॉस्पिटल आहे. स्वच्छ, मोठे वॉर्डस्. इमारतीची रचनाच अशी की, पश्चिमेकडे काचेच्या खूपशा खिडक्या. तिथून समोरचा गतिमान वाहता रस्ता, अनिर्बंध उफाळता समुद्र, मोकळा वारा, समुद्रातल्या उडत्या पक्ष्यांची हालचाल सहजच टिपता यावी. इथं कृत्रिम अवयव बनवण्याचा कारखाना आहे. व्यायामासाठी आवश्यक ती साधनं आहेत. आंतरराष्ट्रीय अपंग वर्षाच्या निमित्तानं सध्या जायण्टस् आणि लायन्स क्लबांकडूनही पुष्कळ आर्थिक पाठबळ मिळतं आहे.

आता आर्थिक स्वावलंबन. संस्था त्यासाठी व्यवसाय-मार्गदर्शन करते. टायपिंग, शिवणासारख्या उपयुक्त गोष्टींचं शिक्षणही देते; पण केवळ व्यवसाय-शिक्षण देऊन काय फायदा? पुढं व्यवसायाची संधीही मिळायला हवीच. आधीच आपल्या देशात सुशिक्षित बेकाराची संख्या बेफाट! त्यात अपंगांची बेकारी म्हणजे भलताच बिकट प्रश्न. तेव्हा संस्थेत वर्कशॉप ट्रेनिंगची सोय तर आहेच, पण रोजगार उपलब्ध करून देता यावा म्हणून एक एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजही चालवलं जातं. बोलताबोलता भाव्यांनी माझ्यासमोर एक वही टाकली. एक्स्चेंजमध्ये नावं नोंदवायला आलेल्या अपंगांच्या नावपत्त्यांनी ती शंभर पानी वही एका आठवड्यातच भरून गेली होती!

खरं म्हणजे अपंगांच्या पुनर्वसनातला सगळ्यात महत्त्वाचा आणि सगळ्यात कठीण घटक आहे मानसिक पुनर्वसनाचा! यासाठी पुनर्वसन केवळ अपंगांचंच नाही तर साऱ्या समाजमनाचंच करायला हवं. केवळ अस्तित्वात असतो तो पालापाचोळा; पण जगतो, जिवंत असतो तो माणूस! मग तो अनाथ असो, नाही तर अपंग! आणि या जिवंतपणासाठी हवा असतो आत्मविश्वास. मीही कोणी आहे, मीही काही करू शकतो हा स्वतः स्वतःला दिलेला दिलासा. रिहॅब सेंटरमधले अपग केवळ पोटापुरत कमवत नाहीत. ते स्वाभिमानानं जगताहेत. जीवनातला आनंद भोगताहेत. पाय अधू असणाऱ्या प्रधानबाई. इथं जे काही शिक्षणक्रम दिले जातात त्या साऱ्यांची रचना आणि योजना त्या करतात. राहणार कल्याणला. रोज कल्याणहून हाजी अलीला यायचं-जायचं म्हणजे धडधाकट माणसालासुद्धा धडकी भरते. या बाई कसं जमवत असतील! तशीच टेलिफोन-ऑपरेटर शोभा. सेंटरमधल्या स्पीकर्सवर हिचा आवाज सतत संचार करत असतोच. पाय तेवढे साथ न देणारे; पण म्हणून काय झालं? मन तर ताठ आहे! चेहऱ्यावर ओसंडता उत्साह आणि सहज येणारं स्मित. हिनं नुकतंच अपंगांसाठी विवाहमंडळ सुरू केलं आहे. त्यातून गेल्या वर्षात बारा विवाह जमवले. त्या साऱ्यांच्या अपंग-एकटेपणाच्या जीवनात सुखाचे हे किती मधुर क्षण आले असतील! शोभाचा हा मॅरेज ब्युरो विस्तारतो आहे. मालेगाव-नाशिकहून विवाहेच्छु तरुण-तरुणींचे फोटो आणि माहिती येते आहे.

आम्ही बोलत होतो तेवढ्यात एक उमदा तरुण घाईघाईनं खोलीत शिरला. 'सर, तो अर्ज पाठवायची शेवटची तारीख जूनअखेर आहे आपल्याला घाई करायला हवी!'

'अरे बस रे', भावे कौतुकानं म्हणाले. 'हा दप्तरी. याच सेंटरमधला इलेक्ट्रिकल इंजिनियर आहे. आता निघालाय जपानला. या वर्षी आमच्यासारख्यांसाठी खास स्पर्धा आहेत तिथं. त्यात इंजिनियरिंग–डिझायनिंगच्या स्पर्धेत भाग घेणार आहे तो.' मग त्याच्याकडे वळून, 'अरे हो, तू आणि तुझी बायको उद्याच्या पिकनिकला येणार ना?– याचंही लग्न आपल्या शोभानंच जमवलं बरं का!' –पिकनिक?–माझ्या मनात प्रश्न. 'आमच्या सेंटरच्या मित्रमंडळीनी ठरवलं की एवढा मस्त पावसाळा आहे, तेव्हा शनिवार-रविवार झकास खंडाळ्याची पिकनिक काढू या!'

यावर मी फक्त अवाक!!

'पण ही काश्मीरची सहल कशी काय जमवलीत तुम्ही? भल्या भल्या प्रवासी कंपन्यांनाही सगळं जमवता नाकी नऊ येतात!' माझा भाबडा आणि उत्सुकतेचा प्रश्न 'त्याची पुष्कळच तयारी करावी लागली आम्हाला. सगळी रिझर्वेशन्स केली. मुख्य म्हणजे ठिक–

पृष्ठ २१ वर

# चीन

## नव्या नेतृत्वाची प्रतिमा

वा. दा. रानडे

चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या साठाव्या वाढदिवशी नेतृत्वात बदल घोषित करण्यात आला. पक्षाचे अध्यक्ष हुआ गुओफेंग यानी राजिनामा दिला व त्यांच्या जागी हु याओ बांग यांची निवड झाली. नेतृत्वबदलाची ही केवळ औपचारिक घोषणा होती. नऊ महिन्यांपूर्वी हुआंनी पंतप्रधानपदाचा राजिनामा दिला होता तेव्हापासून ते जवळजवळ निवृत्त झाल्यासारखेच होते. हुआंना माओंनीच आपला राजकीय वारस नेमले होते. अतिरेकी डावे आणि अतिरेकी उजवे ही दोन्ही टोके टाळून चिनी कम्युनिस्ट पक्षास ते मधल्या मार्गाने नेतील आणि माओंच्या तत्त्वप्रणालीचा गाभा कायम ठेवून आजच्या परिस्थितीच्या गरजेनुसार त्यात आवश्यक ते बदल करतील, अपेक्षा अशी करणारांची त्यांनी निराशा केली. पक्षाला प्रभावी नेतृत्व ते देऊ शकले नाहीत आणि डेंग झियाओ पिंग यांनी सत्तास्पर्धेत त्यांच्यावर मात करून पक्ष व सरकार पूर्णपणे आपल्या पकडीखाली आणले. पक्षाच्या अध्यक्षपदी हु याओ बांग यांची निवड झाली असली तरी नव्या धोरणामागचे खरे सूत्रधार डेंगच आहेत !

हु वेगळ्या प्रकारचे नेते आहेत. ते चीनच्या लालसेनेत सेनानी नव्हते, एखाद्या प्रांताचे गव्हर्नर किंवा मंत्रीही नव्हते; पक्षकार्यकर्त्यांच्या मेळाव्यांपुढे केलेल्या भाषणापलीकडे त्यांनी फारशी जाहीर भाषणेही कोठे केलेली नाहीत.परदेशी वकिलांना व वार्ताहरांना तर ते जवळजवळ अपरिचितच आहेत ! हु ६७ वर्षांचे आहेत. डेंग त्यांच्यापेक्षाही नऊ वर्षांनी मोठे आहेत, पण इतर देशांप्रमाणे कम्युनिस्ट देशातसुद्धा राजकीय नेते स्वेच्छेने निवृत्ती पत्करत नाहीत. सत्तास्पर्धेत एक तर ते दूर फेकले जातात किंवा प्रकृतीने अगदी अशक्य होईपर्यंत काम करीत राहतात.

डेंग हे हु यांचे राजकीय गुरू. राजकीय प्रवासाच्या चढ-उतारात ते एकमेकाना साथ देत आलेले आहेत. कम्युनिस्टांच्या चळवळीत बालसैनिक म्हणून सामील होण्यासाठी हु वयाच्या चौदाव्या वर्षी घराबाहेर पडले. हजारो मैलांची ' लंबी दौड ' करून, वाऱ्यावादळाशी झगडत, दऱ्याखोऱ्यांतून मार्ग काढीत येमान प्रातात सुरक्षित जागी कम्युनिस्टांनी आपले मुख्य ठाणे हलविले त्या दौडीत हु सहभागी झाले होते. जपानविरुद्ध युद्धात वायव्य चीनच्या तैहांग पर्वतात डेंग व हु खांद्याला खादा लावून लढले आणि तेव्हापासून डेंग यांची साथ हु यांनी कधी सोडली नाही.

चीनमध्ये १९४९ साली कम्युनिस्ट राजवट आल्यानंतर नैऋत्य चीनमध्ये पक्षाचे प्रमुख म्हणून डेंग काम पहात होते तेव्हा हु यानाही त्याच भागात पाठविण्यात आले. पुढे हु डेंगबरोबर पेकिंगला गेले आणि कम्युनिस्ट यूथ लीगचे प्रमुख म्हणून काम पाहू लागले. सांस्कृतिक क्रांतीच्या काळात रेडगार्ड्सनी या दोघावर कडक टीका केली, तेव्हा हे दोघं अज्ञातवासात काम करू लागले. अडीच वर्षे हु यानी एका खेड्यातील गाईंच्या गोठ्यात काढली ! रेडगार्डसच्या हाती लागल्यावर त्यांनी हु यांना एका पुर्नशिक्षण शाळेत पाठविले. त्यांना काही काळ स्थानबद्धही करण्यात आले.

डेंग यांनी १९७३ साली अल्पकाळ सत्ता मिळविली तेव्हा ॲकॅडमी ऑफ सायन्सेस या संस्थेत डेंगनी हुआना काम दिले. रेडगार्ड्सच्या दहशतीमुळे या संस्थेतील शास्त्रज्ञांचे मनोधैर्य खचले होते,ते पुन्हा त्यांच्यात निर्माण करण्याची कामगिरी हुआ यांच्याकडे होती. माओंच्या निधनाच्या थोडे आधी १९७६मध्ये डेंगना पुन्हा अधिकारपदावरून दूर करण्यात आले तेव्हा हु यांनीही त्यांचेकडे सोपविलेले काम सोडले व डेंग यांची साथ केली. त्यानंतर १९७७ मध्ये डेंग यांना पुन्हा उपाध्यक्ष नेमण्यात आले तेव्हा त्यानी हु यांना पक्षाच्या मध्यवर्ती समितीवर घेतले.

कम्युनिस्ट यूथ लीगचे प्रमुख म्हणून अनेक वर्षे काम केल्याने हु यांचे तरुण कम्युनिस्ट नेत्यांशी निकटचे मैत्रीसंबंध आहेत. त्यांच्या पाठिंब्याने आपली धोरणे व कार्यक्रम आपण यशस्वीपणे अंमलात आणू शकू असा आत्मविश्वास त्यांना वाटतो; डेंग प्रमाणेच हु व्यवहारवादी राजकीय नेते आहेत. डेंग यांनी १९७७ पासून हाती घेतलेला कार्यक्रम आखण्यास त्यांनी मदत केली आहे. चीनच्या सध्याच्या धोरणाची आखणी या दोघांच्या विचारविनिमयाने व संमतीने झालेली आहे. पाश्चात्य देशांना चीनची दारे खुली करणे, कुंठित अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी भांडवलदारी पद्धतीची प्रलोभने कामगारांना देणे, कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धतीत सुधारणा करणे आणि विज्ञानक्षेत्रातील राजकीय प्रभाव व हस्तक्षेप नष्ट करणे ही नव्या नेतृत्वाच्या धोरणामागील मुख्य उद्दिष्टे आहेत. डेंग यांनी हु यांची सोळा महिन्यांपूर्वी पक्षाच्या सरचिटणीसपदी नेमणूक केली आणि त्यापूर्वी पक्षाच्या शिस्तपालन समितीत त्याना महत्त्वाचे स्थान दिले होते. नोकरशाहीत व लष्करात माओंच्या कट्टर डाव्या धोरणाचे जे पुरस्कर्ते होते त्यांची हु यांनी महत्त्वाच्या पदावरून हकालपट्टी केली. पक्षाचे संघटनात्मक प्रमुख म्हणून सांस्कृतिक क्रांतीतील अन्यायाच्या व छळाच्या प्रकरणांची त्यांनी चौकशी केली आणि सांस्कृतिक क्रांतीत ज्याचा नाहक राजकीय बळी पडला त्यांचे पक्षात पुन्हा मानाने पुनर्वसन करण्याचे धैर्य दाखविले. तसेच पक्षाच्या प्रचार खात्याचा प्रमुख या नात्याने पक्षातील भ्रष्टाचाराच्या प्रकरणाकडे हु यांनी लक्ष वेधले आणि पक्षरचनेत सुधारणा करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

सांस्कृतिक क्रांतीच्या धोरणावर हु यांनी जोरदार हल्ला चढविला. ती एक आपत्ती होती, तिच्यात एकही चांगला गुण नव्हता, असे त्यांनी प्रतिपादले. सांस्कृतिक क्रांतीतील चुकांना माओ कितपत जबाबदार, हे प्रश्न चिनी वृत्तपत्रात उपस्थित केले जाण्यापूर्वीच हु यांनी सांस्कृतिक क्रांतीतील बहुसंख्य अतिरेकी डाव्या चुकाबद्दल माओ यांनाच स्पष्ट दोष दिला. पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या बैठकीत माओंच्या कार्याचे मूल्यमापन करणारे जे निवेदन मंजूर करण्यात आले त्यात हीच भूमिका मांडली आहे. सांस्कृतिक क्रांतीत सर्वात जास्त छळ बुद्धिवंताना आणि आणि शास्त्रज्ञाना सोसावा लागला. हु यांच्या धोरणाचे त्यांनी स्वागत केलेले आहे.

डेंग यांचे वय लक्षात घेता ते आता फार वर्षे सूत्रे चालवू शकणार नाहीत. हु यांची खरी कसोटी त्यानंतरच्या काळातच लागणार आहे. असे असले तरी डावे अतिरेकी माओवादी नजीकच्या काळात तरी पुन्हा डोकेवर काढण्याची शक्यता दिसत नाही. □

## उत्तरमीमांसा : १३ :

स. शि. भावे

# संतांचे ' बीज ' गणित

वारीचे दिवस आहेत. पालखीचे दिवस आहेत.

परवा पालखी पुण्यात आली. काल मुक्काम पुण्यात होता. आज (२९ जून) दिवेघाट चढून पालखी सासवडला पोचणार. आज मुक्काम सासवड !

वीस वर्षांपूर्वी दि. बा. मोकाशी पुण्याहूनच पालखीत सामील झाले होते. आज ते फार दूरवर ( कोठे ? ) जाणाऱ्या पालखीत सामील झाले. वीस वर्षांपूर्वी त्यांनी सामील होण्यापूर्वी पालखीचे डोळाभर दर्शन घेतले होते आज–काल–परवा त्यांनी पालखी बघितली नाही. लौकिक पालखीकडे त्यांनी डोळे मिटून घेतले होते. वीस वर्षांपूर्वी मोकाशीचा मुक्काम सासवडला होता. आज ते पालखीआधीच मुक्कामासाठी वैकुंठाला गेले !

होय. मोकाशी गेले. ५ मेला त्यांची मुलाखत घेतली. तेव्हा हा क्षण इतका समीप आहे असे जाणवले नव्हते; पण तो क्षण येऊ बघत होता. शेवटी आज तो आलाच !

अंतिम निद्रेत मोकाशी शांत दिसत होते. त्यांच्या पद्धतीने आपणही वागू या. त्यांच्या स्मृतीला आदरपूर्वक वंदन करून आपले काम करू या !

¤

आपले काम करायचे म्हणजे नेमके काय करायचे ? शेतीचे काम करायचे ? की वारीला जायचे ? कोणते काम आपले म्हणायचे ? सावतामाळी म्हणाला होता, ' कांदा-मुळाभाजी। अवघी विठाबाई माझी।' आणि तो पंढरीला गेला नाही, तरी गेलेला त्याच्या मित्राला दिसला !

मग वारी कशाला ? इतके लोक वारीला का जातात ? वर्षानुवर्षे का जातात ? ही वारी अशी हजारावर वर्षे महाराष्ट्रात का चालू आहे ? महाराष्ट्रातच का चालू आहे ?

¤

वारीत सारे चांगले चांगलेच असते असे नाही. बरीच वर्षे झाली. ज्ञानोबांच्या पालखीवर वाहिल्या जाणाऱ्या पैशांचा लिलाव बोलला जात असे. म्हणजे असे की, एखादा इसम आळंदी संस्थानच्या पंचांना अमुक एक रक्कम कबूल करीत असे किंवा देत असे. त्या रकमेच्या मोबदल्यात, आळंदी ते पंढरी जी काही देणगी मिळेल ती त्या इसमाची !

यामुळे वारीत गंमत येत असे. दिलेली किंवा कबूल केलेली रक्कम भरून यायला पाहिजे आणि शिवाय आणखी बरीच जादा रक्कम मिळायला हवी. म्हणून मग वारी कोणत्याही गावात शिरली की ' पैसे टाका, पैसे टाका !' असा डांगोरा त्या गावात होत असे. ही म्हणजे वायद्याच्या तंत्राने वसूल होणारी एक गुतवणूक झाली. ज्ञानोबांची पालखी आणि असले धंदेवाईक सट्टेखोर याचा असा विषम संबंध पूर्वी येत असे !

बरीच वर्षे झाली, ही प्रथा बंद झाली आहे. ' पैसे टाका ', ' पैसे टाका !' हेही बंद झाले आहे. अशा व्यावहारिक प्रथा असतातच. त्या बंद करण्याचा प्रयत्न भली माणसं करतात. हे प्रयत्न थोडे-बहुत यशस्वी होतात. पुन्हा नवे व्यवहार शिरतात. हे कोणत्याही चांगल्या गोष्टीत चालतच असते. त्यामुळे हौशे, गवशे व नवशे हे आहेत अशी तक्रार केवळ वारीविषयी करण्यात हशील नाही. हे ' कश्मल ' किंवा असे काळे डाग सगळीकडेच असतात. ते समान काळेपण वगळून बघायला हवं. असं काय या वारीत आहे की जी हजारावर वर्षे अकुंठित चालू आहे ?

¤

या वारीला सरकारी आधार नाही. राजकीय पक्षाचा आधार नाही. यासाठी एखादे प्रतिष्ठान अथवा विश्वस्त निधी नाही. प्रतिष्ठानाचे अध्यक्ष अथवा विश्वस्त समिती नाही !

पारंपारिक वारसाहक्काने आलेला एखादा सर्वाधिकारी नाही. कारण वारसाहक्कच नाही ! ज्ञानेश्वरांचे वारस हक्क सांगत आहेत, त्या हक्कासाठी प्रिव्ही कौन्सिलपर्यंत भांडत गेले आहेत, असे इथे नाही. कोणी संतांनी असा आध्यात्मिक वारसा, सिंहासनावर बसवून वगैरे कोणा एका व्यक्तीला दिलेलाच नाही !

सर्व वारकऱ्यांचे वारीसाठी असे वेगळे संस्थान किंवा वेगळी संस्था नाही. तिची घटना, व्यवस्थापक समिती असे काही नाही. अंदाजपत्रक, खर्चाला मंजुरी, हिशेबतपासणी असे काही नाही. साधे एक संमेलन भरवायचे तरी किती औपचारिक सव्यापसव्य करावे लागते, तसे या वारीत काही नाही !

आहे ते अगदी साधे, ज्याला वारी करावीशी वाटते, तो उठतो आणि चालू लागतो. झाली त्याची वारी सुरू ! सोय हवी असली तर अमुक गटात किंवा तमुक पालखीत सामील व्हावे; पण तसे कुठे सामील न होता एकट्यानेच वारी करायलाही काही हरकत नसते. अमुक एका ठिकाणीच वारीत सामील झाले पाहिजे असेही नाही. अमुक इतके अंतर कमीत कमी चाललेच पाहिजे असेही नाही. चालवत नाही, बैलगाडीत बसा. थोडक्यात काय, तर अमुक कराच, तमुक करूच नका, अशी सक्ती नाही. कारण अमुक केले, तमुक टाळले असे काही मिरवायचेही नाही, की तसे वागून वा टाळून काही मिळवायचेही नाही. आत्मारामाला जे बरे वाटेल, ज्याने संतोष होईल, ते करावे !

खरेच. अगदी आरंभापासून ही वारी आत्मारामाच्या संतोषासाठी आहे. वारी नक्की केव्हा सुरू झाली हे पुराव्यानिशी सांगता येणार नाही. पुंडलिकाने ती सुरू केली असे म्हणता येईल का ? कारण त्याच्यासाठीच तर ते परब्रह्म पंढरपुरास आले. मला थोडी वेगळी कल्पना करावीशी वाटते. वारी ही पुंडलिकाच्या आधीपासून असली पाहिजे आणि या वारीची मात ऐकून भगवंत वाळवंटात येऊन पुंडलिकाच्या साक्षीने

हजारो वारकऱ्यांत सामील झाले असावेत. सतोष अनुभवण्यासाठी !

वारी म्हणजे आपण उठून देवाकडे जाणे, पुंडलिकाने तर देवाला उठवून आपल्याकडे आणले. म्हणजे त्याची वारी ही खरी. कारण त्याने ती देवाला करायला लावली !

¤

पुंडलीकाची गोष्ट या दृष्टीने समजून घ्यायला हवी. भक्तोत्तम पुंडलीक कोण अशा कुतूहलाने भगवंत पंढरपुरास आले. म्हणाले, 'पुंडलीका, मी आलोय !' पुंडलीकाने मागे वळून एकदाही पाहिले नाही. नुसती खाद्यावरून एक वीट मागे भिरकाविली. म्हणाला, 'देवा, यावर उभे राहा. माझ्या आई-वडिलांची सेवा संपली की तुमच्याकडे बघतो !'

पण (नामदेव म्हणतात तशी) अठ्ठावीस युगे झाली. पुंडलीकाला मागे वळून बघायला सवड झालेली नाही. देव त्याची वाट बघत अजून विटेवर उभे आहेत. कारण पुंडलीकाची सेवा अजूनही चालू आहे !

समजा पुंडलीकाची सेवा संपली तर ? तर तो मागे वळून पाहील. देवाचे काम होईल. देव वैकुंठाला परत जायला मोकळा होईल. पुंडलीकाला देवाला असे मोकळे करायचे नाही. कारण कोणत्याही भक्ताला देवाला मोकळे करायचे नसते, तर कायम बांधून ठेवायचे असते आणि बांधून ठेवण्याचा सोपा आणि एकमेव मार्ग म्हणजे आपले काम मनापासून करीत रहाणे ! चुकून जरी देवाला व्यवहारात बघायचा मोह पडला आणि त्या मोहात कामाकडे दुर्लक्ष झाले की भक्त देवाला अंतरलाच !

'ध्येय हाच देव' असे वामन मल्हारांच्या सुशीलेला पटले ते विसाव्या शतकात; पण 'काम हाच देव' हे पुंडलिकाला हजार वर्षांपूर्वी उमजले होते. वारकरी संप्रदायाची ही उलटी खूण आपण खरी उमजून घेतली पाहिजे. या लोकांनी संन्यासाच्या उलट वृत्ती आणि कृती स्वीकारली. आत्मिक दृष्टीही संन्यासाची ठेवली नाही. 'Spiritualising political life' ही गोपाळकृष्ण गोखल्यांची आकांक्षा प्रसिद्ध आहे. या चालीवर, जरा फरक करून, असे म्हणता येईल की, 'Spiritualising the secular' हा मराठी संतांचा प्रयत्न नव्हता तर Secularising the spiritual हा त्यांचा छंद होता. त्याचा खेळ होता.

संत देवाकडे गेले नाहीत. देवाला त्यांनी आपल्यात आणला. नामदेवांनी देवाला बाळरूपाने स्वतःबरोबर जेवायला लावले. तीर्थयात्रेला निघण्यापूर्वी चंद्रभागेच्या वाळवंटी देवाचा निरोप घेतला. देवही म्हणाला, 'नामदेवा, तू नसशील त्याने मला एकटे वाटेल रे! हे बोलता बोलता देवाच्या डोळ्यात पाणी आले !'

इतकेच नाही. ज्ञानदेव समाधी घेणार म्हणून पंढरपुराहून देव आळंदीला आला. समाधिस्थानी नेताना ज्ञानदेवांना एका हाताने निवृत्तिनाथांनी धरले होते, तर दुसऱ्या हाताने देवाने धरले होते. ही भावसृष्टी म्हणजे प्रत्यक्ष-सृष्टी आहे.

संतांनी देवाला भाऊ मानले, विठाईमाउली मानले. नेहमीचा व्यवहार म्हणजे देवाशी खेळायचे केवळ निमित्त आहे, हे ओळखून ते विठ्ठलाशी खेळ मांडून राहिले. चंद्रभागेकाठी. इंद्रायणीकाठी. प्रत्येकाची जी एक जीवनाची नदी असते, तिच्याकाठी; पण खेळ मांडून राहिले.

¤

म्हणाले, भांडता का ? चिडता का ? तकतक का करता ? किती काळ भांडाल ? किती वेळ चिडाल ? किती वेळ तकतक करीत राहाल ? हे जग तुमचे नाही, तुमच्यासाठी नाही, या जगाला तुमचे भान नाही, नव्हे, या विश्वाला तुमचे काहीच नाही, हे तुम्ही कधी ओळखणार ?

तुम्ही तुमच्या इच्छेने थोडेच जगात आला आहात आणि काही नशीबवान अपवाद सोडले तर थोडेच तुमच्या इच्छेने जाणार आहात ? मग या दोन परतंत्र क्षणांच्या मधल्या भागावर किती अधिकार सांगणार ? किती मालकी सांगणार ? मालकी नाही आणि अधिकारही नाही— हे केव्हा उमजणार ? काढून टाका तो आवेग ! सोडून द्या चीड-मत्सर ! ईर्षा, महत्त्वाकांक्षा यांचा नकलीपणा आणि नाटकीपणा ओळखा.

मनाचा जडशीळपणा सोडा. डोक्यावरचे ओझे बाजूला ठेवा. त्या विठ्ठलाला बोलवा. तो काळा. कृष्णाचा अवतार ! कृष्णाने कसे स्वतःसाठी ईर्षेने काही केले नाही. जे केले ते खेळ खेळण्याच्या निर्मळ वृत्तीने. या विठ्ठलाबरोबर आपण खळू या ! खेळताना चांगले खेळावे लागते. खिलाडू वृत्तीने खेळावे लागते. ही वृत्ती खेळताखेळता अंगी मुरते. म्हणून खेळण्यासाठी जगायचे. कारण जगणे म्हणजे एक खेळ आहे. एक एक भिडू बघा ना कसे अचानक उठून गेले ! परवा बा. भ. पाटील. आज मोकाशी !

¤

समजा, असे लोकांना खेळायला बोलावले आणि कुणी आलेच नाही, तर ? नामदेवाने बोलावल्यावर ज्ञानदेव आले; पण समजा, नसते आले तर ? मग नामदेवांचा हक्काचा विठ्ठल होता. त्यांनी त्याला बोलावले असते आणि तोही लगेच आला असता. कारण नामदेवापुरते त्या विठ्ठलाला तेवढेच काम !

म्हणजे असे की विठ्ठल हा बीजगणितातील क्ष सारखा आहे. समीकरण सुटावे म्हणून आपण कसे एका बाजूला +क्ष घेतो आणि दुसऱ्या बाजूला −क्ष करून तो काढून टाकतो. बाकी शून्य करतो. म्हणजे समीकरण मुळात समसमान असतेच. फक्त ते आपले आपल्याला सिद्ध करायचे असते म्हणून या क्ष ला बोलवायचे, समीकरण सुटेपर्यंत त्याच्यासह खेळायचे आणि समाधान झाले की म्हणायचे, आता खेळ संपला, तू जा ! विठ्ठल हा असा संतांचा क्ष आहे. केव्हाही बोलवून घ्यावा, केव्हाही घालवून द्यावा असे हे संतांचे 'बीज' गणित आहे.

गमतीची आणि महत्वाची गोष्ट अशी की, हे गणित ज्याचे त्याचे स्वतःचे आणि वेगळे वेगळे असते. क्ष ची किंमत प्रत्येकाची वेगवेगळी असते. म्हणून समीकरण सोडविण्याची प्रत्येकाची 'रीत' आणि 'कृती' वेगळी वेगळी असते. प्रत्येकाचा क्ष वेगळा वेगळा असतो. प्रत्येकाचा विठ्ठल वेगळा वेगळा असतो. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ तुकाराम या संतांचा स्वतःचा विठ्ठल वेगळा वेगळाच होता. प्रत्येक वारकऱ्याचा विठ्ठल वेगळा आणि त्याचा स्वतःचाच असतो !

¤

या वेगळेपणाची जाणीव गेली एक हजार वर्षे सतत आहे म्हणून वारकरी ही एक वृत्ती-प्रवृत्ती राहिली आहे. तो संकुचित पंथ

झाला नाही.

म्हणून इथे 'गादी' नाही. शिष्यस्वामी-गुरुस्वामी अशी परंपरा नाही. कठोर यम-नियम नाहीत. 'नाही' किंवा 'नको' असे देखील फार नाही!

मग काय आहे? काय असावे? ते ज्याने त्याने ठरवावे अशी व्यक्तिविशिष्टता भारतातच काय, पण जगातल्याही अन्य कुठल्या सांप्रदायात सापडणे कठीण!

'महाराष्ट्र-धर्म' कोणता असा एक प्रश्न मागे (उत्तर-मीमांसा : ३ ;) विचारला होता. त्याचे बीजरूप उत्तर इथे मिळते. मराठी संतांनी गेली हजार वर्षे ही व्यक्ति-विशिष्टतेची परंपरा, सांप्रदायिकता न आणता जोपासली आहे.

छत्रपती शिवाजीमहाराजांनीही मराठी अस्मितेची ही खूण ओळखली होती आणि जोपासली होती असे इतिहासावरून कोणा-सही स्पष्ट होईल. स्वतः महाराजांनी; राज्याभिषेक करून घेण्यात श्रेष्ठ अस्मिता दाखवली. अंगठीएवढे असेल पण ते 'स्व' राज्य हवे, कोणा सम्राटाच्या मांडलिकीने मिळालेली सूपभर दौलत नको, हा तो विचार होता.

या विचाराने त्या काळचे मराठे भारले होते. म्हणून संभाजीमहाराजांच्या दीप्तिमान आत्मबलिदानानंतर वीस वर्षे मराठ्यांनी दिल्लीश्वराला महाराष्ट्रात स्थिर होऊ दिले नाही! त्या काळी प्रत्येकजण कार्यकर्ता आणि प्रत्येकजण नेता होता. विठ्ठल जसा प्रत्येकाचा, तसे 'स्व' राज्य देखील प्रत्येकाचे होते. एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांच्या संस्कारांनी ही खरी 'स्व-त्व' वृत्ती सतराव्या शतकात मराठ्यात बिंबली होती. हीच ती मराठी अस्मिता. अजूनही ही अस्मिता कायम आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपण तिचा नुकताच अनुभव घेतला आहे.

ही व्यक्तिविशिष्टता जर आहे, ती जर जपायची, तर मग वारी कशाला?

हे तर महाराष्ट्राचे विशेषपण आहे. सर्वांना वेगळे वेगळे वाटले तर एकत्र जमू. वेगळेपणा कायम ठेवून एकत्र जमू. त्यात समानता आहे, प्रत्येकाला मोकळा वाव आहे. सामूहिकता नाही. खुली सामुदायिकता आहे. एकनेतृत्व नाही. एकरसत्व आहे.

¤

वारी ही महाराष्ट्राची अशी 'पिकनिक' आहे. घरचे सगळे ठीक आहे. मग जरा बाहेर पडावे. निसर्गाशी खेळ मांडावा. भटकावे. भिजावे. काळ्या मातीला अंग भिडवावे. शे-पाचशे माणसात हरवून जावे. वाटल्यास मिळावे. वाटल्यास एकट्यानेच मुकाटपणे जावे. अशा वेळी आपली आपल्याशीच नव्याने गाठ पडते. ती नवी ओळख करून घ्यावी. आपापल्या विठ्ठलाच्या साक्षीने करून घ्यावी. जीवनाच्या खेळात नव्या डावासाठी ताजे व्हावे.

असे ताजे होता होता एखाद्या वेळी याच आपल्या विठ्ठलाच्या साक्षीने पुरे म्हणावे. वेगळे निघावे!

आज मोकाशी निघाले तसे. □

अवतीभवती । शरदकृष्णन्

## □ शेख अब्दुल्ला विरुद्ध केंद्र शासन

ज्या राज्यामधून विरोधी पक्षाचे शासन आहे, अशा राज्यांशी केंद्र-सरकारचे संबंध सुरळीत नाहीत आणि या ना त्या कारणाचे निमित्त करून निरनिराळे केंद्रीयमंत्री संबंधित राज्यशासनावर टीकेचे आसूड ओढत असतात. केरळ, प. बंगाल, तामिळनाडू आणि जम्मू-काश्मीर अशा चार राज्यांची सत्ता प्रबळ विरोधी पक्षाच्या हाती आहे. या चार राज्यांपैकी प. बंगाल व केरळ येथे डाव्या कम्युनिस्टांच्या हाती सत्तेची सूत्रे आहेत. तामिळनाडूमध्ये एम्. जी. रामचंद्रन यांची अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम सत्तेवर आहे, तर जम्मू-काश्मीरमध्ये शेख अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील नॅशनल कॉन्फरन्स सत्तास्थानी आहे. अलीकडे केंद्र शासनाचे काश्मीरबाबतचे धोरणही ताठर झाले असून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी काश्मीरमध्ये जाऊन शेखसाहेबांवर सडकून टीका केली होती. त्या सहसा कोणाचे नाव घेत नाहीत; परंतु शेखसाहेबांचे नाव घेऊन त्यांनी टीका केली आणि राज्यामधील अल्पसंख्य जमातींमध्ये असुरक्षिततेची भावना असल्याचा आरोप केला. मनात आणले तर केंद्र-शासन राज्यसरकार बरखास्त करू शकते हेही त्यांनी स्पष्ट केले. आता टीकेची अशी जोरदार फैर खुद्द पंतप्रधानांकडून झडल्यावर शेखसाहेबांसारखा नेता स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. त्यांनीही केंद्र सरकारवर सडकून टीका केली आणि पंतप्रधानांवर त्या हुकुमशाही वृत्तीच्या असल्याचा आरोप केला. महिन्याभरापूर्वीच आयकर खात्यातर्फे जम्मू-काश्मीरमधील अनेक उद्योगपतींच्या घरावर काळा पैसा काढण्यासाठी छापे घालण्यात आले. त्या कारवाईचे स्वरूप, ज्यांच्यावर छापे घातले गेले त्या मंडळींचे राज्य शासनाबरोबर असलेले प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध यांचा तपशील लक्षात घेता या कारवाईमागे राजकीय हेतू होता असा आरोप केला जातो आणि त्यात तथ्यांश असल्याचे जाणवते. १९४७ नंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रथमच छापे घातले गेले. आयकर खात्याचे अधिकारी जवळजवळ आठवडाभर खपत होते. सुमारे २५० कर्मचाऱ्यांनी या छाप्यांमध्ये भाग घेतला. छापे घालण्याचे हे काम चालू असताना तिखट प्रतिक्रिया व्यक्त झाल्या, आयकर खात्यांच्या कर्मचाऱ्यांवर हल्ले झाले. नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. जवळजवळ ३०-३५ अधिकारी त्या वेळी झालेल्या दगडफेकीमध्ये जखमी झाले. या छाप्यांमधून २० लाख रुपयाचे चोरटे सोने व दागदागिने हाती लागले आणि ५ कोटी रुपयांचे कर चुकवले गेल्याचे दिसून आले. जम्मू-काश्मीरमधून १९७९-८० मध्ये ४.१ कोटी रुपयाची एकूण रक्कम आयकररूपाने गोळा झाली होती. या परिस्थितीमध्ये छापे घालून जर ५ कोटी रुपये करुरूपाने मिळत असतील तर हे छापे यशस्वी झाले असेच म्हटले पाहिजे. आयकर खात्याचे एक अधिकारी के. आर. राघवन यांनी या छापे-प्रकरणाची सूत्रे हाताळली. या कारवाईमागे राजकीय कारणे असल्याचा जो आरोप

केला जातो त्याचा केंद्रीय अर्थमंत्री श्री. आर. वेंकटरामन यांनी स्पष्ट शब्दात इन्कार केला आहे. असे असले तरी नॅशनल कॉन्फरन्सशी संबंधित असलेल्या अनेक बड्या मंडळींवर तसेच शेखसाहेबांचे जवळचे नातेवाईक असलेल्या कुटुंबियांवर छापे घातले गेल्याने या कारवाईमागे राजकीय कारणे नाहीतच, असे काही ठासून म्हणता येणार नाही. शेखसाहेब आज उतरणीकडे झुकले आहेत. संपूर्ण देशाच्या संदर्भात आज जे स्थान इंदिराजींना आहे तेच स्थान जम्मू-काश्मीरपुरता विचार करता शेखसाहेबांना आहे. १९७७ मध्ये झालेल्या जम्मू-काश्मीर विधानसभा–निवडणुकीच्या वेळी शेखसाहेबांनी ते दाखवून दिले आहे. आज त्यांची उमर ७५ वर्षांची आहे. शेखसाहेब तुरुंगात असोत किंवा सत्तेवर असोत, काश्मिरी जनतेने त्यांना आपले नेते मानले आहे आणि त्यांचे ते स्थान अजूनही कायम आहे. काश्मीर शासन व केंद्र सरकार यांच्यामधील तणाव वाढल्यावर आणि आयकर खात्याच्या छाप्यांनी जोरदार वादळ उठवल्यानंतर शेखसाहेबांनी श्रीनगरच्या इकबाल पार्कमध्ये एक जाहीर सभा घेऊन केंद्र शासनावर टीकेची झोड उठवली आणि आयकर खात्याने घातलेले छापे म्हणजे आपल्या पक्षाविरुद्ध राजकीय हेतूने केलेली काळी कृती असा आरोप केला ! या पार्श्वभूमीवर ' इंडिया टुडे ' या पाक्षिकाने त्यांची मुलाखत घेतली. त्यांना विचारलेल्या अनेक प्रश्नांवर शेखसाहेबांनी मनमोकळी उत्तरे दिली. जम्मू-काश्मीरची भौगोलिक व राजकीय परिस्थिती लक्षात घेता या मुलाखतीचे विशेष मोल वाटते. मुलाखतीमधील महत्त्वाची प्रश्नोत्तरे येथे नोंदवत आहे.

प्रश्न – आयकर खात्याने जे छापे घातले ते बेकायदेशीर होते असे आपल्याला वाटते का ? या छाप्यांच्या संदर्भात राज्य शासनाला कल्पना दिली होती का ?

उत्तर – हे छापे बेकायदेशीर होते असे म्हणताच येणार नाही. या संदर्भात जे कायदे आहेत त्यांच्या आधारे कारवाई करणेही ठीक आहे; पण जम्मू-काश्मीरमध्ये जे छापे घातले गेले त्यांचे स्वरूप पाहता ते उघड उघड राजकीय हेतूनेच घातले गेले, हे मीच कशाला अगदी त्रयस्थ माणूसही सांगू शकेल. वास्तविक असे छापे घातले जात असताना राज्य शासनाला विश्वासात घेणे अत्यंत आवश्यक आहे; परंतु केवळ नाइलाज झाल्यावर अखेरच्या दिवशी आमचे सहकार्य घेण्यात आले.

प्रश्न – या कारवाईमुळे मोठ्या प्रमाणावर काळा पैसा व सोने मिळाल्याचा केंद्र सरकारचा दावा...

उत्तर – छे ! निखळ थापेबाजी आहे सगळी ! जम्मू-काश्मीर म्हणजे काही दिल्ली किंवा मुंबई नव्हे.

प्रश्न – या छापे प्रकरणी आपण बरेच अस्वस्थ झालेले दिसता.

उत्तर – मी अस्वस्थ अथवा दुःखी होण्याचा प्रश्न नाही. केंद्रशासन विरोधी पक्षांच्या राज्य सरकारांकडे कसे बघते हे या असल्या घाणेरड्या कारवाईमुळे स्पष्ट होते. त्यांना विरोधी पक्ष नकोच असेल तर त्यांना हुकूमशाही वृत्तीचे म्हणणार नाही तर काय म्हणणार ?

प्रश्न – विरोधी पक्षाचे राज्य शासन आणि केंद्र सरकार यांचे संबंध सुरळीत राहावे यासाठी तुम्ही काही प्रयत्न करणार आहात काय ?

उत्तर – असे काहीही करण्याची गरज नाही. केंद्र सरकार व राज्य शासन यांच्या संबंधांबाबत सारे काही घटनेत सुस्पष्टपणे नोंदले आहे. केंद्राने त्याची फक्त प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली की पुरेसे आहे.

प्रश्न – काश्मीरची स्वायत्तता आणि विशेष स्थान आणि या संदर्भामधील घटनेतील कलम ३७० याबाबत आपण सतत बोलत असता. त्यामुळे अन्य भारतीयांच्या मनात शंका येतात.

उत्तर – जे कलम ३०० मध्ये नमूद केले आहे त्याचे संदर्भ मी सतत सांगत असतो. काश्मीरचे स्थान विशेष आहे, हेही माझे मत आहे. आम्हाला भारतामध्ये सामील होण्याबाबत सांगण्यात आले आणि आम्ही सामीलनामा करून संरक्षण, परदेशांशी संपर्क या बाबतचे अधिकार भारताला दिले. काश्मीरची तुलना इतर राज्यांबरोबर होणार नाही. त्याचे विशेष स्थान कलम ३७० ने मान्य केले आहे, मी तसे म्हणालो तर त्यात वावगे काय ?

प्रश्न– हे विशेष स्थान किती वर्षे असावे असे आपल्याला वाटते ?

उत्तर – ते काश्मीरी जनतेने ठरवायचे आहे.

मुस्लिम समाजाबाबत शेखसाहेबांना जे प्रश्न विचारण्यात आले त्याला उत्तर देताना ते म्हणाले,' या समाजामध्ये असुरक्षिततेची भावना आहे आणि वातावरण संशयाचे आहे; ते दूर होणे अत्यावश्यक आहे.' काश्मीरमधील सत्तांतराबाबतच्या प्रश्नांना उत्तरे देताना ते म्हणाले,'मी आणखी केवळ दोन वर्षे सत्तेवर राहीन. त्यानंतर काय करायचे ते जनतेने ठरवावयाचे आहे. माझ्या पक्षापुरते बोलायचे तर सत्तेची सूत्रे माझ्या मुलाकडे दिलेली आहेत. त्याला राजकारणापासून परावृत्त करण्याचा मी प्रयत्न केला. ते जमले नाही आणि पक्षामध्ये त्याने राजकारणात यावे अशी भावना दिसून आली.' स्वतःच्या नातेवाइकांखेरीज इतरांना उत्तेजन देऊन पुढे आणणे जरूर असल्याचे त्यांनी तत्त्वतः मान्य केले; पण प्रत्यक्षात मात्र नॅशनल कॉन्फरन्सची सूत्रे आपला मुलगा डॉ. फरुक शेख आणि जावई जी. एम्. शहा यांच्या हातीच दिली. त्यांचा जावई महत्त्वाकांक्षी असला तरी शेख त्याला जुन्या पिढीमधील मानतात. सत्तांतराचा विचार समोर येतो तेव्हा त्यांच्या नजरेसमोर केवळ डॉ. फरुक शेख यांचेच नाव असते.

## ☐ जनता सरकार जमान्यामधील सुवर्णलिलाव

रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर श्री. के. आर. पुरी यांनी, जनता सरकारच्या राजवटीच्याबाबत झालेल्या सुवर्णलिलावाचा ज्या मोजक्या मंडळींनी लाभ घेतला, त्याची परिपूर्ण चौकशी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत, या संदर्भात सादर केलेल्या अहवालाच्या दुसऱ्या हप्त्यात नोंदवले आहे. याबाबतच्या अहवालामध्ये त्यांनी दोन उदाहरणांचा सुस्पष्ट उल्लेख केला आहे. १३·४६ कोटी रुपये रोख देऊन दोन व्यक्तींना सुवर्ण देण्यात आले. हा व्यवहार करणाऱ्या व्यक्तींना जास्तीत जास्त लाभ दिला गेला आणि सुवर्ण-विक्रीबाबतचे काही नियमही त्यांच्या संदर्भात बाजूला ठेवले गेले. या व्यवहारामध्ये काळा पैसा वापरला गेल्याचा आक्षेपही श्री. पुरी यांनी घेतला आहे. या व्यवहारामध्ये रोखीचा जो पैसा खेळवला गेला त्याची

चौकशी झालीच पाहिजे, असे त्यांचे मत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोख रकमेचा भरणा करणाऱ्या मंडळींनाही, पैसा कोठून आणला असे विचारले कसे गेले नाही, याचेही त्यांना आश्चर्य वाटते. या सुवर्णविक्री व्यवहारामध्ये रिझर्व बँकेने त्या वेळच्या भावाने ८६ कोटी रुपयांचे सुवर्ण विकले. लिलावाचे एकूण १४ हप्ते झाले आणि या १४ हप्त्यांमध्ये मिळून १२,९५६ टन सोने विकले गेले. या सुवर्णविक्री-व्यवहाराला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आली नव्हती. तेव्हाचे अर्थमंत्री एच. एम. पटेल व पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी आपसात हा निर्णय घेतलेला होता. १९७८–७९ सालचे केंद्रीय अंदाजपत्रक ज्या वेळी सादर करण्यात आले त्या वेळी मंत्रिमंडळाला सुवर्णलिलावाची कल्पना आली. सुवर्णाची जी आतरराष्ट्रीय किंमत असते, त्यापेक्षा ३० टक्के जास्त रक्कम धरून विक्रीसाठी काढलेल्या सुवर्णाची किंमत निश्चित करण्यात आली; परंतु ही जी किमान किंमत ठरवण्यात आली होती, त्यापेक्षाही खालच्या किंमतीने सुवर्ण विकले गेले. या निर्णयाला कोण जबाबदार होते याची चौकशी होणे जरूर असल्याचे मत श्री. पुरी यांनी नोदवले आहे. एकूण सुवर्ण विक्रीपैकी ८५ टक्के सुवर्ण या किमान किंमतीहून कमी किंमतीत विकले गेले. या संदर्भात श्री. पुरी यांनी रिझर्व बँकेच्या तेव्हाच्या गव्हर्नरवरही टीका केली आहे. केंद्रीय शासनाकडून लेखी आदेश नसतानाही सुवर्ण विक्रीचे आठ हप्ते तत्कालीन गव्हर्नरांनी पूर्ण केले. सुवर्ण विक्रीच्या या एकूण व्यवहारामध्ये ज्या फर्म्स आणि व्यक्तीबाबत आपल्याला संशय वाटतो अशा फर्म्सची, तसेच व्यक्तींची नावे श्री. पुरी यांनी आपल्या अहवालामध्ये घातली आहेत. ही नावे मिळवण्यासाठी श्री. पुरी याना रिझर्व बँकेमार्फत लेखी हमी द्यावी लागली. आपण ही नावे घोषित करणार नाही, असे लेखी दिल्यावरच या सुवर्णविक्रीव्यवहारामध्ये पैसा गुतवणारांची नावे त्यांना बँकेकडून मिळू शकली. या व्यवहारामध्ये अनेक फर्म्सनी एकत्र येऊन सिंडिकेट स्थापन केली. ज्यांना सुवर्णव्यवहाराबाबतचे परवाने आहेत अशा फर्म्सनाच या व्यवहारात भाग घेता येणार होता; परंतु ज्यांचा सुवर्णव्यवहाराशी काहीही संबंध नाही किंवा याबाबतचे परवानेही ज्यांच्याकडे नाहीत अशा ३ मोठ्या फर्म्सनी या व्यवहारात कोट्यवधी रुपयांची गुतवणूक केल्याचे दिसून आले आहे. या फर्म्सनी प्रत्यक्ष व्यवहार न करता परवानाधारकांच्या सिंडिकेटला पैसा पुरवल्याचे दिसून येते. त्यामुळे नियमांचा भंग झाला असे म्हणता येत नसले तरी गैरव्यवहार झाला याबाबत संदेह नाही. सुवर्णव्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणावर गुतलेल्या सहा मोठ्या व्यापारांच्या सुवर्णखरेदी-विक्री व्यवहाराची श्री. पुरी यानी तपासणी केली असता नोव्हेंबर १९७७ ते ऑक्टोबर १९७८ या काळात या व्यापाऱ्यांनी ५० कोटी रुपयाचे सुवर्ण खरेदी केल्याचे दिसून आले. यापैकी लिलावामध्ये खरेदी केलेले सुवर्ण किती, याचा तपशील मात्र मिळू शकत नाही. सुवर्णलिलावामध्ये सुवर्ण खरेदी करणाऱ्या ५ फर्म्स केवळ कागदोपत्री अस्तित्वात असून दिलेले पत्ते साफ खोटे असल्याचे आढळून आले आहे. या व्यवहारामध्ये ८,५०० व्यक्ती व फर्म्सनी भाग घेतला; परंतु केवळ तीन हजार फर्म्स किंवा व्यक्तीच लिलावामध्ये यशस्वी बोली बोलू शकल्या. या तीन हजार व्यक्ती व फर्म्सची छाननी केली असता त्यांच्याजवळ सुवर्णव्यवहाराचे परवाने असल्याचे जरूर दिसून येते. तथापि यापैकी कित्येकाजवळ अशा व्यवहारासाठी जी आर्थिक ताकद लागते तिचा ठावठिकाणा नव्हता. याचाच अर्थ या व्यक्तींना आणि फर्म्सना पुढे करून व्यवहार करण्यात आले. पडद्यामागील या मंडळींनी सुवर्णविक्रीव्यवहारामधील मलई लाटली. त्याना शोधून पुढे आणले पाहिजे, असे मत पुरी यांनी नोदले आहे. विकल्या गेलेल्या सुवर्णाची ज्या झपाट्याने विल्हेवाट लावण्यात आली त्यावरून या सुवर्णाचा लगोलग निचरा करण्याची कशी सुसज्ज यंत्रणा तयार ठेवण्यात आली होती याचे स्वरूप स्पष्ट होते. विकल्या गेलेल्या सुवर्णाचे लगोलग दागिने बनवण्यात आले. आज ज्याची विक्री झाली त्या सुवर्णाचे दागिने तयार करून ते दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी अंबाला, कानपूर, अलाहाबाद अशा दूरदूरच्या ठिकाणी विक्रीसाठी पाठवण्यात आले. हे दागिने बनवणाराचा या व्यवहाराच्या आधीचा एकंदर व्यवहार पाहता, एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुवर्ण खरेदी करून त्यांचे दागिने बनवणे या मंडळींना जवळजवळ अशक्य होते. कोणता तरी अदृश्य हात या व्यवहारात त्यांच्या पाठीशी उभा होता. वानगीदाखल येथे श्री. पुरी यांनी एक उदाहरणही दिले आहे. ते म्हणतात, मुंबईच्या १६० व्यापाऱ्यांनी १,२०० किलोग्रॅम सोने खरेदी केले. सहा महिन्यात लिलावामध्ये एवढे सोने खरेदी करणाऱ्या या व्यापाऱ्यानी त्याआधीच्या वर्षात म्हणजे १९७७ साली केवळ २२० किलो सुवर्णाचे व्यवहार केले होते. एकाएकी दहा पट व्यवहार वाढवण्याइतकी शक्ती या मंडळींना कशी प्राप्त झाली असा प्रश्न आपल्याला पडतो, असे पुरी म्हणतात.

त्यांचा हा अहवाल त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाला सादर केला आहे. याबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाची एक चौसदस्य समिती असून त्या समितीमध्ये आर. व्यंकटरामन, प्रणव मुखर्जी, ए. व्ही. नरसिंहराव व श्री. शिवशंकर या चार मंत्र्याचा समावेश आहे. या २०० पानी *अहवालावर कशा स्वरूपाची कारवाई करायची याबाबतची शिफारस*


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

ही समिती करील. कदाचित झाली चौकशी पुरेशी आहे असे मानून अहवालदप्तरी दाखल केला जाईल. या अहवालाच्या निमित्ताने हा एकूण व्यवहार कसा झाला याची तपशीलवार नोद झाली हा किमान लाभ म्हणावा लागेल.

## □ संध्याछाया भिवविती हृदया

फेडरेशन ऑफ पेन्शनर्स असोसिएशन नावाच्या सरकारी सेवानिवृत्त मंडळीच्या संस्थेचे एक अधिवेशन अलीकडेच मद्रास येथे भरले होते. सरकारने आपल्या सेवानिवृत्ताच्या बाबतीत उदार दृष्टिकोण स्वीकारावा आणि बदलत्या आर्थिक परिस्थितीशी जमवून घेऊन निदान त्यांच्या किमान गरजा पूर्ण करण्याइतकी आर्थिक शक्ति सेवानिवृत्त सेवकाला प्राप्त होईल असे पहावे, असे आवाहन या परिषदेमध्ये करण्यात आले. केन्द्रीय अर्थखात्याच्या आकडेवारीप्रमाणे केन्द्र सरकारच्या सेवानिवृत्ती-वेतनाचा लाभ घेणारे सुमारे १२ लाख ५० हजार सेवानिवृत्त आहेत. यामध्ये रेल्वे आणि संरक्षण खात्यामधील सेवकांचा समावेश नाही. या अधिवेशनामध्ये या आकडेवारीचा तपशील देण्यात आला. केन्द्र सरकार व विविध राज्यसरकारे याचे मिळून सुमारे ७१ लाख सेवानिवृत्त आज हयात असून निवृत्तीवेतनावर कसेबसे जीवन जगत आहेत. तुटपुंजे आर्थिक उत्पन्न, उतार वयामुळे निर्माण होणाऱ्या तब्बेतीच्या तक्रारी आणि कुटुंबापासून आणि समाजापासून आपण दूर पडल्याची जाणीव, यामुळे बहुतेक पेन्शनर्स मोठ्या विचित्र मानसिक अवस्थेत असतात. डॉ. जगन्नाथन व डॉ. सी. एम. पलवा या दोन तज्ज्ञानी सेवानिवृत्त मंडळीच्या भेटीगाठी घेऊन एक चाचणी अहवाल तयार केला. तोही मद्रास अधिवेशनामध्ये चर्चिला गेला. या दोघानी एकूण एक हजार सेवानिवृत्तांची गाठ घेतली. गाठ घेतलेल्यापैकी ९० टक्के पुरूष व १० टक्के महिला होत्या. या पाहणीमध्ये असेही आढळून आले की, सेवानिवृत्त पुरूषांपेक्षा सेवानिवृत्त महिला बदललेल्या परिस्थितीमध्ये कौटुंबिक जीवनात सहज सामावल्या जातात. किंबहुना सेवानिवृत्त होताच घरात त्यांच्यासाठी नवीन काम वाढून ठेवलेले असते. कधी लेकीचे बाळंतपण तर कधी नातवंडाचे शिक्षण, कधी सुनेची गरज म्हणून घरकाम; अशासारख्या कामांमध्ये त्या सहजगत्या ओढल्या जातात. बहुतेक पुरूषाना त्यांनी हयातभर केलेल्या कामाखेरीच अन्य काही येत नसल्याने पुढे काय करायचे हा त्यांना मोठाच प्रश्न असतो. सेवानिवृत्त म्हणजे 'नको असलेला माणूस' अशी भावना त्यांच्या मनात लवकर बळवते. परिणामी त्यांच्या तब्बेतीवरही लवकर परिणाम होतो.

सेवानिवृत्तीनंतर लगोलग निवृत्तीवेतन सुरू होण्याबाबत पुष्कळ सुधारणा झाली असली तरी अद्यापही सेवानिवृत्तीनंतर वर्ष-वर्ष ज्यांना थांबावे लागले आहे अशी मंडळीही खूप आहेत. ज्या मंडळीच्या मुलाखती घेण्यात आल्या त्या सेवानिवृत्तांपैकी ५९० मंडळीना म्हणजेच सुमारे ५९ टक्के मंडळीना आपले पहिले निवृत्तीवेतन मिळण्यासाठी तीन महिने ते तीन वर्षेपर्यंत वाट पहावी लागली. म्हणजे लगोलग निवृत्तीवेतन सुरू करण्याबाबत अजून किती उदंड ढिलाई होते हेच स्पष्ट होते. निवृत्ती सेवकांना निवृत्तीवेतन पुरते का, असा प्रश्न विचारला असता ९५ टक्के व्यक्तीनी निवृत्तीवेतन अपुरे असल्याचे बोलून दाखवले. अर्थात एकंदर आर्थिक परिस्थिती लक्षात घेता याबाबत फारसे काही करता येण्यासारखे नाही. ज्या ५ टक्के मंडळीना निवृत्तीवेतन पुरेसे वाटते ती भाग्यवान म्हटली पाहिजेत. निवृत्तीवेतन पुरत नसल्याने इच्छा नसूनही अथवा तब्येत साथ देत नसतानाही सुमारे १५ टक्के सेवानिवृत्ताना पुन्हा काही काम करुन द्रव्यार्जन करावे लागते. केवळ ३ टक्के लोक वेळ चांगला जावा या मुख्य हेतूने काम करतात. तर काही सेवानिवृत्ताचे वेतन इतके अपुरे असते की त्यांना मुलाबाळांवर अवलंबून रहावेच लागते.

या सेवानिवृत्ताचे कौटुंबिक आयुष्य कसे असते ? याबाबत विचारलेल्या प्रश्नांना मिळालेली उत्तरे, कौटुंबिक जिव्हाळा आणि जीवन यामध्ये बदलत्या काळाबरोबर जे बदल पहावयास मिळतात त्याचे नेमके दर्शन घडवतात. ७५ टक्के सेवानिवृत्तांना आपल्या मुलाबाळामध्ये राहणे आवडते. परंतु पटत नसल्याने त्यांपैकी ४० टक्के सेवानिवृत्त कसेबसे दिवस ढकलतात. वेगळे राहण्याची इच्छा असली तरी आर्थिक व शारीरिक क्षमता नसते. इलाज नाही म्हणून मुलाजवळ राहून उरलेले आयुष्य संपवायचे असा हा प्रकार असतो. उरलेल्या ३० टक्के मंडळीना कुटुंबियांकडून बरी वागणूक मिळते. ज्या २५ टक्के सेवानिवृत्ताना वेगळे राहवेसे वाटते त्यांपैकी बहुतेकांचा जीवनसाथी हयात असतो. म्हणजे पती-पत्नी दोघेही असतात. तेव्हा एकमेकांना आधार देत आपण एकत्र राहू शकू असे त्यांना वाटते.

ही मंडळी आयुष्याच्या अखेरच्या पर्वात असल्याने आरोग्यविषयक तक्रारी असतातच. विशेषत: रक्तदाब, मधुमेह, सांधेदुखी या विकारांचा त्याना त्रास होतो. आपले आयुष्य समाधानात गेले का ? या प्रश्नाला फक्त १५ टक्के मंडळी होकारात्मक उत्तर देऊ शकली. बाकीच्या मंडळीच्या वाट्याला सुखापेक्षा दुःख अधिक आले; पण जे वाट्याला आले ते स्वीकारून ही असंख्य मंडळी आज जीवनाच्या अखेरच्या टप्प्यावर उभी आहेत. कुटुंबासाठी समाजासाठी व देशासाठी त्यांनी बरेच काही केले आहे. हे ऋण शक्य तितक्या प्रमाणात कुटुंबियांनी समाजाने व शासनाने फेडावे अशी अपेक्षा त्यांनी सामुदायिकरीत्या व्यक्त केली तर त्यात काही फार वावगे आहे असे म्हणता येणार नाही. □

पावसामुळे, अपघातामुळे, तांत्रिक बिघाडामुळे अनेकदा रेल्वेच्या लोकल गाड्यांना उशीर होतो. काही वेळा गाड्या रद्दही केल्या जातात. प्रवाशांची मोठी गैरसोय होते. मग प्रवासी खवळतात. रेल्वेची नासधूस करतात. गाड्या चालविणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच मारहाण करून आपल्या संतापाचे प्रदर्शन करतात; पण या रेल्वे कर्मचाऱ्यांच्याही काही अडचणी असतात, गाऱ्हाणी असतात. मुबईच्या मध्य रेल्वे–लोकलसच्या काही मोटरमन्सच्या याच संदर्भात घेतलेल्या मुलाखती येथे देत आहोत.

# मध्य रेल्वेची बदनाम लोकल वाहतूक

प्रा. चंद्रशेखर राजे

इ. स. १८५३ मध्ये जेव्हा मुबई–ठाणे रेल्वे प्रवासी वाहतूक सुरू झाली त्या वेळेस सारे भारतीय थरारून गेले. बैलाशिवाय, हत्ती–घोड्याशिवाय एखादे वाहन चालू शकते यावर त्यांचा विश्वासच बसत नव्हता. हा अविश्वास 'साहेब कसा नकली रं। बिनबैलाची गाडी कसा ढकली रं॥' या ओळीतून त्यांनी व्यक्त केला. आज अखंडपणे धावणाऱ्या आगगाड्या पाहिल्या, त्याचे आपल्या जीवनातील महत्त्वाचे स्थान लक्षात घेतले की, या ओळी वाचून गंमत वाटते. मुबई आणि उपनगरातील रहिवाशांच्या जीवनात सूर्योदय आणि सूर्यास्त जेवढे अटळ आणि अपरिहार्य, तेवढाच लोकलचा प्रवास अटळ आणि आवश्यक झाला आहे. आज उपनगरी वाहतूक हा साऱ्याच्याच डोकेदुखीचा विषय झाला आहे. मध्य रेल्वेची लोकलवाहतूक हा तर कर्जत–कल्याणपासून येणाऱ्या साऱ्या प्रवाशाच्या टीकेचा विषय बनला आहे. जेव्हा एखाद्या लोकलला अपघात होतो तेव्हा तर विचारूच नका, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जाते. अपघात हा अपवाद आहे; पण लोकल्सना उशीर होणे ही तर नित्याचीच बाब झाली आहे पावसाळ्यात रुळावर पाणी साठल्यामुळे, वीजप्रवाह खंडित झाल्यामुळे, गाडी नादुरुस्त झाल्यामुळे, कारण आहे म्हणून किंवा कोणतेच कारण नाही म्हणून, लोकल्सना उशीर होतो. फलाटावर वाट पाहणारे, गाडीत असणारे, सारे प्रवासी रेल्वेमंत्र्यापासून साऱ्यांनाच मनसोक्त शिव्या देतात; पण सर्रास जबाबदार धरले जाते ते गार्डस्–ड्रायव्हर्सना. या दोघांमुळेच गाड्याना उशीर होतो, हेच या साऱ्या गोंधळाला जबाबदार आहेत, असाच साऱ्यांचा दावा असतो. त्यामुळे या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन पाहणी करावी असे वाटू लागले.

ठाणे, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ या गावातून रेल्वे-कर्मचाऱ्यांची संख्या खूप आहे. त्यात गार्डस् आणि ड्रायव्हर्सही अनेक आहेत. या साऱ्या गैरव्यवस्थेत अनियमिततेत गार्डस् आणि ड्रायव्हर्सचा वाटा किती आहे हे एकदा पाहू या तर खरे, असे ठरवून अनेकाशी बोलण्याचा प्रयत्न केला; पण जुजबी माहिती सांगण्यापलीकडे कोणी मोकळेपणाने बोलायलाच तयार नव्हता. 'खात्याची परवानगी हवी,' 'वृत्तपत्रांना काहीही सांगण्याची बंदी आहे' इत्यादि इत्यादि खऱ्या वा खोट्या सबबी सांगितल्या गेल्या. कामाला सुरुवात केल्यानंतर ओळखीला, मैत्रीला आवाहन केले. हळूहळू अडसर दूर होऊ लागले. माणसे बोलू लागली. ही माणसे सांगायला तयार का होत नव्हती, याचे एक कारण एकाच्या बोलण्यातून मिळाले. काही वर्षांपूर्वी एका इंग्रजी वृत्तपत्रात एक बातमी अगदी चौकटीच्या मखरात बसून आली. 'ज्या टॅक्सीत ड्रायव्हरसकट पाचच माणसे असतात त्या टॅक्सीला वायपर (पावसाळ्यात) लावणे आवश्यक असते; पण ज्या लोकलमध्ये पाच हजार माणसे असतात त्या लोकलच्या ड्रायव्हरसमोर वायपर नसतो !' ही बातमी मध्य रेल्वेच्या एका बड्या साबच्या वाचनात आली आणि मग खात्याकडून एक फतवा निघाला, 'असे लक्षात आले आहे की, काही ड्रायव्हर्स आणि गार्डस् आपल्या केबिनमध्ये अनधिकृत लोकाना प्रवास करू देतात. असे करताना जर कोणी आढळला तर त्याच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल !' वायपरचा महत्त्वाचा मुद्दा ठेवला बाजूलाच, वर तंबी दिली गेली. त्या वेळेपासून साऱ्यांनी कानाला खडा लावला की, आपल्या कॅबमध्ये कोणाला–इतरांना–घ्यावयाचे नाही आणि आपल्या अडी–अडचणी काय आहेत त्यांचा उच्चार कोणाकडेही करावयाचा नाही. एकजण म्हणाला, 'आमची अवस्था त्या तीन माकडासारखी झाली आहे !' अशा परिस्थितीत या साऱ्याना बोलके करावे लागले. ज्याच्या ज्यांच्या मुलाखती घेतल्या त्यांची नावे देता येत नाहीत आणि कोणी कोणता वेगळा आणि चांगला मुद्दा मांडला हे नावानिशी लिहिता येत नाही या साऱ्यांनी जे सांगितले ते एकत्र करूनच पुढे मांडत आहे.

मध्य रेल्वेची लोकल–वाहतूक ही चार खांबावर उभी राहिली आहे. (एका मित्राच्या मते 'या चार जणांच्या खांद्यावर आमची आणि आमच्या नोकरीची तिरडी ठेवली आहे'). या चारांपैकी कोण अधिक महत्त्वाचा, कोण गौण हे ठरविणे शक्य नाही आणि योग्यही नाही. मध्य रेल्वेचीच निवड का केली असा प्रश्न निर्माण

होईल. माझा नित्य संबंध मध्य रेल्वेशी आणि सर्वांत बदनाम अशी लोकल–वाहतूक समजली जाते तीही मध्य रेल्वेचीच ! लोकल–वाहतुकीशी अनेक घटक निगडित आहेत; पण त्या साऱ्यांचा समावेश करणे अशक्य असल्यामुळे मुख्य (ड्रायव्हर, गार्ड, असि. स्टेशनमास्टर व कुर्ला कारशेडमधील तंत्रज्ञ) आणि ठळक घटकांचाच विचार येथे केला आहे. अर्थात प्रवासी हा सर्वांत महत्त्वाचा ! मूळ कारणच ते आणि त्यालाच कळावे म्हणून तर हा सारा खटाटोप. गाडीला जो गती देतो त्याला म्हणजे ड्रायव्हरलाच–प्रथम भेटू या.

ड्रायव्हर म्हणून निवड झाल्यानंतर त्याला कोणते शिक्षण मिळते, त्याला काय काय करावे लागते या मुद्द्यापासून चर्चेला सुरुवात झाली. एकदा ड्रायव्हर निवड झाली की त्याला वाहतुकीचे नियम शिकविले जातात. त्याची लेखी व तोंडी परीक्षा घेतली जाते लोकलवर येण्यापूर्वी त्याला सर्व प्रकारच्या गाड्या चालविण्याचे प्रत्यक्ष ज्ञान मिळते.. अनुभव मिळतो. लोकलचा ड्रायव्हर (रेल्वेच्या परिभाषेत 'मोटरमन') हा लोकलवर घेताना तावून–सुलावून निघालेला असतो. त्याला पारखून निवडले जाते. नोकरीला लागल्यानंतर पंधरा वर्षांच्या दीर्घ अनुभवानंतर त्याची नेमणूक लोकलवर होते.

प्रवाशांचा असा आरोप आहे की, तुम्ही ज्यादा मोबदला मिळावा' अधिक काम अधिक दाम मिळावेत म्हणून गाड्यांचा खोळंबा करता, असे मी म्हटल्याबरोबर साऱ्यांनी एकमुखाने प्रवाशांच्या या अज्ञानाबद्दल आश्चर्य तर व्यक्त केलेच; पण काहींना त्याचा रागही आला. 'आमचे वेळापत्रक केलेले असते. ते पूर्ण झाल्यानंतरच केलेल्या अधिक कामाचे पैसे आम्हाला मिळतात,' एकजण सांगू लागला की, 'गाड्या उशिरा येणे–जाणे हे मोटरमनच्या (व गार्डच्याही) तोटयाचे असते. ठराविक फेऱ्या करण्यातच आमचा फायदा असतो. दरवर्षी पावसाळ्यात आमचा पन्नास ते साठ रुपयाचा मोबदला (महिना) कमी होतो. कारण कोणतेही असो, लोकलचे चाक थांबले की आमचे नुकसान होते. गाडी चालू राहण्यातच आमचा फायदा असतो. तसेच, आमच्या कामात ' Risk of life and job ' आहे हेही ध्यानात घ्या !' ते पुढे म्हणाले, 'आमची नोकरी अनियमित–नियमित–अनियमित आहेच; पण ती अनैसर्गिकही आहे. आमच्या या अनियमित आणि अनैसर्गिक कामाचा असह्य ताण पडल्यामुळे आयुर्मयादा तर कमी होतेच, पण सतत या ताणाखाली अनेक वर्षे काम केल्यामुळे काहीजण हे काम करायला असमर्थ ठरतात ! रेल्वे त्याला काढून टाकीत नाही. त्याला दुसरे काम दिले जाते. ते काम हलके असते-दोन्ही दृष्टींनी. शरिरावर आणि मनावर पडणाऱ्या ताणाच्या दृष्टीने आणि खिशात पडणाऱ्या पगाराच्याही दृष्टीने ! मोटरमन सर्वतोपरी कार्यक्षम असलाच पाहिजे. त्याची दृष्टी, त्याची नजर, त्याचा जोम, उत्साह सारे शंभर टक्के कार्यक्षम हवे, तरच तो लोकलवर काम करू शकेल. तुम्हाला आश्चर्य वाटेल, तुमचा विश्वासही बसणार नाही आमच्यावर की, आम्हाला साप्ताहिक सुटी ही चीजच ठाऊक नाही ! आम्हाला ३६५ दिवस काम असते. आमच्या वेळापत्रकाची आखणी अशी असते की, महिन्यातून पाच–सहा दिवस विश्रांती मिळावी. आम्हाला 'रविवार' ठाऊक नाही ! रविवार म्हणजे बाबा घरी, हे आमच्या मुलांसाठी नाही. काम नाही म्हणजे 'ऑफ' ! साप्ताहिक सुट्टीचा दिवस सटवीने आमच्या कपाळावर लिहिलाच नाही ! त्याचप्रमाणे जयंती मयंती, सणवार इत्यादींबद्दल सुट्टी नाही. वर्षांतून ९ दिवस (पूर्वी फक्त ३ दिवस होते) महत्त्वाचे म्हणून त्या दिवसांचा पगार मिळतो. रजा मिळत नाही. उदा. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर, दसरा, दिवाळी. अशा या दिवशी काम करावे लागले तर दर दिवसाला रु. २५।- ( त्याहून अधिक नाही) अशी भरपाई मिळते. या रु. २२५।- ला बोनस म्हणू नका वा ज्यादा कामाचा मोबदला मानू नका ! दांडी मारण्याचे सौख्य, चैन आम्हाला नाही. त्यातली मजा, गंमत, थ्रिल यापासून आम्ही वंचित आहोत. रविवार जसा आमच्यासाठी नाही, त्याचप्रमाणे दसरा–दिवाळीसारखे सण घरी राहून आनंदाने कुटुंबियांच्या सान्निध्यात घालविण्याचे सौख्यही नाही ! मुलांच्या शाळा–कॉलेजांना सुट्या लागल्या चला गावाकडे, चला माथेरानला, महाबळेश्वरला हे आमच्यासाठी नाही. आम्हीच जर रजेवर गेलो तर मामाच्या गावाला नेणार कोण ?'

### काही झाले तरी कामात कुचराई नाही

'या साऱ्याचा विचार करता तुम्हाला मिळणारे वेतन पुरेसे, समाधानकारक आहे काय,' असे विचारले असता उत्तर मिळाले– 'आम्हाला मिळणारे वेतन पुरेसे तर नाहीच आणि समाधानकारक तर नाहीच नाही. आमच्या कामाची तुलना कोणाच्याही कामाशी करता येणार नाही, त्यामुळे हे ठरविणार कसे ? माझी शैक्षणिक लायकी, नोकरीची वर्षेच गृहीत धरली जाऊन पगार मिळतो. माझ्यावर असणारी हजारो प्रवाशांच्या जीवित-वित्ताची जबाबदारी असणारे तांत्रिक ज्ञान व कौशल्य या गोष्टींचा विचारही केला जात नाही. बँकेतला कारकून आणि मोटरमन यांच्यात खूप तफावत आहे,' एकजण सांगू लागला, 'आम्ही दोघे मित्र एकाच वेळेला नोकरीला लागलो. मी रेल्वेत लागलो आणि त्याला मिळाली बँक. त्याच्या आणि माझ्या पगारात सुमारे ६०० रु. चा फरक आहे. म्हणून त्याला माझ्यापेक्षा रु. ६००।– अधिक मिळतात, हे लक्षात घ्या. उगीच गैरसमज करून घेऊ नका. शिवाय त्याला दिवसपाळी, रात्रपाळी अशी ड्यूटी नसते. तो पंख्याखाली बसून काम करतो. मला सतत उभे राहून एकाग्र चित्ताने काम करावे लागते.' हे सारे तुम्हाला कळते, जाणवतो ही भयानक तफावत तुमच्या लक्षात येते याचा तुमच्या कामावर काही परिणाम होतो का ? या प्रश्नाला त्यांनी दिलेले उत्तर त्यांच्या मनोवृत्तीचे निदर्शक आहे. अगदी स्पष्टपणे प्रत्येकाने 'होतो' असेच उत्तर दिले; 'पण मागाहून सवय होते' अशी पुस्तीही जोडली; 'पण म्हणून आम्ही कामात कुचराई करतो, असे समजू नका. तशी कुचराई आम्हाला करताच येत नाही. कारण प्रवाशांचे प्राण जसे आमच्या ताब्यात, हातात असतात तसा आमच्याही प्राणाचा, जीविताचा प्रश्न त्यात गुंतलेला असतो. कुचराई करणे, असंतुष्ट राहून वैताग, राग व्यक्त करणे आम्हालाच परवडणारे नाही.'

तुम्ही घराबाहेर पडता, तुमचे काम गतिमान वाहनाबरोबर असते, तुम्हाला वेगवेगळ्या स्टेशन्सवर मुक्काम करावा लागतो तेव्हा तुमची व्यवस्था कशी केली जाते? या प्रश्नावर साऱ्यांनी एकमुखाने सांगितले की, महत्त्वाच्या स्टेशन्सवर असणारी व्यवस्था उदा. विश्रांतिगृहे, स्वयंपाकाची व्यवस्था चांगली आहे. त्या सोयींबद्दल सारेच समाधानी दिसले. तुमच्या राहण्याची व्यवस्था ज्याला 'स्टाफ क्वॉर्टर्स' म्हणतात

ती असताना तुम्ही काहीजण अन्यत्र का राहता ? अशा जागा कामावर येण्या–जाण्यासाठी सोयीस्कर नाहीत का ? या प्रश्नाला मिळालेली उत्तरे मात्र वेगवेगळी आहेत. त्या सान्यांचा तपशीलवार उल्लेख करता येत नाही. सारांश रुपाने सांगायचे झाले तर असे सागता येईल की, अशा जागांची संख्या पुरेशी नाही. क्वार्टर्समध्ये राहणे म्हणजे आपले कार्यालय, आपले कामच घरात आणणे असे आहे. घर आणि ऑफीस ही वेगळी रहात नाहीत. तोच विषय, तेच चेहरे सदासर्वकाळ ऐकावे, पहावे लागतात. क्वार्टर्सबाहेर राहणारे वेगळ्या वातावरणाचा लाभ घेऊ शकतात, त्याचे शेजारी वेगवेगळ्या पेशातले असतात. त्यामुळे जीवनातला तोचतोपणा, एकसुरीपणा कमी होतो. ड्रायव्हर्स, गार्डस्, मोटरमेन व्यसनी असतात, छदीफंदी असतात, विशेषतः दारू ही त्यांची सखी सोबतीण असते. (म्हणून इतरत्र राहतात का ?), सतत नशेत असल्यामुळे अपघात होतात असे अनेकांचे म्हणणे आहे. त्यावर तुमचे मत काय ? तुम्ही पिता काय ? इतर कितीजण पितात ? या माझ्या प्रश्नाचा परिणाम अपेक्षित असाच झाला. एकजण तर रागाने लालीलाल झाला. त्याने तर सान्या समाजालाच आव्हान दिले. तो पुढे म्हणाला, 'माझे वय आता चाळीस आहे. मी अजूनपर्यंत दारूच्या थेंबालाही स्पर्श केला नाही. माझ्यासारखे आमच्याकडे बहुसंख्य आहेत !' दुसऱ्यानी हा प्रश्न फारसा मनाला लावून घेतला नाही. त्यांनी आपापल्यापरीने या प्रश्नाची उत्तरे दिली. त्याचा मथितार्थ असा, व्यसने करणारी मंडळी फारशी नाहीत. मुंबई व उपनगर लोकल वाहतूक करणारे ३०० मोटरमेन आहेत. सारेच एकमेकांना जवळून ओळखतात. ज्याना अट्टल दारुडे म्हणू असे या ३०० पैकी फक्त चार–पाचजण असतील. जुगार, बाई, दारू इ. चे व्यसनी 'नही से बराबर' आहेत. पूर्वी अनेकजण दारूडे होते. त्यावेळेस ही नोकरी करणारा वर्ग अशिक्षित होता, समाजातल्या तळागाळातला होता. त्यात अँग्लो इंडियन्सचे प्रमाण अधिक होते. आज समाजातील सान्या थरातील माणसे या नोकरीत आहेत. समाजाने जनतेने घाबरून जावे, प्रवाशांनी जीव मुठीत घरून प्रवास करावा, लोकलमध्ये प्रवेश करण्याअगोदर मोटरमन (वा गार्ड) कशा अवस्थेत आहे हे पाहून गाडीत पाय टाकावा अशी परिस्थिती आज अजिबात नाही.

## रेल्वे अपघातांना जबाबदार कोण ?

कोणत्या कारणामुळे अपघात होतात ? या प्रश्नाला सान्यांनीच महत्त्व दिले. त्याचे म्हणणे असे : धावणारे, गतिमान (Moving vehicle) वाहन असेल तेथे अपघात होतोच. विमान, ट्रक, कार, एस्. टी. बसेस इत्यादी वाहनाचे होणारे अपघात पाहिले की तुमच्या लक्षात येईल की, रेल्वे-अपघाताचे प्रमाण तुलनेने कमी आहे. किती अंतर (किलोमीटर्स) लोकल्स धावतात त्या मानाने किती अपघात होतात ते पहा. प्रमाण कमीत कमी आहे. अपघात होण्याची अनेक कारणे आहेत. रूळ जुने झाले आहेत. तसे पाहिले तर सारीच यंत्रे–यंत्रणा अगदी जुनी झाली आहेत. जनता राजवट असताना रेल्वेमंत्री असणाऱ्या प्रा. मधू दंडवते यानीच हा प्रश्न धसाला लावण्याचे ठरविले होते. सारे रूळ बदलले पाहिजेत, ही त्याची मागणी होती व आहेही. रेल्वेची सारी यंत्रे 'Out dated,' 'wornowt,' 'over-worked' झाल्यामुळे हे अपघात होतात. आज वापरात असणाऱ्या, धावणाऱ्या लोकल्सचे काही डबे इ. स. १९७७ पूर्वीच समुद्रात फेकून देण्याच्या लायकीचे झाले होते. हे प्रमाण ४% आहे. अजूनही त्याच्याकडून रोज ५३५ कि. मी. काम करून घेतले जाते. इ. स. १९५१ सालचे १३–१४ डबे अजूनही वापरात आहेत. वास्तविक ते केव्हाच बाजूला काढायला हवे होते. पश्चिम रेल्वेकडे असा एखाद–दुसराच डबा असेल. या डब्यांनी ३० वर्षे काम दिले. त्यांच्याकडून आणखी किती कामाची अपेक्षा करणार तुम्ही ? जर अपघात होऊ नये असे वाटत असेल तर बोरीबंदर-पासूनचे सारे रूळ बदलले पाहिजेत. आज वापरात असणाऱ्या डब्याना रजा दिली पाहिजे, ओव्हरहेड वायर्स बदलल्या पाहिजेत. एवढेच नव्हे तर सबस्टेशन्सही फार जुनी झाली आहेत, ती पूर्णपणे बदलून नवी झाली पाहिजेत. म्हणजे त्यातली यंत्रसामग्री बदलली पाहिजे. सबस्टेशन्स म्हणजे ठाकुर्ली पॉवर हाउसकडून जो वीजपुरवठा होतो तो घेऊन रेल्वेला वीजपुरवठा करणारी ही केंद्रे आहेत. तेथे A. C. चे D. C. मध्ये रूपांतर केले जाते, हाय-व्होल्टेजचे योग्य प्रमाण करणे इत्यादी कामे होतात. ही सबस्टेशन्स इ. स. १९२९ साली बांधलेली आहेत. प्रत्येक ५ कि. मी. अंतरावर ती आहेत. त्यातली यंत्रे पन्नास वर्षांपूर्वीची आहेत आणि ती २०० लोकल्सचे काम करण्यासाठी बांधली गेली. आज त्यांच्यावर ९०० लोकल्सचा ताण पडतो आहे. त्यांच्यावर भयंकर ताण पडल्यामुळे ती यंत्रे वारंवार बिघडतात. आवश्यक तेवढा विजेचा दाब मिळत नाही. त्यामुळे लोकल–वाहतुकीवर परिणाम होतो. कधी कधी त्याची परिणती अपघातात होते. हे सारे रेल्वे-प्रशासनाला ठाऊक आहे; पण त्यासाठी निधी नाही. 'जे आणि जसे आहे त्याच्यातच काम भागवा, निभावून न्या, आपला देश गरीब आहे,' असे अधिकाऱ्याचे मंत्र्यांचे सांगणे आहे. 'थोडासा आत्मस्तुतीचा दोष पत्करून सागतो की, आम्ही कार्यक्षम आहोत म्हणूनच या उपनगरी गाड्या चालू आहेत. नाही तर या गाड्या धावणे शक्य नाही,' असे एकजण अभिमानाने म्हणाला. आज विस्तार, बदल आणि आमूलाग्र नूतनीकरण आवश्यक आहे; पण पैसा नसल्यामुळे हे करता येत नाही उपनगरी वाहतुकीला दरवर्षी सुमारे २७–३० कोटी रुपयांचा तोटा सोसावा लागतो, त्यामुळे कदाचित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असावे. 'तोटा का होतो ?' माझा प्रश्न. 'तोटा का होतो, असे तुम्ही विचारावे हे नवलच आहे,' एकजण बोलू लागला, 'मध्य रेल्वेची उपनगरी वाहतूक चालू ठेवण्यासाठी खूप खर्च येतो. त्यामानाने उत्पन्न काही नाही. सारे जण सीझन तिकिटे, पासेस काढून प्रवास करणार. पासाला किती पैसे मोजता ? कधी विचार करता का तुम्ही ? पाच–सहा फेऱ्या झाल्या की पासाचे पैसे वसूल होतात. त्यातून रेल्वेला उत्पन्न मिळत नाही. ही वाहतूक सुधारण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले तरच तुम्हाला हवा तशी वाहतूक व्यवस्था मिळेल. आम्ही केवळ अपघातापुरताच विचार करीत नाही हा विषयच निघाला आहे तर माझ्या मनात जे आहे ते सागतो.' एकाने हा अपघाताचा प्रश्न फारच मनावर घेतला. त्याने या प्रश्नाचा गंभीरपणे विचार केलेला दिसून आला. तो सागू लागला, 'इंग्रजीत ज्याला 'बॉटल नेक' म्हणतात तसे बोरीबंदरला झाले आहे. गाड्या भरमसाठ वाढविल्या आहेत. अधिकाधिक गाड्यांची आवश्यकता आहे; पण आपण आपली कुवत ओळखायला नको का ? गाड्याना

विश्राती नाही, रुळाना उसंत नाही. आता अधिक गाड्या वाढविणे केवळ अशक्य आहे. बोरीबंदर यार्डाचे नूतनीकरण करण्याची योजना अनेक वर्षांपूर्वीपासून विचाराधीन आहे. मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे यांच्यात लोकल वाहतुकीच्या बाबतीत तरी तुलना करता येणार नाही. बोरीबंदरला साऱ्या लोकल गाड्या फक्त आठ फलाटांवर घ्याव्या लागतात. पश्चिम रेल्वेवर बॉम्बे सेंट्रल आणि चर्चगेट असा प्रकार आहे.' एकूण कारभार कसा आहे यावर उत्तर मिळाले, 'कारभार चांगला आहे, मेंटेनन्स सोडून!' 'मेंटेनन्स' म्हणजे युनिट मेंटेनन्स. ते काम प्रशासनाच्या आवाक्याबाहेरचे आहे. लोकांनी मागणी केली की वाढवा गाडी, असे करून लोकाना, लोकप्रतिनिधींना खूष करण्यासाठी गाड्या वाढवून बसले आहेत. इतक्या गाड्या, त्यांची देखभाल आपल्याला करता येते की नाही हे न पाहता इतकी संख्या वाढविणे योग्य नाही. पश्चिम रेल्वेचे प्रशासन स्वच्छपणे सांगते, 'आमची कुवत एवढीच आहे. आम्ही अधिक गाड्या वाढव शकणार नाही!'

## मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे

अपघाताला तुम्ही जबाबदार नाही, हे घटकाभर मान्य केले तरी वक्तशीरपणा तुमच्या हातात आहे. गाड्यांना उशीर का होतो? पश्चिम रेल्वेची वाहतूक, कार्यक्षम आणि वक्तशीर आहे, कारण ती माणसे कार्यक्षम आहेत; असे विचारल्यानंतर न रागावलेला मोटर-मन–मध्य रेल्वेचा–भेटला नाही. अशी तुलना तुम्ही करताच कशी, असा प्रतिप्रश्न त्यानी केला. त्यांनी सांगितले, 'रूळ ओलांडणे कमी झाले पाहिजे, साखळ्या ओढण्याचा छंद कमी केला तर बरे. पुरेशा कारणाशिवाय साखळी ओढली नाही तरी गाड्या वेळेवर येतील. रस्ता ओलांडणे हा आपला जन्मसिद्ध हक्क मानू नका. रूळ ओलांडणाऱ्यांना वाचविण्यासाठी गाडी हळूहळू चालवावी लागते. त्याचा परिणाम मोटरमनवर, त्याच्या हृदयावर तर होतोच; पण गाडीच्या wear and tear वरही होतो. मोटरमनची नोकरी म्हणजे हृदयविकाराला आमंत्रणच आहे. आज मध्य रेल्वेची जी लाइन आहे तिच्यात भयंकर Crossings आहेत. परळ स्टेशन हे एक चागले उदाहरण आहे. दिवा–वसई या मार्गामुळे परळचा अडथळा दूर होईल; पण आज तेथे अडथळा आहे. पश्चिम रेल्वेची बाद्र्याहून येणारी गाडी मध्य रेल्वेवर येते (परळला) ती कारनॅक बंदरला जाण्यासाठी. ती गाडी त्या ठिकाणच्या मध्य रेल्वेच्या चारही लाईन्स बंद करते. जर त्या गाडीला, इंजिनला तेथे क्रॉस करताना काही झाले, बिघाड झाला तर त्यामुळे मध्य रेल्वेची वाहतूक पूर्णपणे बंद होते. पश्चिम रेल्वेच्या या गाडीचा त्यांना उपद्रव होत नाही. मध्य रेल्वेमुळे पश्चिम रेल्वेची वाहतूक कधीही बंद पडत नाही. हा प्रकार परळ आणि वडाळा येथे होतो. त्यात मध्य रेल्वेने निर्माण केलेली Crossings आहेतच. उदा. माटुंगा व शीव (त्याचा चारही लाईन्स-वर परिणाम होतो) याला आज तरी काहीही उपाय नाही. तुम्ही सारेजण पश्चिम रेल्वेला नावाजता आणि मध्य रेल्वेला शिव्या देता! आम्ही तुमच्या अडाणीपणाला हसलो तर चालेल काय? या दोन विभागाची तुलनाच होऊ शकणार नाही, इतका या दोन्ही मार्गात फरक आहे. मध्य विभागाच्या सुरुवातीपासून–बोरीबंदरपासून–कार-खान्यांची गर्दी आहे. त्या त्या कारखान्यासाठी लोहमार्ग आहेत. त्यांचे Shunting आहे. बोरीबंदरच्या प्लॅटफॉर्म क्र. १ पासून ते थेट कर्जतपर्यंत सतत अडथळे आहेत. पश्चिम रेल्वेवर (चर्चगेट-पासून) प्लॅ. क्र. १ ची गाडी अडथळा न येता थेट विरारपर्यंत जाते. तेथे दोन्ही बाजूना (रेल्वेलाईन्सच्या) राहती घरे आहेत, तर मध्यरेल्वेच्या दोन्ही बाजूंना लहान–मोठे उद्योगधंदे आहेत. हा मूलभूत फरक कोणीच लक्षात घेत नाही. आमचे गाडी चालविणे म्हणजे अडथळ्यांची शर्यत आहे, तर त्यांचे (प. रे. च्या मोटरमेनचे) गाडी चालविणे म्हणजे लोण्याच्या गोळ्या-वर सुरी चालविणे आहे! 'पश्चिम रेल्वेची माणसे कार्यक्षम आहेत आणि आम्ही अकार्यक्षम आहोत असे कृपा करून म्हणू नका हा आमच्यावर अन्याय आहे!' असे प्रत्येकाने मला आवर्जून सांगितले. 'निर्दोषी माणसाला गुन्हेगार ठरविणे, त्याच्यावर तसा शिक्का मारणे बरे नाही. आमच्या अडचणी समजून घ्या. मध्य रेल्वेच्या ज्या ज्या अडचणी आहेत त्या पश्चिम रेल्वेला नाहीत. (दूरदर्शनवर मध्य रेल्वेचे आणि पश्चिम रेल्वेचे प्रमुख अधिकारी आपापली बाजू मांडीत होते. पश्चिम रेल्वेच्या बड्या साहेबानी म्हटले 'आमचे प्रवासी आणि तुमचे प्रवासी यात फरक आहे!' त्यांना म्हणावयाचे होते की मध्य रेल्वेचे प्रवासी केवळ बाबूलोक नाहीत आणि त्यानी असेही सुचविले की, मध्य रेल्वेचे प्रवासी भडक माथ्याचे आहेत!) असे म्हटले जाते की, पश्चिम रेल्वेच्या लोकांना मध्य रेल्वेवर आणले तर ते इथला कार-भार सुधारून दाखवतील; पण तसे शक्य नाही. त्यांनाही मध्य-रेल्वेची लोकलवाहतूक सुरळीतपणे चालविता येणार नाही. आम्ही आत्मविश्वासपूर्वक सागतो की, मध्य रेल्वेचा लोकलचा ड्रायव्हर हा पश्चिम रेल्वेच्या ड्रायव्हरपेक्षा अधिक अनुभवी आहे. कारण त्याने मालगाडीवर काम केलेले असते. मालगाडीवर काम करताना त्याला ब्रेक्सची चांगली माहिती होते. त्याशिवाय कसाऱ्याच्या घाटात ज्याने दोन हजार टनाचा बोजा साभाळला त्याला सपाट मार्गाने लोकल-गाडी चालविणे म्हणजे डाव्या हाताचा खेळ आहे. एखाद्या वेट-लिफ्टींग चॅम्पियनला फुलाची परडी उचलणे अवघड, अवजड वाटेल काय? लोकलचे वजन असते ४०० टन. दोन हजार टनांपुढे ४०० टन हे काय वजन आहे? हे काय काम आहे? त्यामुळे लोकलचे ब्रेक्स हाताळणे, लोकल चालविणे आम्हाला फारसे कठीण काम वाटतच नाही. पश्चिम रेल्वेचा मोटरमन सरळ नेमला जातो. तो लोकलवरच शिकतो व लोकलच चालवितो. आम्ही त्यांच्यापेक्षा विविध तऱ्हेचा अनुभव घेतो. आम्हा दोघात गुणात्मक फरक आहे. मध्य रेल्वेचा मोटरमन हा जास्त Superior आहे, अधिक अनुभव-संपन्न आहे. इथे लोकलवर येणारा मोटरमन हा तावून–सुलाखून निघालेला असतो.'

## पाण्याची डबकी, अस्वच्छता आणि रेल्वे

हे अडथळे बाराही महिने असतात, मग पावसाळ्यातच मध्य रेल्वेची सारी लोकल वाहतूक पहिल्या पावसापासूनच, का कोलमडते? मी पेचात पकडण्यासाठी प्रश्न विचारला. हे सारे मोटरमन म्हणजे कसाला भारी असलेले आणि पूर्ण तरबेज गडी निघाले. माझा प्रश्न ऐकल्याबरोबर त्याला पूर्ण, सविस्तर आणि पटणारे उत्तर मिळाले नाही असे झाले नाही. 'तुमच्या या प्रश्नाचे साधे आणि सरळ उत्तर असे आहे की, रुळात पाणी साठते, पाण्यामुळे रूळ दिसेनासे होतात, म्हणून गाड्या चालविणे अशक्य होते; पण तुम्ही विचारलेला प्रश्न महत्वाचा आहे त्याचे सविस्तर उत्तर देतो.' त्यापैकी एका अनुभवी

मोटरमेनने म्हटले. तो सांगू लागला— 'हे पाणी का साठते ? पूर्वी जेथे साठत नसे तेथे हल्लीच का साठू लागले ? उदाहरणार्थ चेंबूर व कुर्ला. कुर्ला येथे डेअरी बांधली आहे. तेथे पूर्वी भला मोठा खड्डा होता. त्या खड्ड्यात साचणारे पाणी, ती जागा उंचावल्यामुळे रुळा-वर येऊ लागले. कारशेडच्या बाजूला गृहनिर्माण मंडळाने घरे बांधली. म्हणून तेथे साठणारे पाणी रुळावर येऊ लागले. दरवर्षी मस्जिदला पाणी साठते. का साठते ? घाण साठते म्हणून. रेल्वे-प्रशासन आपल्यापरीने काम करते, पण हे टाळणे केवळ अशक्य आहे. एप्रिलपासून रेल्वेरुळांलगतची घाण काढण्याचे काम सुरू होते. घाण वाहून नेण्यासाठी भलीमोठी मालगाडी चालते. पण पावसाळा सुरू झाला की पाणी साठावयाचे ते साठतेच! कारण ठाऊक आहे का ? आपल्या सर्वांचे अत्यंत आवडते फळ आंबा हे त्याचे कारण आहे. एप्रिल-मे महिन्याचा काळ म्हणजे घाण काढ-ण्याचा आणि आंब्यामुळे घाण होण्याचा काळ आहे. पाईप्समध्ये आंब्याच्या टोपल्या, गवत फेकले जाते. त्यामुळे Drain Pipes तुंब-तात. त्यातून पाणी बाहेर जात नाही. ते पाणी मग येते रुळावर. दुसरे कारण म्हणजे समुद्राची भरती. भरती आणि मुसळधार पाऊस अशी युती जेव्हा होते तेव्हाच रुळावर पाणी येते. नुसताच खूप पाऊस पडला म्हणून रुळांवर पाणी येत नाही. भरतीचे पाणी आणि पावसाचे पाणी एकत्र होते तेव्हाच पाण्याखाली रूळ बुडतात. माहीम, सॅण्डहर्स्ट रोड, करीरोड या ठिकाणी काळजी घेतली तर खूप फायदा होईल. तेथेच बाहेरचे पाणी जास्त येते; पण हे पाणी टाळणे एका मर्यादेपर्यंतच शक्य आहे. ते पूर्णपणे टाळता येणार नाही. थोडासा relief मिळेल. कारण हे पाणी पूर्णपणे टाळण्यासाठी सर्व रूळ वर उचलावे लागतील. ते शक्य नाही, कारण रूळ वर उचलणे म्हणजे या मार्गावरील सर्व ठिकाणचे पूल वर उचलावे लागतील. ते आर्थिक-दृष्ट्या शक्य नाही. शीव येथे फार पाणी साठत असे. तेथील रूळ उचलले, जुना पूल पाडून टाकून नवा पूल उंचावर बांधला. असे सगळीकडे करता येणार नाही. ते काम भफाट खर्चाचे आहे. गेली तीन–चार वर्षे पावसाळ्यात पाणी साठू नये यासाठी प्रशासनाचे अविरत प्रयत्न चालू आहेत.

'दारू, तांदूळ वा अन्य बेकायदा वस्तूंची ने–आण करणारे व तुम्ही याचे साटेलोटे असते. तुम्ही त्यांना हव्या त्या त्या ठिकाणी गाडी थांबवता म्हणून गाड्या उशीरा येतात–जातात हे खरे आहे काय ?' मी पुढचा प्रश्न विचारला. माझ्या प्रश्नांवर रागावणे त्यांनी सोडलेच असावे. त्यांच्या चेहऱ्यांवर रागाऐवजी माझ्याबद्दलची करुणा, कीव दिसून आली. त्या साऱ्यांनी निक्षून, खात्रीपूर्वक, शपथ-पूर्वक सांगितले की, असे व्यवहार करणारे व आम्ही मोटरमेन यांचा काडीमात्र संबंध नाही. साटेलोटे, संगनमत तर दूरच राहू द्या. बेकायदा वस्तूंची ने–आण करणारी जी माणसे आहेत त्यांना रेल्वेची, लोकलची पूर्ण माहिती असते. ते ब्रेक्स टाकू शकतात. व्हॅक्यूममुळे गाडीची गती कमी करता येते हे तुम्हा प्रवाशांना ठाऊक नाही, ते त्यांना ठाऊक असते–आहे. आम्ही (मोटरमेन व गार्ड) त्यांच्याशी अजिबात बांधलेले नसतो. हा गैरसमज काढून टाका. व्यापारी, भाजीवाले यांना त्यांचे बोजे चढ–उतार करण्यास मदत करणे हे आमचे कामच आहे. लग्नाचे वऱ्हाड चढता–उतरताना त्यांना त्यांनी केलेल्या विनंतीनुसार मदत करावी लागते. त्यासाठी गाडी थांब-वावीच लागते. प्रवाशांची ने–आण करण्यासाठीच तर लोकल्स आहेत ना ? त्यांना नकार कसा देता येईल ?

'तुम्ही आतापर्यंत आम्हाला अनेक आडवे–तिडवे प्रश्न विचारलेत, त्यातून असे सूचित केलेत की लोकल–वाहतुकीचा खोळंबा आमच्या-सारख्या मोटारमेनच्या विविध दोषामुळे होतो. आता मी तुम्हालाच प्रश्न विचारतो त्याची उत्तरे तुम्ही देऊ नका, देऊ शकणार नाही. मीच उत्तरे देईन हा भाग वेगळा.' एकजण थोडासा कातावून म्हणाला. 'प्रवाशामुळेही गाड्यांचा खोळंबा होतो हे तुम्हाला ठाऊक आहे काय ? प्रवाशांच्या वागणुकीमुळे होणारा खोळंबा (Detention due to misbehaviour of passengers) कोणीच लक्षात घेत नाही. त्याची यादीच मी तुम्हाला ऐकवितो. धोक्याची साखळी क्षुल्लक कारणासाठी ओढणे, वारंवार साखळीचा दुरुपयोग होतो. बोरीबंदरपासून कर्जत–कसाऱ्यापर्यंत साऱ्या स्टेशन्सवर आणि काही काही ठिकाणी मध्येही मैदानात, पटांगणात, बागेत फिरावे तसे लोक रुळावरून चालतात, रूळ ओलांडतात. गाड्यांतून घाण करणे-अगदी नैसर्गिक विधी करणे, ते करताना लोकांना काहीच वाटत नाही. मी उदाहरणे देऊन सांगतो. सकाळची (पहाटे चारची) पहिली कर्जतला जाणारी व कर्जतहून येणारी गाडी. या गाड्यांचा सर्रास वापर संडास म्हणूनच केला जातो की काय, असे वाटण्याजोगी त्या गाडीची अवस्था झालेली असते! अनेक दारुड्यानी त्यात ओकून घाण केलेली असते. ती अगोदर साफ करून घ्यावी लागते. त्यामुळे ती गाडी सुटायला उशीर होतो. या गाडीला उशीर झाला की, त्यानंतरच्या साऱ्याच गाड्यांना उशीर होतो. ती एक साखळी आहे. एक दुवा निखळला की साखळी तुटते, अलग होते तसे गाड्यांचे होते बोरी-बंदरला तर अनेक गाड्या या घाणीमुळे अडकवून ठेवाव्या लागतात. त्या साफ केल्यानंतरच सुरू होतात / करता येतात. चालत्या गाडीत चढणे, उतरणे, दोन डब्यामध्ये उभे राहणे, टपावर बसणे किंवा उभे राहणे–काहीजण तर टपावर उभे राहून नाच करतात, या टोकापासून त्या टोकापर्यंत धावत जातात. त्यांना प्रतिबंध कोण करणार ? केव्हा आणि कसा आवर घालणार ? त्यामुळे काहीजण तारेला चिकटतात, तोल जाऊन खाली आदळतात. परिणाम काय, तर गाडीचा खोळंबा ! पश्चिम रेल्वेवर हा त्रास जास्त आहे, हे


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक


प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

आवर्जून सांगतो. खिडकीवर उभे राहणे, विशेषतः छोटयाशा पन्हळीला धरून अनेकजण उभे राहतात. ती पन्हाळ Welding केलेली असते; पण त्याचा भरंवसा देता येत नाही. ती पन्हळ तुटली, त्यावरचा हात सुटला की तो खालीच जातो! 'अपघात म्हणजे उशीर', हे समीकरण विसरू नका. एखादी गाडी या कारणाने थांबली की नंतरच्या पंचवीस गाडया रखडतात. तुम्हाला रूळ ओलांडणाऱ्यांबद्दल सांगतो. काही बहाद्दर तर असे असतात की, मोटरमनने हॉर्न वाजविला तरी पार करायचे थांबत नाहीत. काही-जण तर गाडी जवळ आल्याबरोबर चटकन रूळ ओलांडतात आणि मागे वळून हसतात ! जणू काही त्या हास्यावाटे ते मोटरमनला सुचवितात की, कसे चकवले ! पण लोकलचा नुसता स्पर्श झाला तरी हे हास्य कायमचे लोप पावेल हे त्यांच्या लक्षात येत नाही ? गाडयांना उशीर होतो म्हणून प्रवासी शिव्या देतात, मारायला धावतात अशा वेळी फार त्रास होतो. शारीरिक त्रासापेक्षा मानसिक त्रास अधिक होतो. आमची चूक नसताना हे सारे मुकाटयाने सहन करावे लागते. मेल, एक्स्प्रेस, एवढेच काय घाटात काम करणेसुद्धा फारसे त्रासदायक वाटत नाही; एवढा ताण, त्रास लोकलवर काम करताना होतो, जाणवतो !'

लोकल–वाहतूक सुधारण्यासाठी (फारसा खर्चिक नसणारा) उपाय सांगू शकाल काय ? तुम्ही त्या दृष्टीने विचार करता का ? या प्रश्नाला ज्या तऱ्हेने प्रतिसाद मिळाला त्यावरून ही माणसे आपले काम बरे की आपण बरे असे करीत नाहीत, असे दिसून आले. एकेकजण सांगू लागला. या सूचना सारांशरूपाने अशा – सर्व महत्त्वाच्या स्टेशन्सवर (उदा. डोंबिवली, ठाणे, कल्याण इ. ) सकाळी सहापासून रात्री दहापर्यंत निवेदक असला पाहिजे. त्याने सतत प्रवाशांना सूचना दिल्या पाहिजेत.त्याला साऱ्या मार्गावरील विशेषतः नजीकच्या टप्प्यातील गाडयांची परिस्थिती कळली पाहिजे.ती कळण्यासाठी मोटरमन,गार्ड,वाहतूकनियंत्रणकक्ष,निवेदक यांच्यात बिनतारी यंत्रणेने संपर्क साधता आला पाहिजे. जर दूरवर हे जाळे तयार करता येत नसेल तर पाच ते दहा कि. मी. च्या परिसरात संपर्कयंत्रणा हवी. मोटरमन-गार्ड यांनी कळविलेली, दिलेली माहिती निवेदकाने लगेच प्रवाशांना सांगितली पाहिजे. प्रशासनाने ही सोय तात्काळ करावी. यासाठी फार खर्च येईल असे वाटत नाही. (एस. टी. चे अपघात वारंवार होऊ लागल्यानंतर 'त्या अपघातांची माहिती साऱ्यांना कळविता यावी म्हणून बसमध्ये वायरलेस सेटस् बसवा' अशी सूचना महाराष्ट्र टाइम्समध्ये पत्र लिहून भिवंडी कॉलेजमधील प्राध्यापक कृ. गो. चिचाळकर यांनी केली. एस. टी. च्या प्रसिद्धी-अधिकाऱ्यांनी अगदी तत्परतेने त्या पत्राला उत्तर दिले. 'अशी व्यवस्था करणे शक्य होणार नाही.' हे मला आठवले.) रेल्वे–प्रशासन या सूचनेला वाटाण्याच्या अक्षता लावील यात मला तरी शंका वाटत नाही; पण प्रशासन म्हणेल हे करता येणार नाही, कारण आपण गरीब आहोत. रात्री अकरानंतर कल्याणला चहाचा कप घेण्यासाठी गार्ड, मोटरमन एक–दोन मिनिटे गाडी लेट करतात. आमच्याकडून, आमच्यासाठी होणारा खोळंबा हा एवढाच होतो; पण ती दोन मिनिटे, तो उशीर भरून काढता येतो. बाकी गार्ड, मोटरमनला गाडी उशिरा आणण्यात अजिबात रस नाही. मी एक सूचना करू इच्छितो; ती आज तरी कोणलाच मान्य होणार नाही. पण अनुभवावरून सांगतो. ऐन उन्हाळयात (तो ऑक्टोबरचा असो किंवा एप्रिल–मेचा असो) बोरीबंदर ते अंबरनाथची एक फेरी केली की असह्य उकाडयामुळे, गाडी चालवण्याच्या ताणामुळे मोटरमन पार थकून जातो. त्याच्या केबिनमध्ये जर Air cooler बसविला तर त्याला उन्हाळयामुळे जाणवणारा, होणारा थकवा अजिबात सोसावा लागणार नाही. रेल्वे–प्रशासन हे करणार नाही–अगदी परवडले तरीसुद्धा–कारण त्यांना भीती वाटेल की त्या गारव्यात मोटरमन डुलकी घेतील ! आम्ही प्रवाशांना अशी विनंती करतो की, तुमच्यासाठी आम्ही आहोत. तुम्ही गैरसमज करून घेऊन आमच्यावर रागावू नका. आमच्याही अडचणी समजून घ्या! लोकल वाहतूक वक्तशीर व्हावी, प्रवास सुखाचा व्हावा हीच आमची इच्छा आहे, प्रयत्न आहे. कारण आम्ही सदैव मोटरमेन नसतो. आम्ही आमच्या कुटुंबियांसमवेत लोकलनेच प्रवास करतो हे विसरू नका ! तुम्ही आणि आम्ही वेगळे नाही !'

( लोकलच्या गार्डांच्या मुलाखतींवर आधारित उत्तरार्ध पुढील अंकी)


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

पुस्तके

# आत्मभोर

## निसर्गात रमलेली पण अलिप्त कविता

श्री. परेन शिवराम जांभळे हे नाव कवी म्हणून यापूर्वी विविध पण निवडक नियतकालिकातून वाचनात येत असे. आता त्यांचा 'आत्मभोर' हा कवितासंग्रहच वाचनात आला. श्री. जांभळेंचा हा पहिलाच काव्यसंग्रह. आजपर्यन्त त्यांची कविता अशी विस्कटून–विस्कटून–अलगपणे वाचली. आता या संग्रहात पन्नास कविता संग्रहित केल्या आहेत.

कलावंताला येणारे कलात्मक अनुभव, सामान्यांच्या अनुभवांपेक्षा अनुभव येण्याच्या पातळीवर वेगळे असतात. त्या वेगळेपणाचे परिणत स्वरूप त्याच्या कलाकृतीत दिसते असे गृहीत धरू. अशा वेळी प्रत्येकाची अनुभव स्वीकारण्याची व तो व्यक्त करण्याची पद्धत, त्यात मिसळलेले त्याचे स्वतःचे संदर्भ यामुळे ती दुर्बोधतेच्या एका विवक्षित पातळीपर्यंन्त जाणे मान्य असले, तरीही दुर्बोधतेच्या त्या सीमारेषेपलीकडे कलाकृती जाऊ लागली तर तिच्या आस्वादप्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

श्री. जांभळेंच्या कवितेत असे दुर्बोधतेचे अनुभव आहेत; पण तरीही ही कविता स्वतःत मग्न असते. तिला स्वतःची आणि कुणाचीच काळजी नसते. खरं तर ती 'आत्मभोर' असते. अशी कविता वाचताना, अनुभवताना काही धूसर आकळतं; पण ते तसच असणं जास्त चागलं असतं.

ह्या आत्मभोर कवितांना संदर्भात फार मोठ्या 'स्पॅन'चा लाभ झालेला नाही. काही विशिष्ट अनुभवांच्या संदर्भातच ही कविता मुक्त होऊ पाहाते. म्हणूनच मग जीवनाची आसक्ती, विरक्ती याच्या फेऱ्यात ती सापडते.

संग्रहाची सुरुवातच

'ऋतुमते,
चंद्रोदयाच्या वेळी तुझ्या डोळ्यात
घुटमळताना
उसळेल तुझ्यातील समुद्र
तेव्हा मला बेशक ऐकू येऊ दे
तुझी वेल्हाळ हाक
मी आसक्त होऊन येईन
फक्त मोरांचा टाहो कानावर पडणार
नाही याची हमी घे'

अशासारख्या कवितेने होते. या जीवनाबद्दलच्या आशादायी किरणानंतरची दुसरीच कविता 'प्रवासाला निघण्यापूर्वी' अशी आहे. विरागी प्रवासाला प्रयाण करण्यापूर्वी हे चित्र वितारून ठेवण्याची ही कवीची इच्छा म्हणजेच आसक्ती आणि विरक्ती यातील खेळ ! ही सारी कविताच या तत्त्वांच्या मध्ये झोके घेते आहे आणि झोकून देते आहे.

कविता अत्यंत आत्ममग्न असणे चांगले की वाईट, कलात्मक की अकलात्मक या वादापेक्षाही ती कितपत Communicative असते आणि अनुभवाचे संक्रमण ती कोणत्या वेगाने करते हे मला जास्त महत्त्वाचे वाटते, म्हणूनच

'क्षितिज उल्लंघून येताना
कंठात वासंतिक सांगावा घेऊन
सावल्यांचे घनगर्द पक्षी झेपावलेत
आता थांबायलाच हवं'

अशी कविता तयार होते.

ही कविता अशी आत्ममग्न आहे, संदर्भरहित आहे. सारे जीवनाचेच संदर्भ देण्यापेक्षा ही कविता त्या संदर्भाचा फक्त आधार घेते आणि प्रतिमा–प्रतीकांच्या साह्याने हे अनुभव व्यक्त करते. म्हणूनच जीवनातील विरक्ती जाणवणारी ही कविता काही वेळा अतिशय आसक्त होते.

नाचानं मोराला सोडावं तशी पायांना लगटलेली ओलसर वळ आणि पावसात भिजलेलं पिवळंधम्म ऊन या कवितेत जसं जाणवतं तसंच–'आता आपणच आपल्या प्रेताशी पहारा करीत बसायला हरकत नाहीय' अशी जाणीवही ही कविता करून देते.

एकीकडे जुन्या स्मृतीचा उजाळा आणि दुसरीकडे त्याच स्मृतीच्या निराळ्या अशा या संग्रहातील कविता आहेत.

'एकेक फूल वेचता वेचता
ती चंद्रकळेगत कधी फुलून गेली
नि असंख्य पाखराचे कोरस गाणे
गाऊ लागली.
हे तिलाच उमगले नाही.
ती बेहोष होण्याआगोदरच
त्याने तिला फुलागत अल्गद झेलले'

असे तरल, संवेदनाक्षम अनुभव या कवितेत आहेत. ही कविता संवेदनशील आहे. तिच्यात जीवनाबद्दलची कणव आहे, ती हळवी आहे तेवढीच सत्याला सामोरी जाणारी आहे. 'चित्र'सारख्या कवितेतकवि म्हणतो–

'भिंतीवरील चित्रातून
मी रात्री अलगद उतरतो
नि माझ्या स्वप्नात येतो
मी चित्र होतो.
सकाळ होण्यापूर्वी पुन्हा
चित्रात जाऊन
चपखलपणे बसतो.
पुन्हा रात्र पडेपर्यंन्त
भिंतीकडे पाहण्याचे धैर्य
माझ्यात नसते.
मी मृत
माझे चित्र जिवंत.'

काही ठिकाणी ह्या कविता विलक्षण दुर्बोध वाटतात. त्यांना 'आत्ममग्न' असा शिक्का मारून सोडून देणे कितपत बरोबर ठरेल ?

'झाडांचं ठीकच असतं;
त्यांना–
धुक्यात ओळख हरवलेल्या वनराईला
संदर्भ देणारी

भन्नाट पाखरं म्हणून हाक मारता येते. अशीही कविता आहे.

या कवितेत ज्या प्रतिमा–प्रतीकांचा वापर केला आहे त्या निसर्गातील आहेत. आपला अनुभव निसर्ग–प्रतीकातून सांगण्याची ही

शैली नवी नसली तरी आगळी आहे.

या कवितेत झाडांचा सोस आहे, पाखरांची किलबिल आहे, तिच्या डोळ्यातील मोर आहेत, तर धुवांधार पाऊसही आहे, कातरवेळ आहे, चंद्राशी चाललेला पाठशिवणीचा खेळ आहे, हिंदकळती उन्हं आहेत–हा सारा निसर्ग या कवितेतून सामोरा येतो; पण ही निसर्ग–कविता नाही; खरच ही फक्त 'आत्म-मोर' कविता आहे. या निसर्गातून आपल्या अनुभवांच्या वाटा श्री. जांभळे शोधत आहेत. काही ठिकाणी हा सोस दुर्बोधतेकडे जातो, तर काही वेळा हा सोस शब्दबंबाळतेचा होतो.

ही कविता रोखठोक नाही, अनुभव रुपयासारखा खण्णकन वाजवून देणारी नाही. ती नाजूकपणे समोर येते, लाजते, हुमसून रडत नाही, पण रडवेली होते. तिचे सारे विभ्रम अत्यंत संयत असतात म्हणूनच कलात्मक असतात.

> 'रानफुलानी झेललेले सायंप्रार्थनेचे
> ओढाळ ऊनभान.
> तिच्या आकात बुबुळात बुडालेली
> रंगांधनुपुरे
> अवसानघातकी प्रस्तरांचे जीवघेणे
> आभासमय प्रत्यंतर
> कुठेही गेले तरी हटकून पायाखाली
> येणाऱ्या पोरक्या वाटा.'

असा निराशेचा सूर लावणारी कविता–

> 'मी तुझ्याकडे कधी काहीच मागितलं
> नव्हतं,
> तू सर्वस्व द्यायला समुत्सुक कधी
> झालीस,
> माझे सूर्यविकासी लावण्य प्रीतीचे
> घर कोरते.
> मी गमतीने जमवलेली चंद्रशिल्पे
> इंद्रधनुष्य फुलवताहेत तुझ्या बिल्लोरी
> डोळ्यात'

असा समुत्सुक सूरही व्यक्त करते.

ही कविता अशी आहे. काही ठिकाणी जेवढी दुर्बोध आहे तेवढीच काही ठिकाणी तरल आहे. काही प्रतीकांचा सढळ वापर, काही वेळा अनुभवाच्या बाबतीतला तोचतोचपणा (झाडे, डोळ्यातील मोर, घन-विभोर इ. इ.) यामुळे ही कविता सलगपणे वाचून तिचा होणारा परिणाम वेगळा होतो

अशा या कवीला शुभेच्छा देताना सूचनांकडे निर्देश करावासा वाटतो.

–मुकुंद संगोराम

आत्ममोर कवितासंग्रह
परेन शिवराम जांभळे
विशाल प्रकाशन, कल्याण, जि. ठाणे
पृष्ठे–५०, मूल्य–५ रुपये.

फिनिक्स निवड

# Tiger

The story of Indian Tiger
Kailash Sankhala
Rupa & Co.
By arrangement with Collins,
St. Jamess Place, London.
Rs. 60/-

मी शाळेत असताना जिम् कॉर्बेटची पुस्तके वाचताना इतका रंगून जात असे की, शेरलॉक होम्सची पुस्तकेसुद्धा त्यापुढे फिकी वाटत असत. तुम्हाला थ्रिलर्स वाचण्यात जे थ्रिल मिळते त्यापेक्षाही 'सुपर थ्रिल' वन्य जीवनावरील पुस्तकामधून मिळेल. त्या वेळेला मी मनात असे ठरवून टाकले होते की, या साहेबापेक्षा 'वाघ' या विषयावर कुणीही जास्त चांगले लिहू शकणार नाही!

नंतर काही वर्षांनी मी केनेथ अँडरसनची सर्व पुस्तके आमच्या वाचनालयासाठी घेऊन टाकली. ती वाचून विचार आला की, वन्य जीवन या विषयावर लिहिणारा हा पांढरा साहेब जिम कॉर्बेटपेक्षा One over (शेरास सव्वाशेर) होता की काय? नेहमीसारखे 'पांढरे साहेब'च पुस्तक लिहिताना इतके कष्ट घेतात की, पुस्तक जवळजवळ परिपूर्णच वाटते!

–आणि आता इतक्या वर्षांनी एका भारतीय लेखकाचे वाघ या विषयावर पुस्तक विकत घेतले आणि मला मात्र श्री. कैलास संखालाचे हे पुस्तक दोन्ही पांढऱ्या साहेबांपेक्षा आवडले. अगदी 'without prejudice' हे पुस्तक इतके परिपूर्ण वाटते की, 'वाघ' या प्राण्यावर आणखी काही माहिती इतर पुस्तकात असेल असे वाटतच नाही!

सिंहाला वनराज म्हटले जाते. खरे तर हा किताब वाघाला मिळायला हवा होता. काय या प्राण्याची Ferocity! काय त्याचे आकर्षक चट्टेपट्टे! काय त्याचा coat! सिंहाचा अगदीच माइल्ड चहा किंवा कॉफीसारखा रंग या चट्टयापट्टयापुढे फिका वाटतो काय त्याची भयानक डरकाळी, काय त्याची झडप घेण्याची तऱ्हा, काय त्याचा चलाख बेरकीपणा, काय त्याचा कराल एकटेपणा! वाघाला बघून सौंदर्य आणि क्रौर्य याचा आलटून-पालटून अनुभव आपल्याला येतो. त्याची डौलदार चाल कोणत्याही स्त्रीला लाजवेल! यातील एका तरी बाबतीत सिंह वाघाची तुलना करू शकेल का?

रेवाच्या महाराजांनी काही पांढऱ्या वाघांचे ब्रीडिंग केले आहे. या वाघांच्या किमती रेसच्या घोड्याप्रमाणे लाखाच्या घरात असतात! (एखादा माणूस फूटपाथवर मरत पडला असेल तर त्याला कवडीचीही किंमत नाही! हा Civilization and Progress चा केवढा विरोधाभास!)

दिल्लीचं प्राणिसंग्रहालय हे जगातील सर्वोत्तम प्राणीसंग्रहालयांपैकी एक आहे. (आणि सर्वांत उपेक्षित पुण्यातील पेशवेपार्क असावे! महाराष्ट्रात पेशव्याचा कुणी वंशज असला तर त्याने या नावावर हरकत घ्यावी.) या दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयाचे श्री. संखाला हे संचालक होते. अमेरिकेतील व पूर्व आफ्रिकेतील मुक्त प्राणिसंग्रहालये कशी ठेवली जातात, हेही श्री. संखालानी पाहिले आहे. आफ्रिकेतील 'नॅशनल पार्क'-मधली एक गोष्ट वाचल्याचे आठवते. ती अशी: एकदा एका मोठ्या आफ्रिकन सिंहाने एक भला मोठ्ठा बैल मारला. हा बैल त्याला कुंपणापलीकडे न्यावयाचा होता. याच कुंपणावरून तो उडी मारून आला होता. या सिंहाने तो तगडा बैल सरळ चेंडूसारखा कुंपणापलीकडे पंज्याने उडवला! या वन्य श्वापदाच्या सवयी व पराक्रम खरंच मोठ्या वाचनीय असतात.

हा वाघोबा निर्वंश होण्याच्या मार्गावर होता म्हणून 'प्रोजेक्ट टायगर' अस्तित्वात आला आणि या प्रोजेक्ट टायगरचे श्री. संखाला पहिले डायरेक्टर होते. या पुस्तकाचे वर्णन

श्री. संखाला यांनी 'An Autobiograpny of a Tiger Addict' असे केले आहे ते अगदी योग्य आहे. कारण व्यसन म्हटल्यावर वारंवार माणूस त्या व्यसनाकडे वळतो.

या व्यसनात श्री. संखाला इतके दंग झाले आहेत की, एके ठिकाणी ते म्हणतात, 'मी माणुस झालो याची मला खंत वाटते.माणसावर धूर्त कोल्हेसुद्धा विश्वास ठेवणार नाहीत. एकदा मी एक मोठी वाघीण पाहिली होती आणि शे-दोनशे फुटांवर दोन पाडसं अगदी आरामात बसली होती. त्या पाडसांना माहीत होते की, या वाघिणीने आज पोटभर खाल्ले आहे, म्हणून आता लगेच ती केवळ हौसेकरता कुणाला मारणार नाही. उद्याच्या खाद्यासाठी ती आज कुणालाही मारणार नाही!' जंगलात सावज आणि शिकारी यांच्यामध्ये असे पूर्ण सामंजस्य असते!

ह्या मुक्त संग्रहालयातील वाघोबा जर आजारी पडला तर त्याला 'ट्रॅक्विलायझर डार्ट' मारून त्याचे औषध-पाणी केले जाते. कधीकधी त्याच्या गळयातून रेडिओ सिग्नल्स निघतील असे पट्टे बांधले जातात. असा हा ऱ्हॅक्ट बांधलेला वाघोबा जंगलात हिंडताना पाहिला की, डोळयांचे पारणेच फिटते! यावरून वाघोबा कुठे कुठे हिंडतोय याची माहिती मिळते! शेवटी हा चवताळलेला, भुकेलेला, जंगलात मोकाट सुटलेला वाघ म्हणजे स्वातंत्र्याचे प्रतीक आहे! माणसाच्या संपत्तीच्या लोभाने जेव्हा हा वाघ निर्वंश होईल तेव्हा माणसासाठीसुद्धा सारे संपले असेल! कारण आधीच तुटूतुटू होत असलेली निसर्गाची संतुलनता त्या सुमाराला ढासळलेली असेल, असे चार्लस् मॅकडुगल यांनी दुसऱ्या एका वाघोबाच्या पुस्तकात लिहिले आहे.

श्री. संखालांच्या पुस्तकात फोटो व चित्ररेखाटन सुरेखच आहे. आता आपण या पुस्तकाच्या काही भागावर प्रकाशझोत फिरवू.

सावज फाडून वाघीण आपल्या पिल्लाला आधी खाऊ देते. सिंहीण प्रथम स्वतः खाते! पोरा-बाळांचा विचार नंतर!

वाघीण पहिल्यादा व दुसऱ्या वेळेला प्रसूत होते त्या वेळेस तिला अनुभव नसतो. काही काही वाघिणी तर हे काय आपल्या पोटातून हालचाल करणारे गोळे निघाले, असे समजून घाबरून पिल्लांना सोडून पळते. अशा वेळेला साहजिकच पिल्ले भुकेने मरून पडतात! तीन-चारदा प्रसुती अनुभवल्यावर मात्र तिचे मातृत्व एकदम जागे होते आणि मग आपल्या पिल्लांसाठी ती प्राण द्यायलाही मागे-पुढे पाहात नाही. क्वचित पहिल्या वेळेपासून काही वाघिणी मातृत्वाचे कर्तव्य पार पाडायला लागतात.

याचे मुख्य कारण म्हणजे वाघिणी एकटया राहतात. त्यामुळे त्यांना प्रयत्न करणे, चुकणे, शिकणे या चक्रातून जावे लागते!

काही काही माता अगदी विक्षिप्त आणि तऱ्हेवाईक असतात. एका वाघिणीच्या पिल्लाला कानाजवळ जखम झाली होती. त्यावर मलम लावण्यात आले. लागलीच वासामुळे माता गुरगुरायला लागली व तिने सर्वच्या सर्व पिलांना सोडून दिले! अगदीच टेंपरामेंटल!

कधीकधी मांजर व सिंहीण आपली पिल्ले खातील; पण वाघीण तसे करते यावर श्री. संखालाचा विश्वास बसत नाही.

वाघिणीला घरकामात कुणीच मदत करत नाही! सिंहीण मेली तर आत्या, मावशी, कुणी तरी मंडळी तिच्या पिल्लांना वाढवतील. लांडगा व कोल्ह्याची 'पाळणाघरे' असतात! ओटर तर आपली मादी व्याली की, तिच्यासाठी सतत मासे पकडून घरी आणत असतो. आणखी एक पितृत्वाचे उदाहरण संखालांनी दिले आहे. ते अगदी मनाला चटका लावून जाणारे आहे. एकदा एका प्राणिसंग्रहालयातील एका माकडिणीचे पिल्लू फक्त दहा दिवसांचे असताना माकडीण मेली. प्राणिसंग्रहालयात दुसरी कोणतीच प्रसूत झालेली माता दूध देण्यासाठी नव्हती. त्या पिल्लाला भूक लागली की, नर माकड केळं आणायचा व तोंडात लगदा करून पिल्लाला द्यायचा माकडापासून मानव निर्माण झाला त्याची ही पुष्टीच!

वाघोबा हा परिस्थितीशी कमालीचा जुळवून घेणारा असतो. माणूस सान्निध्यात असला तरी त्याला त्याचे फारसे काही वाटत नाही. एका अभयारण्याशेजारी लाकूडतोडे वगैरे काम करीत असत. तेथे बसस्टॉपसुद्धा होता. त्या अभयारण्यातील वाघ माणसाच्या वाटेला जात नसत. माणसांची कामे संपली की, मग त्याच परिसरात ते आपले काम सुरू करीत! वाघ नरभक्षक का बनतो हे बहुतेक लोकांना माहीत आहेच. तो लंगडा होणे, दुसऱ्या प्राण्याची शिकार त्याला करवत नाही वगैरे कारणांमुळेच तो नरभक्षक बनतो.

भारतात सर्वांत जास्त वाघ सुंदरबनच्या अभयारण्यात आहेत. ह्या सुंदरबनचा निम्मा भाग बांगला देशात, तर निम्मा भारतात आहे इतर काही अभयारण्यांची नावे कॉरबेट पार्क, दुध्वा पार्क, काझीरंगा सॅक्च्युअरी, पेरियार वगैरे आहेत.

भारतीय वाघाच्या शेजारी या पुस्तकातला जावाचा वाघ पाहिला की, हा वाघ आहे की कुत्रा, असा प्रश्न पडतो. मलायाचा वाघसुद्धा असाच किरकोळ अंगयष्टीचा वाटतो. कॅस्पियन, सैबेरियन व चीनच्या वाघोबांच्या रेखाटनावरून ते वाघ मात्र बरेच पुष्ट वाटतात.

दर आठवडयाला 'फिनिक्स निवड' लिहायची म्हणजे मागे वाघ लागल्यासारखेच होते. नव्हे म्हणूनच ती लिहून होते. Thanks Tiger!

—जे. एन्. पोंडा

---

रंगभूमी

# अभिमान

## एक सूडाचा प्रवास

बारा वर्षांपूर्वी लाथेने ठोकरलेला अेक दगड बारा वर्षे वाढतो, मोठा होतो, समर्थ बनतो आणि एक धूमकेतू बनून अवतरतो. त्याच्या शेपटाच्या पसाऱ्यातील उल्कांच्या माऱ्याखाली बारा वर्षांपूर्वी त्याला लाथाडणारे सगळे पाय भाजून निघतात आणि त्या साऱ्याचे क्षमेसाठी जोडलेले हात आणि याचनेसाठी लवलेली मस्तके बाजूला सारून हा धूमकेतू पुन्हा एकदा अवचित नाहीसा होतो. अशा या मनस्वी धूमकेतूचे दर्शन घडविणारी यशवंत रांजणकरांची 'अभिमान' ही नाटयकृती.

यापूर्वी नाथमाधवांच्या कादंबरीवर आधा-

रित रांजणकरांचे 'देशमुखवाडी' हे नाटक रंगभूमीवर आले (आणि गेले). 'अभिमान'-मधील प्रमुख पात्राचे नाव रायभान देशमुखच हे ऐकल्यानंतरच हा 'देशमुखवाडी (भाग-२)' असा प्रकार आहे की काय, अशी शंका आली. "तसं काही नाही. उलट 'अभिमान' रांजणकरांनी 'देशमुखवाडी'च्या आधीच लिहिलं आहे. त्याचं स्क्रिप्ट जवळजवळ दोन-अडीच वर्षं माझ्याकडं होतं," असा खुलासा निर्माता-दिग्दर्शक कमलाकर सारंगांनी केला.

'अभिमान'च्या फक्त कथेचा विचार केला तर रांजणकरांनी एक सलीम-जावेद-अमिताभ अधिक एक बेइमान असे गणित बनवले असल्याचे ध्यानात येईल. रायभान देशमुख नावाच्या तरुणाला त्याच्या काकांनी आणि अन्य गावकऱ्यांनी अपमानित अवस्थेत अगदी गाढवावरून धिंड काढून हाकलले. मग तो सूडाने पेटून परतला आणि गावातील आपमतलबी पुजाऱ्यापासून ते लब्धप्रतिष्ठित चौबळ वकिलांपर्यंत सर्वांची अंडीपिल्ली त्याने बाहेर काढली. हे सर्व करताना त्याची एका संन्यासिनीशी चकमक झडली. या चकमकीच्या ठिणगीतूनच दोघांच्याही हृदयांच्या शेकोटीतील प्रेमाची कोरडी लाकडे सरसरून पेटली. अखेर सर्व खलनायकांना पुराव्यासकट कायद्याच्या हवाली करून नायक-नायिकेने बिस्मिल्लाखाँची सनई वाजवायला सुरुवात केली. आता दरम्यानच्या काळात गावातील दशावताराच्या मंदिरातील प्राचीन मूर्तींची चोरी, रायभानने रात्री आपल्या वाड्यावर त्या संन्यासिनीला – अरुंधतीला – एकटीला बोलावणे आणि रिवाजाप्रमाणे एक शालू देऊन तिची परत पाठवणी करणे इत्यादी फिल्मी घटना घडतात. रायभानच्या तोंडी एक गाणे आणि कुठे तरी एक बेफाम दनादनी टाकली की, या नाटकाची एक फाकडू हिंदी फिल्लम करता येईल. या सगळ्या कथेमधूनही एक गोष्ट मात्र उठून दिसते–रायभान देशमुख या माणसाची व्यक्तिरेखा. या माणसाचे थोडक्यात वर्णन नाटकातच अरुंधतीच्या तोंडी घातले आहे, –"एखादी अप्राप्य, असाध्य गोष्ट मिळविण्यासाठी जिवाच्या आकांताने प्रयत्न करायचा; सर्वस्वाची बाजी लावायची; पण तीच गोष्ट हातात मिळाल्यानंतर मात्र सहजगत्या तिला बाजूला सारायचे." बारा वर्षांपूर्वीचा तरुण रायभान कसा होता? भाबडा, भित्रा, नेभळट? याचे उत्तर नाटकात मिळत नाही; पण एक नक्की–तो बारा वर्षांपूर्वी आजच्या इतका समर्थ नव्हता, सगळ्या गावकऱ्यांना पुरून उरणारा, त्यांना दाती तृण धरायला लावणारा नव्हता. बारा वर्षांपूर्वीच्या आणि बारा वर्षांच्या काळातील अनुभवांचे तप पाठीशी घेऊन हा रायभान अधिक समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा, अधिक विचारी झाला आहे. मंदिर म्हणजे एक वास्तू आणि त्यातील मूर्ती म्हणजे वस्तू असे सांगून त्यांनाही व्यापारात राबविण्यास निघालेला रायभान नास्तिक आहे, काहीसा बुद्धिवादी आहे; पण स्वत: आखून घेतलेल्या नीतिमत्तेच्या चौकटी तो मानतो, पाळतो. आपल्याविरुद्धच्या लोकानी शरणागती पत्करल्यानंतर त्यांना माफ करण्याइतका तो दिलदार आहे; पण त्याच वेळी ह्या लोकांना दूध पाजण्यापूर्वी त्यांचे विषाचे दात पूर्णपणे उचकटण्याइतका तो धूर्तही आहे. सूडाच्या आगीने तो पेटलेला असला तरी त्या आगीची सर्वभक्षक होळी करण्याइतका तो उतावळा वा अविचारी नाही. अरुंधतीशी तात्त्विक वाद घालणे असो वा आपल्या दिवाणाचे खोचक बोलणे उलटविणे असो–दोन्हीतही त्याची जीभ आणि बुद्धी दुधारी पट्ट्यासारखी फिरते आणि माणसातील माणूसपणासाठी हा रायभान अतिशय हळुवार आहे, प्रामाणिक निष्ठेबद्दल त्याला आदरभाव आहे. रायभानची ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा दिग्दर्शक कमलाकर सारंगांनी स्वत:च साकारली आहे. दिसण्याच्या बाबतीत सारंग रायभान देशमुख म्हणून अतिशय शोभून दिसले; पण नाटकात मात्र त्यांनी 'अभिमान' या ऐतिहासिक नाटकातील 'छत्रपती रायभान देशमुख' सादर केला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे सारंगांनी वापरलेली एकच एक आवाजाची खणखणीत पट्टी आणि सतत "ज्या क्षणी तुम्ही दुष्मनांच्या छावणीत गेलात, राजेऽऽ, त्याच क्षणी तुम्ही आम्हाला मेलात!" अशा थाटाची संवादफेक.

कलाकारांपैकी दस्तुरखुद्द कमलाकर सारंगांपासून लालन सारंग, राजा नाईक, जयंत सावरकर, नितीन मंत्री इत्यादी सर्व प्रमुख कलाकार सराईतच आहेत; पण नाटकात मात्र रायभान देशमुख (कमलाकर सारंग) ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आणि अरुंधती (लालन सारंग) ही दुसरी महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा सोडून हणमंतराव (राजा नाईक), चिदंबर (नितीन मंत्री) आणि शेषाप्पा (जयंत सावरकर) ही दुय्यम पात्रेच जास्त उठाव घेऊन जातात; कारण कमलाकर सारंगांप्रमाणेच लालनबाईंनीही एक अत्यंत रटाळ आणि उदास अशी एकसुरी पट्टी लावली होती. संसारसुखापासून पाठ फिरवलेली विरागी संन्यासी शब्दांमधील वा चेहऱ्यावरील भावभावनाही पुसून टाकील का? निदान शांति हा एकमेव भाव तरी तिच्या चेहऱ्यावर नको का? लालनबाईंच्या चेहऱ्यावर भावरहित स्मशानशांती दिसते; की या भूमिकेपुरता लालनबाईंनी अभिनय-संन्यासही घेतलेला होता?

'अभिमान' चे संवाद हे त्या नाटकाचे आणखी एक ढोबळ सामर्थ्य. हमखास टाळी अनेक वाक्ये नाटकात पावला-पावलाला पेरलेली आहेत. शिवाय चित्रपटात जसे वेचक संवाद अमिताभ बच्चनच्या वाट्याला देतात, त्याप्रमाणे 'अभिमान' मध्ये असे संवाद रायभानच्या वाट्याला आहेत. "हा दगड जरी तुमचा असला; तरी त्यावरचं रक्त माझं आहे." अशी हमखास कड्कड्कड्, हमखास चुक्चुक्चुक् वाक्ये नाटकात भरपूर आहेत. या हमखास टाळ्यांवरुन आठवण झाली; राजकारणातील ताज्या घडामोडींना चपखल बसतील अशा बेताने वाक्ये वदलणे, टाकणे वा स्वत:ची घुसडणे हा प्रकार हल्ली कित्येक नाटकांमधून बघायला मिळतो. ('बाईसाहेब' मध्ये अशी वाक्ये बरीच आहेत.) 'अभिमान' मध्येही अशी वाक्ये आहेत. जोपर्यंत नाटकातील संदर्भ सोडून ही वाक्ये नसतात तोपर्यंत ती फारशी खटकत नाहीत. झटकन दादही घेऊन जातात; पण नाटकाशी असंबद्ध अशा रीतीने अथवा नको तितक्या प्रमाणात अशा वाक्यांचा सुळसुळाट झाला तर मात्र नाटकाच्या प्रवाहात ती खटकतात. उदाहरणार्थ–'अभिमान' मध्ये चिदंबर पुजारी (नितीन मंत्री) एका ठिकाणी रायभानला उद्देशून, "सरकार, मला अगदी स्वगृही आल्यासारखं वाटतंय." असे एक वाक्य म्हणतो, हे अशा खटकणाऱ्या वाक्यांपैकी एक.

'अभिमान' चे पार्श्वसंगीत अजित मर्चन्ट यांचे आहे, नेपथ्य बाबा पार्सेकर तर प्रकाशयोजना बाबा आंबेरकर यांची आहे. एका मैफिलीच्या निमित्ताने घेतलेले कलावंतिणीचे गाणे, खिडक्यांतून दिसणाऱ्या प्रकाशाचा दिवसाची वेळ दाखविण्यासाठी केलेला उपयोग, अशाच प्रकाशयोजनेसाठी कंदिलांचा केलेला उपयोग इत्यादी गोष्टींचा सराईतपणे वापर केलेला आहे.

–सदानंद बोरसे

## मुंबई वार्ता

पृष्ठ ३ वरून

ठिकाणी पत्रं घातली की येणारी माणसं अपंग असतील. व्यावहारिक अडचण अशी की, रेल्वे-डब्यांमधून प्लॅटफॉर्मवर खुर्च्यांची चढ–उतार नीट होईल की नाही. बरं, त्यासाठी रॅम्प्स बनवावेत तर ते तरी काय मापाचे ? प्लॅटफॉर्म्सच्या उंच्या काय सारख्या असतात ? चर्चगेट ते विरारपर्यंत सर्व प्लॅटफॉर्म्सची मापं घेतली, तर तेसुद्धा सारखे नव्हते; पण मग त्यातूनच काही तरी मार्ग निघाले. ट्रिप मात्र एवढी यशस्वी झाली की, कुणाच्या अंगावर साधा ओरखडाही न उठता आम्ही परत आलो !'

माणसातली धडाडी, चिकाटी आणि जगण्याची उमेद या साऱ्याचं असं उदाहरण विरळाच ! रिहॅब सेंटर आता चांगलं आकाराला आलं आहे. तिथले अपंग आपल्या पायांवर आता अगदी खंबीर उभे आहेत ! ◻

## □ मोकळ्या लेखनासाठी मोकळं आकाश

मराठी तरुण व्यापारात मागे का ? मराठी तरुण उच्चपदस्थ सरकारी नोकऱ्यांमध्ये मागे का ? मराठी तरुण शिष्यवृत्ती परिक्षांत मागे का ? या साऱ्या 'का' 'का' च्या जोडीला रवीन्द्र पिंग्यांनी आणखी एक 'का' जोडला आहे–'मराठी तरुण लेखनात मागं का ?'

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीनं कै. अच्युतराव कोल्हटकरांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंगे बोलत होते की, मोकळं लेखन हवं आणि त्यासाठी मोकळं आकाश हवं. मोकळ्या आकाशात भरारी घेण्याची ताकद हवी. तयारी हवी. अच्युतराव कोल्हटकर म्हणजे फार मोठा पत्रकार ! एकदम बेधडक आणि बिनधास्त! कुठे संकोच नाही की खास मराठी मनाचा भिडस्तपणा आणि भीती नाही. पाँडिचेरीचे महर्षी अरविंद त्यांच्याकडे केवळ एकदा जेवून गेले; पण अच्युतरावांचा एवढा मोठा ठसा त्यांच्यावर उमटला की, नंतरही ते अच्युतरावांना कधी विसरले नाहीत. अच्युतरावांचा धीटपणा चतुरस्त्र होता आणि तोच त्यांना पत्रकार म्हणून उपयोगी पडला.

कोल्हटकर पुण्यतिथीच्या निमित्तानं याच चतुरस्त्र धीटपणाची आठवण पिंग्यांना करून द्यायची होती. जे बनचुके आहेत, त्यांना नाही. पण निदान जे शिकाऊ आहेत त्यांनी तरी हे लक्षात घ्यायला पाहिजे. तसं पहायला गेलं तर चांगल्या लेखनाचे अनेक निकष आहेत. काही तरी नवीन देणं हा त्यातलाच एक महत्त्वाचा निकष आहे. त्यासाठी नवीन वाटा चोखाळायला हव्यात. बाकी काही सोडा, पण निदान बारीक–सारीक तपशीलांची समग्र नोंद केली तर तीसुद्धा किती तरी मनोरंजक ठरू शकते. नाही तरी हे कल्पितापेक्षा अद्‌भुत असतं असं म्हटलंच आहे. तेव्हा या स्वच्छ, अनावृत्त सत्याला जाऊन भिडून आणि त्याचे बारकावे, गरम, ताजी बातमी वाचकांसमोर मांडणं ही काळाची गरज आहे; पण कुणाही वर येऊ पहाणाऱ्या लेखकाची ही गरज आहे. त्याला प्रसिद्धी पाहिजे असेल, तर त्यानं रुळल्या वाटेबाहेर पडलं पाहिजे. कान आणि डोळे उघडे ठेवले पाहिजेत. मानवी मनाची स्पंदन टिपली पाहिजेत आणि त्यासाठी भरपूर मुशाफिरी आणि भटकंती केली पाहिजे. अरे, निदान तात्पुरता तरी सर्वसंगपरित्याग करा! लेखनातून मिळालेला पैसा परत लेखनातच गुंतवा. भांडवली खर्च आहे तो. व्ही. शांतारामांसारखा निर्माता आज का टिकून आहे? कारण सिनेमात मिळणारे पैसे त्यांनी रेसजुगारात उधळले नाहीत, ते परत सिनेमातच घातले. साधा व्यवहारी सुज्ञपणा आहे हा.

पिंग्यांची बोलण्याची पद्धत मोठी मजेशीर आहे. 'आमच्या दि. बा. मोकाशांची मोठी छान कादंबरी आहे. 'देव चालले !' वाचून अगदी अंघोळ केल्यासारखं वाटतं. वाचलीत तुम्ही ? नाही ? का ? इथून बाहेर पडल्यावर अगोदर वाचा आता. त्यातलं लालित्यपूर्ण कादंबरीचं अंग सोडा; पण निदान तसे बारकावे टिपण्याची तरी वृत्ती ठेवा ! किती सुरेख विषय असतात लिहायला; कुणी चाकोरीबाहेर लिहील तर ना ! मोकाशी, इरावती कर्वे, अरुण साधू अशी काही उदाहरणं तेवढी आहेत. सृष्टिनिरीक्षण करा. मीनाक्षीपुरमला जा. नाही तर दलाई



ग्रामाला भेटा. ते फार दूर वाटलं तर निपाणीला जा. हरिहरेश्वर नाही तर संगमेश्वरला जाऊन तिथल्या भटजीशी बातचीत करा. या पालघरजवळचं एक खेडं सूर्या नदीच्या प्रकल्पात पाण्याखाली जाणार आहे. तिथल्या रहिवाशाशी बोला. पालखी-बरोबर जाऊन पहा. मध्यंतरी सॉमरसेट मॉम मुंबईत आले होते. एक वा. ल. कुलकर्णी सोडले तर का नाही त्यांना कुणी जाऊन भेटलं ? आम्हाला इथे आकाशवाणीवर रोज मंगेश पाडगावकरांच्या कवितांच्या बाराव्या नाही तर विसाव्या कार्बन कॉप्या वाजवाव्या लागतात. असं काही मिळालं तर ते काय आम्हाला नकोय ? पण करतो कोण एवढे कष्ट ?'

*पिग्यांच्या या सरबत्तीत कळकळ होती.* कोपऱ्यात बसलेले बापडे वार्ताहर मात्र आता कान धरून उठा-बशा काढायला लागतील असं वाटायला लागलं. कारण पाढे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर गुरुजींनी हातात छडी घेऊन उभं रहावं असा पिग्याचा आविर्भाव होता ! एक-दोन गोष्टींचा मात्र उल्लेख यायला हवा होता. वार्ताहरांच्या भेदक नजरेनं किंवा लेखकाच्या तरल नजरेनं टिपलेलं सत्य आणि मसालेदार खमंग बातमी यात काही सीमारेषा हवी ना ! तिचे काही भान हवंच. दुसरं असं की, हे जे काही सत्याला जाऊन भिडा असं पिग्यांचं म्हणणं आहे, त्यातलं निखळ बावनकशी सत्य कोणत हे कळणारे, असा विवेक आणि अशी कल्पकता असणारेही कोल्हटकर किंवा मोकाशी, अरुण साधू किंवा खुद्द पिग्यांसारखे थोडेसेच असतात, म्हणून तर एका पाऊण तासाच्या भाषणात पिग्यानी भराभरा आठ-दहा विषय सांगितले. या विषयावर अधिक शोध घेणं सोडा; पण हे विषय तरी असे किती जणांना सुचतील ? तेव्हा यशस्वी लेखनाचा किंवा यशस्वी पत्रकारितेचा असा राजरस्ता असणं आणि तो सर्वांनाच शक्य असणं फार कठीण आहे ! ◻

## ◻ प्रा. ल. ग. जोग स्मृतिदिन आणि कुरुंदकरांचं वक्तृत्व

२५-२६ जूनला प्रा. ल. ग. जोगांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त रूपारेल कॉलेज-मध्ये एक कार्यक्रम करण्यात आला. 'लावण्य क्षितिजे' या समीक्षालेखांच्या संग्रहाचं प्रकाशन आणि प्रा. नरहर कुरुंदकरांचं व्याख्यान. अध्यक्ष-मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. राम जोशी. ल. ग. जोग स्मारक समितीचा हा कार्यक्रम जोगांसारख्या व्यासंगी समीक्षकाच्या स्मृतिदिनाला साजेसाच होता ! कुरुंदकरांच्या व्याख्यानाचा विषय होता, 'रसचर्चेतील काही प्रश्न'. अर्थात हा विषय बराचसा ॲकॅडेमिक, काहीसा तांत्रिक आहे. त्यामुळे भाषणाबद्दल काही लिहायची ही जागा नाही; पण रसचर्चेबाबत कुरुंदकरांनी जे विचार मांडले, ते प्रचलित विचारापासून इतके वेगळ्या दिशेला जाणारे आहेत की हे व्याख्यान समीक्षा, संस्कृत वाङ्मय आणि सौंदर्यशास्त्राच्या क्षेत्रात अक्षरशः क्रांतिकारी ठरावं ! कुरुंदकरांचं भाषण ऐकणं, मग ते कधीही, कुठल्याही संदर्भात, कुठल्याही विषयावर असो, म्हणजे अगदी निखळ आनंद असतो ! त्यांच्या बोलण्याचा खास मराठवाडी ढंग, ओघवतं वक्तृत्व, वाद-विवादाच्या उलटयासुलटया कसरतीतूनही मुद्द्यावरची घट्ट पकड आणि मधूनमधून घेतलेले मार्मिक चिमटे. काही रेशमी तर काही जरा बोचरे ! म्हणजे उदाहरणार्थ, कार्यक्रमात अशी एक खंत व्यक्त केली गेली की, पुरेशा विद्यार्थ्यांअभावी भाषाविभाग बंद करण्याची पाळी येतेच, हे काही बरोबर नाही. कुरुंदकरांचं म्हणणं, अहो, भाषा-विभाग काय ? आमच्याकडे कुठल्याच विषयांना पुरेसे विद्यार्थी मिळत नाहीत, तेव्हा महाविद्यालयंच बंद करण्याची पाळी येतेय मराठवाड्यात ! कुलगुरु आपल्या भाषणात म्हणाले की, भाषाच्या अभ्यासाकडं अधिक लक्ष पुरवलं गेलं पाहिजे. तर हे म्हणणार, बरोबर. माझंही अगदी हेच मत आहे आणि नाही तरी सध्या कुलगुरूंशी सहमत होण्याचीच रीत असते !

म्हणजे आहे की नाही वात्रटपणा !

—ललिता बर्वे


### नवीन दाखल झालेली पुस्तके

१. टिळक विचार (राजकीय विचार) : भा. कृ. केळकर
२. मनाची पिल्लं (कविता) : डॉ. निशिकान्त श्रोत्री
३. अक्षर दिवाळी (१९८० च्या दिवाळी अंकांतील निवडक साहित्य)
४. जन्मदा (खंड ४ था-'माते'विषयी विविध प्रकारचे लेखसंग्रह )
५. अग्रलेख (विविध अग्रलेखाचा संग्रह) : गोविंद तळवलकर
६. बर्ट्रांड रसेल (चरित्र) : सु. वा. बखले
७. जॉर्ज बर्नार्ड शॉ (चरित्र) : वि. ह. कुलकर्णी
८. अग्निवेल (लेख) : पु. भा. भावे
९. इस्कोट (कादंबरी) भीमसेन देठे
१०. अभिनेत्री (कादंबरी) : बाबा कदम

रोटी, कपडा, वाचन व मकान या क्रमाने आपल्या मूलभूत गरजा असू द्या !

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# आनंदओवरीतला साहित्यिक

वसंत जोशी, कर्जत

मोकाशी गेले. आकस्मिकरित्या धक्का देणारी ती वार्ता वृत्तपत्रांतून वाचली. स्वत:ला सावरायला काही क्षण जावे लागले!

मोकाशी, एक सज्जन साहित्यिक, थोर साहित्यिक! मोजकीच, पण गुणवत्तेने मौलीक ठरलेली त्यांची पुस्तके आज आठवतात. त्यांच्याबरोबर घालवलेले काही अविस्मरणीय क्षणही आठवतात. त्या क्षणांनी माझ्या जीवनाला कृतार्थता प्राप्त झाल्याचे त्या वेळी जाणवले होते. आता तर त्या आठवणीनीही मन पुन्हा पुन्हा भरून येते. त्यांचे–माझे रक्ताचे नाते नव्हते. माझ्यापेक्षा ते वयाने मोठे, योग्यतेने मोठे, त्यामुळे त्यांना मी माझे मित्र म्हणणेही योग्य दिसणार नाही; पण त्यांच्यात व माझ्यात काही स्नेहबंध असावा. कदाचित त्यांच्याशी परिचय झालेल्या प्रत्येकालाच असे वाटत असावे...!

पुण्याला गेलो की त्यांच्याकडे जावे असे वाटे. कधी त्याची गाठ पडे, कधी नाही. मी त्यांचा वाचक होतो हे त्यांच्याकडे जाण्याचे मी शोधलेले निमित्त; पण मी त्यांचा 'गाववाला' हे माझ्याविषयी त्यांना आपुलकी वाटण्याचे एक महत्त्वाचे कारण.

पेरुगेटाजवळच्या त्यांच्या रेडिओ–रिपेअर्सच्या दुकानात त्यांना काम करताना मी प्रथम पाहिले. तो काळ १९५४–५५ चा असावा. त्यांच्या त्या दुकानावरूनच मी रोज कॉलेजला जात–येत होतो; पण दुकानात जाऊन त्यांच्याशी बोलण्याचे धैर्य त्या वेळी मला झाले नाही. वास्तविक मोकाशींचे व्यक्तिमत्त्व इतके प्रसन्न होते की, त्यांना कुणीही सहज जाऊन भेटावे. तरीही त्यावेळी मी त्यांना भेटलो नाही. त्यानंतर एका कथाकथनाच्या कार्यक्रमात त्यांना पाहिले. त्या वेळच्या एम. ई. एस. कॉलेजमध्ये हा कार्यक्रम झाला. व्यंकटेश माडगूळकर आणि आणखी कुणी तरी एक कथाकार आणि मोकाशी यांनी कथा सांगितल्या. त्या कार्यक्रमात बाजी मारली माडगूळकरानी! त्या कथाकथनाच्या कार्यक्रमासाठीदेखील मोकाशी आपल्या साध्या नेहमीच्या पोषाखातच आले होते. नेहरू शर्ट, पायजमा आणि पायात चपला! बस्स, यापेक्षा त्याना वेगळ्या पोषाखात मी कधी पाहिले नाही!

मध्यंतरी बराच काळ गेला. 'माणूस'च्या माजगांवकरानी 'अन्नस्वतंत्रता' मोहीम हाती घेतली व त्यासाठी 'कैलास ते सिंधुसागर' ही पदयात्रा निघाली. त्यात मोकाशी 'पत्रकार' होऊन सामील झाले हे समजले. त्या वेळी मी औरंगाबादला होतो. या पदयात्रेला सामोरे जाण्यासाठी आम्ही काही मित्रानी एक पदयात्रा औरंगाबाद ते दौलताबाद काढली. माजगावकराची पदयात्रा सकाळी नऊच्या सुमारास दौलताबादला आली. पदयात्रेत आठ–दहाच माणसे होती. त्यात सगळ्यात शेवटी मोकाशी दिसले! पुन्हा पोषाख नेहमीचाच, फक्त खांद्याला अडकविली होती एक शबनम बॅग. डोक्यावर उन्हापासून संरक्षण करणारी हॅट. या इथे प्रथमच मोकाशींच्याबरोबर खूप मोकळेपणाने बोलणे झाले. 'देव चालले' या त्यांच्या पुस्तकाविषयीच खूप बोलणे झाले. 'ही कथा कशी सुचली?' 'ही सत्य घटना आहे काय?' इत्यादी भाबडे प्रश्न वाचक जसे नेहमी साहित्यिकांना विचारतात तसेच मी त्यांना विचारले होते. त्यांची उत्तरेही मोठी गंमतीची होती. ही घरोघरी घडणारी घटना असताना ती 'सत्य' आहे काय अशी शंका वाचकाला का वाटावी? त्यांच्या कथेपेक्षा त्या दिवशी ते दौलताबादच्या किल्ल्याबाबत, जनार्दनस्वामी, एकनाथ यांच्याविषयीच जास्त बोलले. बोलणे इतके साधे, निर्मळ की ऐकत रहावे असे वाटावे!

त्यानतर अधूनमधून पत्रव्यवहार चालू होता. पुण्याहून मुबईला व सायंकाळी मुबई–पुणे असा रोज प्रवास करण्याची पाळी माझ्यावर एकदा येऊन गेली नोकरी मुबईला, रहायला पुण्याला. अशा वेळी दुसरे काय होणार? मुबईला जागा मिळणेच शक्य नव्हते. एके दिवशी दुपारच्या 'जनता'ने मी पुण्याला चाललो होतो. गाडीत चिक्कार गर्दी! पाय ठेवायला जागा नाही. जागा शोधीत एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जाताना दाराजवळ हातरुमाल अंथरून मजेत बसलेले मोकाशी दिसले. कॉलेजमधला एखादा तरुण मुलगा मजेत शीळ घालीत जसा बसावा तसे ते बसले होते! मी त्यांना व त्यानी मला पाहिले आणि खुणेने त्यांनी मला बोलाविले. मी त्यांच्याजवळ गर्दीतच कसाबसा बसलो. त्या दिवशी, मला वाटते मीच खूप बोललो. विषय त्यांच्या कथा! त्यांच्यासारखी मला कथा कशी लिहिता येईल, त्यासाठी मी काय करावे– याचा फॉर्म्युला मी त्यांना विचारीत होतो व ते हसत होते. माझ्या अशा प्रश्नाची उत्तरे मलाही माहीत होती; पण मोकाशी या प्रश्नांना काय उत्तरे देतील हे मला पहायचे होते आणि त्या प्रत्येक प्रश्नावर त्यांचे हसणे हे उत्तर होते! ...बघता बघता कर्जत आले. मग ते बोलू लागले. कर्जत हे त्यांचे गाव आवडते गाव! त्या वेळी अनेक आठवणी त्यांच्या मनात दाटल्या असाव्यात... ते अगदी भरभरून बोलले. मध्येच ते मला म्हणाले, 'जोशी, आता पुणे–मुबई प्रवास किती दिवस करणार? तुम्ही या कर्जतला जागा शोधा!'

'पण माझी इथे कुणाची ओळख नाही!'

'माझे एक नातेवाईक आहेत इथे, मी त्यांना चिठ्ठी देतो.'

मोकाशींनी त्याच दिवशी गाडीत बसल्या-बसल्या एक चिठ्ठी लिहिली.

त्या चिठ्ठीचा मला उपयोग करण्याची पाळी आली नाही. मला कर्जतला भाड्यानेच पण चांगली जागा मिळाली!

मी मोकाशींना पत्र पाठवून कळविले– 'तुमच्या कर्जतला रहायला आलो आहे. आता तुमच्यासारखे लिहिता येईल का?...' त्या पत्राचे उत्तर आले नाही. 'तुका आकाशाएवढा' ही कादंबरी 'सोबत'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. ती कादंबरी मला विलक्षण आवडली! त्यासंबंधी त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळाली तेव्हा ते म्हणाले,

'तुम्हाला आवडली ना कादंबरी झाले तर! तुम्ही काय लिहिता ते सांगा–'

'तुमच्यासारखे लिहिता येत नाही ही खंत आहे!'

'मग तुम्ही तुमच्यासारखे लिहा ते सगळ्यात सुंदर असेल!'

मोकाशींना त्यांच्या पुस्तकांबद्दल, त्यांच्या लेखनशैलीबद्दल फार बोललेले आवडत नसावे असे वाटते. त्यांच्या लेखनशैलीबद्दल विशेषतः त्यांच्या लेखनातला, साधेपणा, सुबोधपणा याबद्दल मी जेव्हा आवर्जून बोले तेव्हा मी हे काय बोलतो आहे, असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असे. आपण काही तरी विशेष लिहितो, आपली काही तरी विशेष 'लेखनशैली' आहे हे त्याना पटत नसावे.

कधी कोणा अन्य लेखकाबद्दल निंदा-नालस्तीचा एक शब्द त्यांच्या तोंडून मी ऐकला नाही! फक्त कथाकथनाबद्दल मात्र ते म्हणाले, 'ती कला मोठी कष्टसाध्य आणि खर्चाची आहे. तुमच्यासासारखे लोक कथा वाचतात. ती आवडली म्हणून घरापर्यंत सांगायला येतात, यापेक्षा आणखी काय हवे? कशाला हवे ते कथाकथन?'

'वात्स्यायन' ही कादंबरी क्रमशः 'माणूस' मध्ये यायला लागली आणि मोकाशी पुन्हा फॉर्मात आले असे वाटू लागले. 'माणूस' मधली 'हैबतीबाबा', 'सच्चिदानंदबाबा' या कथाविषयीही त्यांच्याशी बोलणे झाले. मोजक्या शब्दात, नेटक्या पद्धतीने त्या कथांविषयी ते बोलले; पण त्यांनी त्याविषयी खप बोलावे असे मला कितीही वाटले तरी तसे त्यांनी केले नाही. याउलट पूर्वी एकदा त्यांची एक कथा आवडली नाही, असे कळविले तर त्याचे मात्र उत्तर ताबडतोब आले. त्यात त्यांनी लिहिले होते, 'कथा आवडली नाही असे कळविले ते बरे झाले. कारण लेखकाला सहसा तसे कळवीत नाहीत. चांगली कथा लिहून या कथेची भरपाई करीन!'

कर्जतला कुलाबा जिल्ह्याचे साहित्य-संमेलन घ्यायचे ठरले तेव्हा आमच्या कुलाबा जिल्ह्याच्या साहित्यिकांना निमंत्रणे पाठविण्याचे ठरले. श्री. र. वा. दिघे आणि मोकाशी हे आमच्या कुलाबा जिल्ह्याचे ज्येष्ठ साहित्यिक! त्याना जातीने निमंत्रण देण्यासाठी आम्ही मुद्दाम त्यांच्या घरी गेलो होतो. आमच्या दुर्दैवाने त्या वेळी ते दोघेही आजारी! पुण्याला मोकाशींच्याकडे गेलो त्या वेळी ते आजारीच होते. सायंकाळी चारचा सुमार; पण घरात खूप अंधार वाटला. मोकाशीही थकल्यासारखे वाटले. आपली असाह्यता त्यांनी व्यक्त केली. संमेलनासाठी त्यांनी निदान संदेश पाठवावा असा आग्रह धरला. ते क्षीणपणे हसले. म्हणाले, 'खरे, तर घरच्या कार्यक्रमासाठी संदेश कसला पाठवू? तुमच्या सर्वांच्या-बरोबर दोन दिवस मजेत घालविण्याची माझी संधी चुकली!...' मी पुन्हा आग्रह धरला.

'निदान तुमचे पत्र तरी आले पाहिजे!' त्यांनी ते मान्य केले. त्याचे एक छोटेखानी सुंदर पत्र आलेही. आता वाटते की, त्यांच्या आजारपणात त्यांना ते पत्र लिहायलाही फार कष्ट पडले असावेत!

गेल्या वर्षी जुलैमध्ये दोन–तीन आठवडे मी पुण्याला होतो. एकदा त्यांच्या भेटीसाठी गेलो; पण दाराला कुलूप होते. दुसऱ्यांदा भेटायला गेलो त्या वेळी ते घराकडेच निघाले होते. पाऊस कोसळत होता. हातात छत्री घेऊन किंचितसे वाकून स्वतःला जपत ते चालले होते. बरोबर त्यांच्या पत्नी होत्या. मी नमस्कार केला.

'तुमच्याकडेच निघालो होतो'–मी.

'मग चला तर घरी'–मोकाशी.

'पण तुम्ही आता बाहेरून फिरून आला आहात. थकला असाल?'

'छे, छे, चला घरी!'

'नको उद्या येईन!'

थकून घराकडे चाललेल्या मोकाशींना त्यांच्याचबरोबर त्यांच्या घरी जाऊन त्रास द्यावा असे वाटले नाही... पण 'उद्या येईन' असे जे म्हणालो ते दुसऱ्या दिवशी तर जमले नाहीच... आता ते कधीही जमणार नाही. त्या दिवशी मोकाशींची जी भेट झाली ती शेवटचीच!! □

पत्रव्यवहार

## साखरेचा भाव दुप्पट झाला. शरद जोशींच्या भारतीय शेतकऱ्याला यातले किती मिळाले?

□ मी 'माणूस'चा नियमित वाचक नाही. अधूनमधून चाळतो. अलीकडे श्री. शरद जोशी आणि त्यांच्या आंदोलनाचे आपण कट्टर समर्थक झाला आहात असे माणूस-मधील मजकुरावरून वाटते. जोशींचा ज्या इंडियावर राग आहे त्या इंडियातला मी इंडियन आहे. माझी बाजू मी मांडू इच्छितो. दुसऱ्या कोणा इंडियनाने हे कार्य आधीच केलेले असल्यास मला कल्पना नाही; पण मीच पहिला असलो तर मला संधी द्याल अशी आशा आहे.

मी बॉम्बेत राहतो. वडिलांच्या जागेत. जुनी भाड्याची जागा. मी एल. आय. सी.त नोकरी करतो. मला चांगला पगार मिळतो. काम तसं विशेष नसतं. मधूनमधून संपातही इच्छेने वा अनिच्छेने सामील होतो. कधी-कधी खाजगी क्षेत्राच्या आणि सदोदित सरकारच्या नावाने बोटे मोडतो. मी बँकेत नोकरी करतो. काउंटरमागे ऐटीत सिगरेट फुंकतो. उशीरा येतो, लौकर जातो. गिऱ्हाइकाशी उर्मटपणे बोलतो. क्रिकेटच्या, नाटकाच्या तालमीच्या नावाने लौकर सटकतो. जागेसाठी म्हणून स्वस्त व्याजाने कर्ज घेतो आणि त्या पैशात बॉम्बेत जागा मिळत नाही हे पाहिल्यावर ते पैसे इतरत्र चढ्या व्याजाने गुंतवतो. मी बहुराष्ट्रीय कंपन्यांत काम करतो. भरपूर ओव्हरटाइम करतो. चांगले पैसे मिळतात. साडेअकरा महिने दिवसाचे दहादहा–अकराअकरा तास काम करतो. मिळालेल्या पैशातून बायकोला साड्या घेतो. मुलाला कॉन्व्हेंटमध्ये घालतो. पुढील मूल न होण्याची जास्तीत जास्त खात्रीची साधने विकत घेतो. शेअरबाजारात बारीकसारीक खरेदी-विक्री करतो, भारतातल्या वृद्ध आणि काम करू न शकणाऱ्या अथवा न इच्छिणाऱ्या नातेवाइकाना नियमित मनिऑर्डर करतो आणि. एवढे करून पैसे उरले तर पधरा दिवस महाबळेश्वर, माथेरान किंवा

बंगलोरपर्यंत जाऊन येतो !

या सगळ्या व्यापात मी बराचसा कायदेशीर वागतो. अर्थात दुसरा पर्यायच नसतो म्हणा. पगारातून टॅक्स व्यवस्थित कापला जातो. बसचे, रेल्वेचे दर वर्षातून जितक्या वेळा वाढतील तितक्या वेळा ते देतो. चढ्या किंमतीना कायदेशीरपणे तोंड देण्याचा प्रयत्न करतो. जास्ती ओव्हरटाइम करतो. जोडीला शिकवण्या करतो. तोंडात पान तंबाखू लावून चकाट्या पिटत नाही. जमेल तितका पैसा बँकेत टाकतो. कधी तरी पुरेसा जमेल आणि आपण अंधेरीपर्यंत जागा घेऊ अशी वेडी आशा बाळगून स्वत:ला घाण्याला जुपतो. माझी पत्नी समजूतदार असली तरी तीही शाळेत नोकरी करते, शिवणकाम करते. ब्युटीपार्लर चालवते. आईवडील असले तर स्वयपाकखोलीत झोपतात. मुलगा मित्रांबरोबर गच्चीत झोपायला जातो.

माझ्यासारख्यांना संघटित होता येत नाही तेवढा वेळ नसतो, हिंमतही नसते. अहिंसेचे संस्कार असतात. राजकारण्यांविषयी चीड असते. निवडणुकाविषयी असते उदासीनता ! आमचा कोणी प्रतिनिधीच नसतो ! बाँबेत राहून सर्व पक्षांना आणि नेत्यांना भारताचा कळवळा दांडगा ! स्वत: परदेशी गाड्या उडवतील, घर इंपोर्टेड वस्तूंनी सजवतील, क्षुल्लक दुखण्यासाठी अमेरिकेला जातील आणि तरी स्वत:ला भारताचा सुपुत्र म्हणवतील ! याच्या भारतात मोठमोठ्या जमिनी बारमाही पिकाच्या बागायती, पाण्याचा भरपूर पुरवठा ! ट्रॅक्टर्सची अडचण नाही. शेत कसायला म्यानेजर आणि त्याचे चाकर ! याचे मातीशी नाते नाही. भारतीयांच्या मतासाठी कूळकायदा आणतील आणि बाँबेत अधिक उत्पन्नासाठी धडपडणाऱ्याची जमीन काय एक दोन एकर असेल ती काढून घेतील ! याना आयुष्यभर इंडियात राहिले तरी तो कायदा लागू होतच नाही ! तशीच वेळ पडली तर घटस्फोट घेऊन आपली अवाढव्य इस्टेट राखणाऱ्या जातीतले ते; त्यांना कसलीच भीती नाही ! जिल्हा परिषद, सहकारी कारखाने यापासून ते थेट दिल्लीपर्यंत राजकारणे करणे हाच याचा प्रमुख उद्योग !

मधूनच कधी तरी शरद जोशी नामक अबनॉर्मल कॅरेक्टर उदयाला येते. इंडियातील मानमरातब मिळवूनही भारतीयांविषयी आस्था बाळगते. भारतातल्या बहुसंख्य नाडलेल्या, गांजलेल्या नागरिकांना चेतवते, संघटित करते. अनपेक्षितरीत्या यश मिळत जातं. राजकारणी गट गर्भगळित होतो. आंदोलन दडपू पाहातो, आपली माणसे पेरू पाहातो, नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे विकत घेऊ पाहातो आणि हे सर्व न जमल्यास आंदोलनकारांच्या चार आण्यात आपले बारा आणे आणि निवडणुकीत मदत करणाऱ्या आपल्या साथी व्यापाऱ्यांचे आणि दलालाचे सोळा आणे घालून दोन रुपयांचा बोजा इंडियातल्या माझ्यासारख्या मध्यमवर्गीयावर टाकतो ! गेल्या वर्षभरात याचा प्रत्यय अनेकदा आला आहे. साखरेचा भाव दुप्पट झाला. भारतीय शेतकऱ्याला किती मिळाले ? दूध लिटरमागे ९० पैशांनी वाढले. त्यात भारतीय गवळ्याचा हिस्सा किती ? काहीच नसावा. कारण जोशी दूधमात आंदोलनाची भाषा बोलत आहेत. गहू, तांदूळ, डाळी सगळ्यात बेसुमार भाववाढ झाली. यात आम्ही इंडियनांनी जे गमावले त्यातले दहा टक्के तरी आमच्या गरीब भारतीय बांधवांना मिळाले काय ?

अशा परिस्थितीत शरद जोशींचा उदोउदो आमच्या पदराला खार लावून आम्ही का करावा ? राजकारणी आणि अराजकारणी दलाल हे आमचे आणि जोशींचे, दोघांचेही महत्त्वाचे शत्रू आहेत. आम्ही तर हतबल आहोतच; पण जोशींमागे तरी ताकद आहे ना ? मग त्यांनी आमचा दुबळा पाठिंबा हवा असल्यास 'शेतकऱ्याची भाववाढ दलालांच्या हिश्श्यानतूच झाली पाहिजे; शहरातल्या मध्यमवर्गावर त्याचा बोजा पडू नये !' असा आग्रह धरला पाहिजे ! 'मी फक्त गरीब शेतकऱ्यांचंच भले करणार, मग नुकसान कोणाचे का होईना !' ही जर जोशींची भूमिका असेल तर ती शेतकऱ्यांसाठी न्याय्यच; पण आमच्या भल्याची नाही. 'भारत' गट स्थापून जर ते प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे माझ्यासारख्यांची गळचेपी करणार असतील तर मी त्यांना शाब्दिक पाठिंबा तरी का द्यावा ? माझा गट वेगळा आहे आणि मलाही त्याच्या हितासाठी वागण्याचा हक्क आहे. उगाच भव्य आणि उदात्त तत्त्वांसाठी स्वत:च्या पायावर धोंडा काय म्हणून टाकायचा ?

आताच्या परिस्थितीत शरद जोशी हे मध्यमवर्गाचे शत्रूच आहेत. त्याना शहरी मध्यमवर्गाच्या अडचणींची पर्वा नाही. शहरामधल्या खुराड्यात राहून आणि गिरणीकारखान्यात राबून महिन्याच्या महिन्याला गावी पैसे पाठविणाऱ्याची त्याना फिकीर नाही ! आम्हा सर्वांनाच 'इंडियन' म्हणून एकाच मापाने मोजताना त्यांना एक तर इंडियात बहुसंख्येने असणाऱ्या आमच्यासारख्याच्या अडचणींची जाणीव नाही किंवा त्यांच्या आणि आमच्या समान शत्रूशी लढण्याची त्यांची हिंमत नाही, ताकद नाही.

'माणूस'च्या संपादकांनी आपला वाचकवर्ग कोण आहे आणि आपण स्वत: कोण आहोत याचा नीट विचार करावा. आपले घर जाळायला निघालेल्याचा हेतू जरी इतराना ऊब देण्याचा असला तरी आपला तो शत्रूच हा सरळ हिशोब आहे. राजकारण्यांसारखा उदात्तपणा आपण दाखवीत आहात; पण आमच्यासाठी ती फितुरीच आहे ! उद्या आम्हा मध्यमवर्गीयांची प्रतिक्रिया 'माणूस' माझा प्रतिनिधी नाही, म्हणून मी माणूस वाचणार नाही!' अशी होईल याची जाणीव ठेवावी. याउपर काय लिहू ?

१ जुलै अनिल बापट
दादर, मुंबई १४

¤ आपल्या साप्ताहिकाच्या दि. १३ जूनच्या अंकात, दि. ३ मे १९८१ रोजी मी मुंबई येथे दिलेल्या 'इस्लामी संस्कृती' या विषयावरील भाषणाचा सविस्तर वृत्तान्त आला आहे, त्याबद्दल आभारी आहे.

या वृत्तान्तात अनवधानाने काही चुका राहून गेल्या आहेत. गैरसमज टाळण्याकरिता आपण या माझ्या पत्रास प्रसिद्धी द्यावी अशी विनंती आहे.

(१) श्री. दलवाई याची व माझी भेट श्रीमती लता काळे याच्या विवाहानिमित्त आयोजित केलेल्या सत्कारसमारंभप्रसंगी झाली नाही. या प्रसंगी लता काळे याच्या नावाने मुस्लिमानी शिवीगाळ केली असे छापले आहे, तेही बरोबर नाही. या प्रसंगी शिवीगाळ केली ती हिंदुत्वनिष्ठांनी. त्याबाबतचा वृत्तान्त वाचून मी महाराष्ट्र टाइम्समध्ये एक पत्र लिहिले की, कायद्याने किंवा शासकीय आश्रयाने या प्रकारच्या सुधारणा घडून येणे कठीण आहे. स्वयंसेवी संस्थानी यामध्ये प्रयत्न केले पाहिजेत. ज्यांना याबाबतीत काम करण्याची इच्छा असेल त्यांनी माझेशी संपर्क साधावा. या पत्राच्या प्रसिद्धीनंतर या माझ्या आवाहनाच्या संदर्भात श्री. दलवाई याची-माझी भेट झाली अशी वस्तुस्थिती आहे.

(२) पान २ वर इस्लामधर्माप्रमाणे मुसलमान पुरुष यहुदी, ख्रिस्ती, हिंदु स्त्रीशी विवाह करू शकतो......असा उल्लेख आहे. यामध्ये हिंदु शब्द यावयास नको होता. हिंदु हे इस्लामच्या मते काफीर आहेत त्यामुळे मुसलमान पुरुषाचा हिंदु स्त्रीशी विवाह निषिद्ध आहे. ज्या धर्मांना revealed scripture नाही म्हणजे प्रेपिताने दिलेला धर्मग्रंथ नाही त्याचे अनुयायी इस्लामचे मते काफीर होत. कळावे.

२७ जून अ. भि. शहा

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

# शहाद्यातील कष्टकरी संघटनेच्या मागण्या

शहादे तालुक्यातील पडीत वनजमीन त्या भागात राहणाऱ्या भूमिहीन आदिवासींना वर्षानुवर्षे मागणी करून, त्यासाठी सत्याग्रह करून, कारावास भोगून मिळाली नाही. त्या जागांवर दहशतीने दूरच्या आणि महाराष्ट्राबाहेरच्यांचे अतिक्रमण सुरू आहे. महाराष्ट्र शासन आणि त्यांचे भ्रष्ट अधिकारी मात्र या प्रकरणांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे शहाद्यात स्फोटक परिस्थिती निर्माण झाली असून कायद्याचे राज्य अस्तित्वात आहे का असा कष्टकरी संघटनेचा प्रश्न आहे.

कनसाई या गावातील सुमारे १५० भूमिहीन आदिवासी गेली २० वर्षे लगतच्या ९८५ एकर पडीत वनजमिनीची मागणी करीत होते. त्यासाठी १९७२ साली सत्याग्रह करून त्यांनी कारावासही भोगला; पण आता त्या जागेवर शहाद्याबाहेरच्या, इतकेच नव्हे तर मध्यप्रदेशमधल्या लोकांनी अतिक्रमण केले आहे. या जमिनीचे वाटप श्रमिक संघटनेने केले असून भूमिहीन एवढाच निकष न ठेवता संघटनेचा हितसंबंध व दहशत या आधारावर हे बेकायदा वाटप केले आहे. ज्यांच्याजवळ अॅग्रीसिल्वी प्लॉट आहे वा इतरत्र जमीन आहे, त्यांनाही पुन्हा जमीन देण्यात आली आहे.

पिंपराणी शिवारातील ८२५ एकर पडीत वनजमिनीचेही असेच वाटप केले गेले, ते कष्टकरी संघटनेच्या प्रतिकारामुळे रोखले गेले आहे. त्याही गावात सुमारे १२५ भूमिहीन, ज्यांनी ब्रिटिशांच्या काळात या जमिनीवर वेठबिगारी केली आहे, स्वातंत्र्यानंतरही त्यांनीच या भागात बाभूळ, साग, निलगिरीचे वनीकरण केले व काही काळ जमीन पेरली, त्यांनाच ही जमीन मिळाली पाहिजे अशी कष्टकरी संघटनेची भूमिका आहे.

श्रमिक संघटनेने गावाच्या या एकजुटीच्या विरोधात दहशत निर्माण करण्यासाठी गावातील कष्टकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या खाजगी जमिनी ज्याचे रीतसर सातबाराचे उतारे आहेत वाटप करून टाकले आहे.

सर्वश्री फकीरा दमद्या १४ एकर, उतऱ्या गुजऱ्या ११ एकर, करमसिंग बारकू १२ एकर आदि २० आदिवासी खातेदार जे अल्पभूधारक आहेत त्यांच्या जमिनीत दगड गाडून वाटप केले आहे.

याविरुद्ध दि. २० जून रोजीच तहसीलदार, पोलीसनिरीक्षक व वनअधिकारी यांचे लक्ष वेधले; पण त्यांनी काही केले नाही. दि. २३ जून रोजी मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस-अधीक्षक यांना रजिस्टर पत्रांद्वारे तक्रार केली. त्याची पोच मिळाली; पण अद्याप काहीही कारवाई केली गेली नाही.

दि. १५ मे रोजी पिंपराणीचे कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते रामसिंग तुळश्या व गेंद्या मोत्या हे पीठ दळून घेण्यासाठी तलावडीला गेले असता त्यांचे ९ पायली दळण हिसकावून घेण्यात आले, तर १४ मे रोजी फत्तेपूर गावावरून एस. टी. जात असताना मोहऱ्या महादू व पारशी मोग्या या दोन कार्यकर्त्यांना एस. टी. तून उतरवून मारहाण केली गेली. या विरुद्धही रीतसर तक्रार नोंदवूनही पोलिसांनी काहीही हालचाल केली नाही.

कनसाई पोलीसपाटीलदेखील या अतिक्रमीत भागात जाऊ शकत नाहीत. गुरे त्या भागात जाण्यास किंवा भूमिहीन आदिवासी मजुरांना टेंभूची पाने वा मोळ्या तोडण्यासही बंदी केली गेली आहे. कोणी जाण्याचा प्रयत्न केल्यास शस्त्रे घेऊन हिंसक हल्ले केले जातात. कष्टकरी वीरसिंग पाडवी या हल्ल्यात जबर जखमी झाला आहे.

कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. लक्ष्मण कदम, डॉ. कांतीलाल टाटीया (शहादे) ज्योतीसिंग वळवी, ओंकार ठाकरे (कनसाई) भोगा पाडवी, कीरसिंग मोरे, (नांद्या) गुजाऱ्या कारभारी, करमसिंग चौधरी (पिंपराणी) आदींना धमक्या दिल्या जात असून त्यांच्या जीवितास धोका आहे.

दहशतवादाचा योग्य वेळी बंदोबस्त झाला नाही तर लोकांचा कायद्याच्या राज्यावरचा उरला-सुरला विश्वासही संपुष्टात येणार आहे. न्याय्य हक्कासाठी परस्पर संघर्ष सुरू होऊन कायदा, सुव्यवस्था व शांतता धोक्यात येणार आहे.

नांद्या, कनसाई, कुसुमवाडे, पिंपराणी, राणीपूर, चिरडे, रामपूर या भागात हिंसक दहशतीच्या आधारावर स्थानिक व आसपासच्या भूमिहीन आदिवासींचे न्याय्य हक्क डावलून केवळ संघटनेच्या राजकारणासाठी आपल्याच कार्यकर्त्यांना, जे आसपास राहणे तर सोडा; परप्रांतातले आहेत, त्यांना जमिनी वाटणे आणि शासनाने बघ्याची भूमिका स्वीकारणे म्हणजे दहशतवाद आणि भ्रष्टाचार यांची युती झाली असून कायद्याचे राज्य संपुष्टात आले आहे.

याच्या विरोधात पिढ्यान्‌पिढ्या उपेक्षित भूमिहीन कष्टकरी आदिवासींच्या पाठीशी उभे राहण्याचा कष्टकरी संघटनेचा निर्धार आहे.

पुलोद शासनाने अतिक्रमीत जमिनीचे मालकी पट्टे देण्याचा निर्णय घेतला होता. त्याची अंमलबजावणी अंतुले शासनाने स्थगित केली आहे.

११ महिन्यांच्या कराराने जे अॅग्रिसिल्वी प्लॉट पिढ्यान्‌पिढ्या आदिवासी भूमिहीनांना दिले जात होते ते या वर्षी देऊ नयेत असे आदेश या वर्षी ना. अंतुले शासनाने दिले आहेत. त्यामुळे आदिवासींवर भीषण उपासमार ओढवणार आहे

गोरगरिबांसाठी घोषणांचा पाऊस पाडणारे अंतुले शासन मात्र आदिवासींना त्यांच्या जीवनातून उठवीत आहेत आणि आमचे संपर्कमंत्री ना. सुरूपसिंग नाईक या आदिवासींच्या जीवनमरणाच्या प्रश्नावर गप्प आहेत. त्यांच्या घोषणा किती फसव्या आहेत याचाच हा पुरावा आहे

अतिक्रमीत जमिनीचे पट्टे आदिवासींना मिळावे, अॅग्रीसिल्वी प्लॉटही ताबडतोब पुन्हा कराराने द्यावे व त्यांचीही मालकी प्लॉटधारकांना द्यावी, पडीत वनजमीन शासकीय निकषानुसार ८ कि. मी. परिसरातील भूमिहीन आदिवासींना द्यावी व त्यानंतर जमीन उरल्यास आसपासच्या भूमिहीनांना द्यावी. खावटी कर्जाचे वाटप व्हावे, उपयोजनेत बाजारभावापेक्षा ५ टक्के जादा भाव द्यावा, शेतमजुरास १० रु. रोज व ३ हजाराचे साल द्यावे.

स्वस्त धान्य दुकानातून धान्याचा पुरवठा व्हावा, दरा धरण व न्यू असलोदचारीच्या कामास प्रारंभ व्हावा आदी या भागातील जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर कष्टकरी संघटना आंदोलन करीत आहे व त्यासाठी ३ जुलै रोजी कष्टकरी शहादा तहसील कचेरीवर मोर्चा नेला होता.

कष्टकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या चळवळीत काम करणाऱ्या संघटनांनी केवळ आपले वर्चस्व वाढविण्यासाठी आपसात संघर्ष करण्याऐवजी शासन व शोषणाविरुद्ध परस्पर सहकार्याने काम केले पाहिजे असे कष्टकरी संघटनेचे आवाहन आहे.

स्थानिक भूमिहीन आदिवासींचा न्याय्य हक्क मात्र डावलला गेला तर दहशतवादी संघटना आणि भ्रष्ट शासन यांच्या विरोधात सनदशीर मार्गांनी तीव्र लढा एवढाच मार्ग कष्टकरी संघटनेपुढे आहे.

**धरमचंद चोरडिया, लक्ष्मण कदम, कुवरसिंह वळवी**

कष्टकरी संघटना, शहादा.